# पेशवेकालीन हुजूरपागा प्रशासन व व्यवस्थापन

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे

तात्त्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील

विद्यानिष्णात (एम्.फिल.) पदवीसाठी सादर

करण्यात आलेला लघु शोधप्रबंध

इतिहास विभाग

संशोधक

संदीप तिखे

मार्गदर्शक

डॉ.श्रद्धा कुंभोजकर

जून २०१६

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या इतिहास पदव्युत्तर विभाग, सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयाच्या एम्.फिल. (विद्यानिष्णात) या पदवीसाठी श्री.संदीप कोंडिराम तिखे यांनी ''पेशवेकालीन हुजूरपागा प्रशासन व व्यवस्थापन'' या विषयावरील शोध निबंधाचे काम माझे मागदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

सदर शोधनिबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझे माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही.

पुणे

दि.

संशोधक मार्गदर्शक

# प्रतिज्ञापत्र

मी संदीप कोंडिराम तिखे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे असे घोषित करतो की, ''पेशवेकालीन हुजूरपागा प्रशासन व व्यवस्थापन'' या विषयावरील संशोधन डॉ.श्रद्धा कुंभोजकर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

एम्.फिल. (इतिहास) पदवी प्राप्त करण्याकरीता हा संशोधन प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठास सविनय सादर करण्यात येत आहे. हा संशोधन प्रबंध मी स्वप्रयत्नाने पूर्ण केलेला आहे. उपलब्ध माहिती सत्य असून ती अद्ययावत आहे व योग्य त्या ठिकाणी संदर्भ दिलेले आहे. असे मी प्रतिज्ञापत्रपूर्वक नमूद करतो.

स्थळ : पुणे

दि.

संशोधक विद्यार्थी

(संदीप कोंडिराम तिखे)

## ऋणनिर्देश

या संशोधन लघुप्रबंधाचे काम करताना अनेक व्यक्ती व संस्था यांचे प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या मोलाचे सहकार्य मला लाभले. त्यांचे ऋणनिर्देश करणे मी माझे कर्तव्य मानतो.

भारत इतिहास संशोधक मंडळाचे सचिव डॉ.श्री.मा.भावे सर, शिवचरित्रकार श्री.गजानन मेहेंदळे सर, डॉ.रवीन्द्र लोणकर यांनी मला नेहमीच मार्गदर्शन केले आहे. त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे. मंडळाच्या ग्रंथपाल श्रीमती बागाईतकर व कार्यालयीन प्रमुख देशपांडे काका यांनीही मला नेहमी प्रोत्साहन दिले. त्यांचेही आभार मानले पाहिजेत.

पेशवे दफ्तरचे अभिलेखपाल श्री.संजय गुजले, कर्मचारी श्री.उघडे, नवले व बोऱ्हाडे यांनी मला तत्परतेने रूमाल उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचेही आभार.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र विभागाचे अधिष्ठाता डॉ.बी.डी. कुलकर्णी सर, इतिहास विभाग प्रमुख डॉ.संध्या पंडित, डॉ.नलिनी वाघमारे यांनीही बहुमोल सहकार्य केले आहे.

माझ्या संशोधन कार्याच्या मार्गदर्शक डॉ.श्रद्धा कुंभोजकर यांनी मला नवी संशोधन दृष्टी तर दिलीच शिवाय अनेक वेळा तासन्तास मला मार्गदर्शन करण्यासाठी वेळ दिला. त्यांच्या ऋणात राहणेच मी पसंत करीन. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, इतिहास विभागाच्या माजी विभाग प्रमुख, डॉ.सुमित्रा कुलकर्णी यांचे मार्गदर्शन मला नेहमी लाभतेच, या संशोधन कार्यातही त्यांचे बहुमोल मार्गदर्शन व सूचना लाभल्या त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

या प्रबंधाचे टंकलेखानाचे काम साईनाथ प्रिंटर्स, अप्पा बळवंत चौक यांनी न कंटाळता करून दिले. त्याबद्दल त्यांचेही आभार.

# अनुक्रमणिका


| अ.न. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | १ ते १४ |
| २ | सतराव्या शतकातील प्रमुख राजसत्तांची घोडदळे | १५ ते २३ |
| ३ | हुजूरपागेचे प्रशासन | २४ ते ६० |
| ४ | हुजूरपागेचे व्यवस्थापन | ६१ ते ७४ |
| ५. | निष्कर्ष | ७५ ते ८० |
|  | परिशिष्ट | ८१ ते १४४ |
|  | संदर्भग्रंथसूची | १४५ ते १४७ |

# प्रकरण १ ले

## प्रस्तावना

**विषय परिचय** :

अठराव्या शतकात मराठ्यांच्या घोडदळाचे प्रामुख्याने दोन विभाग होते. सरंजामदारांचे घोडदळ व मध्यवर्ती सत्तेच्या नियंत्रणाखाली असेलेले सरकारी घोडदळ. या सरकारी घोडदळास 'हुजूरपागा' असे संबोधन होते. प्रस्तुत अभ्यास विषयात या 'हुजूरपागेच्या' संबंधी अभ्यास मांडला आहे. 'पेशवेकालीन हुजूर पागा प्रशासन व व्यवस्थापन' हा प्रस्तुत लघुशोध प्रबंधाचा अभ्यास विषय आहे.

सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापना केली. कर्नाटक मोहिमेसारख्या दिग्विजयाने स्वराज्य वृद्धींगत झाले. शिवाजीची 'स्वराज्य' कल्पना सार्वभौम राज्याची होती. मराठ्यांनी आपली गुलामगिरी नष्ट करुन सार्वभौम राजसत्ता निर्माण केली आहे हे राज्याभिषेकासारख्या कृती सोहळ्यातून त्याने जगाला दाखवून दिले.

मराठ्यांचा इतिहासकार ग्रँट डफच्या म्हणण्याप्रमाणे मराठ्यांचे राज्य म्हणजे रानात पेटलेला वणवा होता.[१] परंतु राज्यव्यवस्थेच्या दृष्टीने शिवकालापासून अधिकारांचे सूत्रमय हस्तांतर झालेले आपल्याला पहावयास मिळते.

शिवाजीनंतरच्या २७ वर्षांच्या स्वातंत्र्य लढ्याने शिवाजीने सर्वसामान्य जनतेला आपल्या 'स्वराज्य' कार्यात कसे सहभागी करुन घेतले याचे प्रत्यंतर दाखवून देणारी अनेक उदाहरणे आहेत. अर्थात संभाजीच्या वीर मरणानेही मराठ्यांना स्वतंत्रतेचे स्फुल्लिंग जागृत ठेवणारी एक चेतना निर्माण करुन दिली. शाहूच्या आगमनानंतर मराठे सरदारांनी ताराबाई व शाहू यांच्या कलहाकडे लक्ष न देता, शाहूस विरोध असला तरी मराठे राज्याचा छत्रपती म्हणून स्विकारले. शाहूनंतर मराठी राज्याच्या धन्याकडून पेशव्यांकडे राज्याची सूत्रे आली.

पेशव्यांनाही आपण छत्रपतींचे चाकर आहोत ही जाणीव निश्चितच होती. परंतु साम्राज्य विस्ताराच्या आपल्या धोरणात ही बाब येवू न देता मराठी सत्तेने बलाढ्य सत्तेकडे वाटचाल केल्याचे याच काळात आपल्याला दिसते.

छत्रपतींकडून पेशव्यांकडे जे सत्तांतर झाले ते इतके सावकाश व काळजीपूर्वक घडले की; सर्व मराठा सरदारांनी ते स्विकारुन पेशव्यांचे हात बळकट केले. छत्रपतींची कार्ये पेशवा आपल्या अखत्यारीत करु लागला. यात लष्करी कामकाज, जहागिरीसंबधी, सरंजामदारांसंबंधीची कामे यांचा समावेश होता.

घटनात्मक मालक छत्रपती, पेशवा त्यांचा मुखत्यार आणि खेड्यातील कारभार स्वतंत्र अशाप्रकारचे मिश्रण मराठेशाहीच्या काळात निर्माण झाले. राज्याच्या कारभारात राजेशाही, सरंजामशाही या दोन्ही शासन व्यवस्थेचे रंग पहावयास मिळतात.

पेशवे कालखंडात साम्राज्य विस्ताराच्या धोरणामुळे मराठी राज्याच्या भौगोलिक सीमा उत्तरोत्तर विस्तारीत होत गेल्या त्यामुळे मराठ्यांचे लष्करी संख्याबळही वाढले व मराठी राज्याचे दृढीकरणही झाले.

घोडदळ हा लष्कराचा महत्त्वाचा विभाग होता. घोड्दळास राज्यकर्त्यांनिही निगुतीने वाढविण्याचा केलेला प्रयत्न आपल्याला दिसून येतो. शिवकाळात 'सरनोबत' हा घोड्दळाचा प्रमुख होता, पंचवीस घोड्यामागे पाणी व घासदाण्याकरिता एक इसम नेमलेला असे. एक ब्राह्मण सबनीस, प्रभू कारखानीस, ब्राह्मण मुजूमदार आणि प्रभू जमेनीस इत्यादी लोक घोडदळाच्या प्रशासनाचे प्रमुख असत. पावसाळ्यात बारगिराचे घोडे छावण्यांतून ठेवीत. तेथे चारा व धान्य सामग्री मिळण्याची तजवीज केलेली असे. स्वारांची राहण्याची व्यवस्था असे, प्रत्येक शिपायाला व अंमलदाराला ठराविक वेतन दिले जाई. पागा हजारीला एक हजार होन आणि पागा पंचहजारीला दोन हजार होन याप्रमाणे वार्षिक वेतन होते. घोडदळातील

वरच्या आणि खालच्या वर्गातील स्वारांना रु.२० ते ६ रु.पर्यंत वेतन मिळत असे. वर्षाचे आठ महिने फौजेने मुलूखगिरी करुन चौथ सरदेशमुखीच्या मिळकतीवर निर्वाह पार पाडावा अशी अपेक्षा होती.[२]

छत्रपती शिवाजी महाराजांनी जुमलेदार, हवालदार व कारकून दिम्मत पायगो, मुक्काम मौजे हलवर्ण, ता.चिपळूण मामले दाभोळ यांना पाठविलेल्या पत्रातून मराठाकालीन राज्यकर्ते आपल्या घोडदळास किती महत्त्व देत असत हे दिसून येते या पत्रात त्यांनी अनेक सूचना आपल्या अधिकाऱ्यांना केल्या आहेत.

९ मे १६७४ च्या या पत्रात ते म्हणतात ''मशहुरल अनाम राजश्री जुमलेदारानी व हवालदारानी व कारकुनानी दिमत पायगो मुक्काम मौजे हलवर्ण त।। चिपळूण मामले दाभोल प्रति राजश्री सिवाजी राजे सु।। आर्बा सबैन व अलफ कसबे चिपुलणी साहेबी लस्कराची विले केली आणि याउपरी घाटावरी कटक जावे ऐसा मान नाही...... त।। दाभोलच्या सुभेयांत पावसाल्याकारणे पागेस सामा व दाणा वरकड केला होता. वैशाखाचे वीस दिवस उनाला हेही पागेस अधिक बैठी पडली.... पागेची बेगमी केली आहे त्यास तुम्ही मनास येसा दाणा रतीब गवत मागाल असेल तोंवरी धुंदी करून चाराल नाहीसे जाले म्हणजे मग काही पडत्या पावसांत मिलणार नाही, उपास पडतील घोडी मरावयास लागतील म्हणजे घोडी तुम्हीच मारली अैसे होईल......... पागेस सामा केला आहे तो पावसाळा पुरला पाहिजे यैसे तजविजीने दाणा रातीब कारकून देत जातील तेणेप्रमाणे घेत जाणे....... रंधने करिता, आगट्या जाळीता, अगर रास्त्रीस दिवा घरांत असेल, अविस्त्राच उंदीर वात नेईल, ते गोष्टी न हो. आगीचा दगा न हो. खण, गवत वांचेल ते करणे म्हणजे पावसाळा घोडी वाचली नाही तर मग, घोडी बांधावी न लगेत, खायास घालावे न लगे, पागाच बुडाली!!! तुम्ही निसूर जालेत!!! ऐसे होईल.'' पागाच बुडाली!! यांतून घोडदळाचे महत्त्व ध्यानात येते.[३] रामचंद्रपंत अमात्य 'आज्ञापत्रात' म्हणतात, ''ज्यास जसे

अश्वबल तसी त्याची वृद्धीप्रथा आहे. तद्‌वतच ज्याच्या जवळ आरमार त्याचा समुद्र'' यातूनही घोडदळाचे महत्त्व दिसून येते.[४]

शिवकाळात मराठ्यांच्या घोडदळापेक्षा पायदळाची सैन्य संख्या जास्त होती. याची आकडेवारी इंग्रजांच्या वखारींच्या तत्कालीन पत्रव्यवहारावरुन समजते. १२ नोव्हेंबर १६६८ एका पत्रानुसार शिवाजीने गोव्यावर आखलेल्या मोहिमेत २००० घोडदळ व ८ ते १०,००० पायदळ असल्याचे म्हटले आहे.[५] इ.स.१६७३ मध्ये हुबळीजवळ शिवाजीचे २००० घोडेस्वार व ४००० पायदळ असल्याचे कारवारच्या पत्रातून समजते.[६] इ.स.१६८९ मध्ये राजापूरकरांनी मुंबईस पाठवलेल्या पत्रात शिवाजीकडे पन्हाळा येथे १५,००० स्वार व २०,००० घोडदळ असल्याचे म्हटले आहे. [७]

पेशव्यांच्या कारकिर्दीत त्याच्याउलट परिस्थिती होती. शिवकालातील स्वराज्याचे ध्येय स्वसंरक्षण व राज्यरक्षण होते. औरंगजेबाच्या मृत्युनंतर मुघल साम्राज्याचा ऱ्हास होत असताना मराठे प्रभावीपणे आपल्या साम्राज्य विस्ताराच्या धोरणाला मूर्तरुप देताना दिसतात.

मराठ्यांचे राज्य पश्चिम माहराष्ट्रात उदय पावले आणि त्याचा प्रभाव दक्षिणेकडे म्हैसूर-तंजावर पर्यंत, उत्तरेस काठियावाड, गुजरात, वऱ्हाड, मध्यप्रदेश, कटक, माळवा,बुंदेलखंड, राजपुताना, दिल्ली, आग्रा, दुआब, रोहिलखंडापर्यंत पसरला, बंगाल व आयोध्या प्रदेश मात्र इंग्रजांच्या हस्तक्षेपामुळे बचावले.

पन्नास वर्ष मराठ्यांनी दिल्लीच्या बादशाहीचे प्रतिनिधीत्व मराठा मंडळामार्फत केले या मंडळाचा सर्वमान्य प्रमुख पेशवा होता. तसेच तो दिल्लीच्या बादशाहचा प्रतिनिधीही होता.

संक्रमणाच्या याच काळात मराठ्यांचे घोडदळ मराठी सत्तेचे बलस्थान बनले; कारण दुरवरच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवण्यासाठी घोडदळासारख्या जलद

हालचालींच्या सैन्याशिवाय अन्य पर्याय नव्हता. मराठ्यांना स्वसंरक्षणातून फुरसत मिळून मराठी सत्तेची वाटचाल विजिगीषु वृत्तीने चालली होती.

दूरवरच्या मोहिमांमध्ये पायदळाचे महत्त्व जावून घोडदळास महत्त्व प्राप्त झाले. जून १७८७ च्या पोर्तुगीजांच्या एका कागदपत्रांतून समजते की, 'पेशवे यांचे रणांगणावर ८० ते १ लाख घोडदळ १०,००० पायदळ आणि ४० ते ५० तोफा आहेत. [८]

शाहूच्या काळात मराठे भारतात सर्वत्र पसरले. मराठ्यांचे गायकवाड, दाभाडे, शिंदे, होळकर, रघुजी भोसले इत्यादी सारखे पुढारी मुघल प्रदेशात पाय रोवून उभे राहिले. या स्थितीत अष्टप्रधान पद्धती नाममात्र ठरली व अष्टप्रधानांची व्यवस्था कोलमडून पडली. बाळाजी विश्वनाथाने हे स्थित्यंतर ओळखले व बदललेल्या काळाला अनुसरुन तो वागला. जुन्या अष्टप्रधानांची जागा १८ व्या शतकात मराठा मंडळाने घेतली, पुढील शंभर वर्षे हे मंडळ कर्तुम् अकर्तुम् समर्थ अशा योग्यतेने साऱ्या देशातील घडामोडींचे नियंत्रण करीत होते.

या सामर्थ्याचे बलस्थान मराठा लष्कराचे घोडदळ हे होते. पेशव्यांच्या घोडदळाचे चार विभाग होते १) खाजगी पागा २) शिलेदार ३) एकांडा स्वार ४) पेंढारी यातील पेशव्यांची खाजगी पागा ही सर्वात चांगल्या व्यवस्थेने संपन्न होती, ती चांगली शस्त्रे आणि साहित्यांनी युक्त असून स्वारांना सरकारकडून थेट पगार दिला जाई. काशिराम पंडिताच्या म्हणण्याप्रमाणे पानिपतला एकूण ३८,००० घोडदळापैकी ६००० पेक्षा अधिक 'खासे पागा' नव्हती[९] ही खासे पागा म्हणजेच 'हुजूर पागा' होय. संशोधन प्रकल्पात ह्याच 'हुजूर पागेचा' अभ्यास मांडलेला आहे.

हुजूर पागेचे घोडे जेव्हा लढाई मोहिमा नसतील तेव्हा जागेवर असत. त्यावेळी त्यांना लागणारा चारा सरकारी कुरणातून मिळत असे आणि त्यांच्या सेवेसाठी विनामूल्य व्यवस्था केली जाई, पागेच्या अनुषांगिक कामांसाठी इ.स.१७७५ मध्ये

पारनेर, संगमनेर, पुणे, राहुरी, खेड, जुन्नर, नेवासे, करडे रांजणगाव, गाडापूर, बेलापूर येथून विनामूल्य सेवा उपलब्धीसाठी ३२३ महार, ५४ मांग, ५२ चांभार आणि १० खोगीर दुरुस्त करणारे लोक मागविण्यात आले. त्या लोकांकडे दोरखंड वळणे, खोगीर दुरुस्ती, पागेची साफसफाई, पेशव्यांच्या खाजगी पागेची कामे इ.सारखी कामे सोपविण्यात आली होती.[१०]

१८ व्या शतकाच्या अनुषंगाने मराठी घोडदळाचा विचार करता शस्त्रे व पोषाख यांच्या बाबतीत स्थित्यंतर घडून आल्याचे दिसते. १७५७ मध्ये ग्रोसच्या टिपणानुसार मराठा घोडेस्वार व त्याचे घोडदळातील साथीदार यांचा पोषाख एकदम साधा 'पागोटे, धोतर, खांद्यावर एखादे घोंगडे' असा होता.[११] परंतु १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात परशुरामभाऊ पटवर्धनांच्या सैनिकांचा पोषाख 'तांबड्या लोकरीचे डगले, निळी कॉलर, पूर्ण बाह्यांचा सदरा व त्याला असलेले बंद (नाड्या) असा होता, अर्थात हा पोषाख गारद्यांचा होता.[१२]

मराठ्यांनी आपली आधुनिक शस्त्रांची उणीव परकीय सैन्याची लष्करात भरती करुन भरुन काढल्याचे सहज लक्षात येते परंतु शस्त्रास्त्रे तयार करण्याचे व ती चालविण्याचे शास्त्र किंवा लष्करी कौशल्य आत्मसात करण्याच्या बाबतीत मात्र मराठे नेहमी मागे पडले. असे असले तरी पेशव्यांनी आपली पागा नेहमी समृद्ध करण्याकडे भर दिलेला या संशोधन अभ्यासाच्या मांडणीतून लक्षात येईल.

**संशोधन विषय निवडीचा हेतू :**

प्रस्तावित संशोधनासाठी मराठा कालखंडातील इ.स.१७३० ते १८०५ या पेशवाईच्या पूर्वार्ध व उत्तरार्धातील मराठा लष्कराच्या सरकारी घोडदळाच्या म्हणजेच हुजूरपागेच्या कार्यपद्धतीचे विश्लेषण मांडणे हा या संशोधनाचा हेतू आहे.

**संशोधनाचा उद्देश :**

मराठी राज्य स्थापनेच्या काळापासून पेशवाईच्या अखेरपर्यंत घोडदळाने लष्करीदृष्ट्या अनेक महत्त्वाच्या कामगिऱ्या केल्या आहेत. अनेक असाधरण विजयाबरोबरच पानिपतसारख्या दारुण पराभवाचा सामना मराठी लष्कराने केला. मराठी लष्करातील घोडदळाच्या कार्यपद्धतीवर प्रकाश टाकण्यासाठी संशोधनाच्या दृष्टीने हा विषय महत्त्वाचा ठरतो.

मराठेशाहीच्या कालखंडातील सरकारी घोडदळाचा अभ्यास करणे हा या संशोधनाचा उद्देश आहे.

**संशोधनाचे महत्त्व व गरज** :

पेशवे कालखंडात मराठी लष्करात घोडदळाचे दोन विभाग दिसतात. त्यातील एक म्हणजे पेशव्यांच्या सरदारांच्या नियंत्रणाखाली असलेले घोडदळ व दुसरे खुद्द पेशव्यांच्या म्हणजे मध्यवर्ती राजसत्तेच्या नियंत्रणाखाली असलेले घोडदळ या घोडदळासच हुजूरपागा असे म्हणत. या संज्ञेचा परिपूर्ण अर्थ म्हणजे सरकारी घोडदळ, संशोधन विषयान्वये 'हुजूरपागा' या लष्करी विभागाची कार्यपद्धती, व्यवस्थापन, संघटन इत्यादी गोष्टी अभ्यासाद्वारे सिद्ध करणे हे संशोधनाचे महत्त्व आहे.

आजवर अनेक सिद्धहस्त संशोधकांनी मराठा लष्करावर संशोधन केले आहे. पेशव्यांच्या हुजूरपागेवर संशोधन करणे व अप्रकाशित अस्सल साधनांद्वारे या विषयावरील संशोधनात भर घालण्याची गरज आहे. त्यामुळे अप्रकाशित साधनांवर आधारित संशोधन करणे गरजेचे आहे.

**संदर्भ साहित्याची उपलब्धी स्वरुप आणि आशय** :

पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळाने प्रकाशित केलेली अनेक अभ्यासपूर्ण प्रकाशने संशोधनाच्या दृष्टीने उपयुक्त आहेत. तसेच मंडळातील ग्रंथालयात अभ्यासाच्या दृष्टीने संदर्भग्रंथ उपलब्ध आहेत.

पुरंदरे दफ्तर, बावडा दफ्तर, तुळशीबागवाले दफ्तर, दाभाडे दफ्तर यांसारख्या खाजगी दफ्तरांतील निवडक प्रसिद्ध पत्रेही मंडळाने स्वीय ग्रंथमालेतून प्रकाशित केली आहेत. त्यांचाही संशोधनासाठी उपयोग करुन घेतला आहे.

**उपलब्ध संशोधनाचा आढावा** :

मराठाकाळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक वगैरे बाबींवर विपुल प्रमाणात संशोधन झाले आहे. काव्येतिहास संग्रह, इतिहास मंजिरी, इतिहास संग्रह यांसारख्या आद्य ऐतिहासिक प्रकाशनापासून तसेच भारत इतिहास संशोधन मंडळातील अनेक विद्वान संशोधकांच्या सिद्ध अभ्यासातून ऐतिहासिक वाङ्मयाच्या शृंखलेत नित्य नवी भर पडतच आहे.

मराठा लष्कराच्या कार्यपद्धतीवरही लेखन झाले आहे. रियासतकारांनीही रियासतीमध्ये मराठा लष्करावर प्रकाश टाकला आहे. वि.गो.खोबरेकर यांच्या ‘मराठ्यांच्या स्वाऱ्यांचे मुक्काम’ या पुस्तकातून मराठा लष्कराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण उल्लेख आले आहेत तर ग.भा.मेहेंदळे यांच्या शिवचरित्रात अफजलखान वधापर्यंत मराठी लष्कराच्या हालचालींचे महत्त्वपूर्ण उल्लेख आले आहेत.

किंकेडच्या ‘ A history of the Maratha People' या पुस्तकातील काही उल्लेख मराठा लष्कराच्या दृष्टीने उपयुक्त ठरतात. तसेच मुघलांच्या लष्करी कार्यपद्धतीवरही अनेक विद्वानांनी लेखन केले आहे.

मराठा लष्करातील घोडदळ हे मराठा सत्तेच्या शक्तीचे एक शक्तीकेंद्र व लष्कराचे मर्मस्थान कसे होते याचा अभ्यास या संशोधनाद्वारे मांडला जाऊ शकेल.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब केलेला आहे. प्रस्तुत संशोधनाच्या मागील सैद्धांतिक संकल्पना स्पष्ट करण्यासाठी चिकित्सात्मक,

वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतींचा वापर केलेला आहे. विविध विधानांचे अन्वयार्थ सांगण्यासाठी योग्य त्या ठिकाणी तळटीपा दिलेल्या आहेत.

या संशोधनासाठी मूलत: अस्सल साधनांचा मोठ्या प्रमाणात उपयोग केलेला आहे. त्याचबरोबर समकालीन प्रकाशित अस्सल साधने यांचाही आधार घेतला आहे. संशोधन संस्थाचे अहवाल, पत्रे, चरित्र ग्रंथ, इत्यादी साधनांचा वापर केला आहे.

सदर संशोधनासाठी भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे, पुरालेखागार पुणे, शासकीय ग्रंथालय विश्रामबाग वाडा, स.प.महाविद्यालय पुणे येथील ग्रंथालय इत्यादी संस्थांना भेटी देवून संशोधन साधने संकलित केलेली आहेत.

संशोधन करीत असताना खालील संशोधनाच्या पायऱ्यांचा वापर केला.

१) संशोधन प्रश्नांची निश्चिती

२) संशोधनाच्या परिकल्पना स्पष्ट करणे

३) संशोधन आराखडा बनवणे

४) माहितीचे संकलन

५) अंतरंग व बहिरंग परिक्षण

६) माहितीचे विश्लेषण

७) अन्वयार्थ व निष्कर्ष

८) संशोधन अहवाल लेखन

**संदर्भ साहित्याची उपलब्धता व स्वरुप** :

हा संशोधन प्रकल्प मूलत: अस्सल अप्रकाशित साधनांवर आधारित आहे. पुणे पुरालेखागारातील घडणी दफ्तरात हुजूरपागे संबंधी माहिती असलेले अनेक रुमाल आहेत त्यातील मोडी लिपीतील अस्सल साधनांचा उपयोग संशोधनासाठी करुन घेतला आहे.

पुणे येथील भारत इतिहास मंडळाने प्रकाशित केलेली अनेक अस्सल साधने संशोधनासाठी उपयोगात आणली आहेत. मंडळातील अनेक संदर्भग्रंथांचा आधार संशोधनासाठी घेतला आहे.

पुरंदरे दफ्तर, बावडा दफ्तर, तुळशीबागवाले दफ्तर, दाभाडे दफ्तर यांसारख्या खाजगी दफ्तरातील निवडक प्रसिद्ध पत्रेही मंडळाने प्रसिद्ध केली आहेत त्याचा वापर संशोधनासाठी केला आहे. भारत इतिहास संशोधक मंडळाचे वार्षिक अहवाल, नवभारत मासिक, यांसारख्या दुय्यम साधनांचा वापर संशोधनासाठी केला आहे.

प्रकरण विभागणी :

| **क्रमांक** | **प्रकरणाचे नाव** |
|---|---|
| १ | प्रस्तावना |
| २ | सतराव्या शतकातील प्रमुख राजसत्तांची घोडदळे |
| ३ | हुजूरपागेचे प्रशासन |
| ४ | हुजूरपागेचे व्यवस्थापन |
| ५. | निष्कर्ष |

**प्रकरण पहिले : प्रस्तावना**

पहिल्या प्रकरणामध्ये सुरुवातीला विषय परिचय करुन दिला आहे. परिचयात 'स्वराज्य' स्थापनेपासून पेशव्यांच्या काळात निर्माण झालेले 'मराठा साम्राज्य' याचा संक्षिप्त आढावा घेतला आहे. यातून मराठा घोडदळाचे महत्त्व व पेशव्यांची 'हुजूरपागा' याची ओळख करुन दिली आहे.

संशोधनाचे नाव, संशोधन विषयाची निवड, संशोधनाचा उद्देश, संशोधनाचे महत्त्व व गरज, पूर्व संशोधन, संशोधन पद्धती, संदर्भ साहित्याची उपलब्धी व स्वरुप इत्यादी गोष्टींचा समावेश आहे.

**प्रकरण दुसरे : सतराव्या शतकातील प्रमुख राजसत्तांची घोडदळे**

सदर प्रकरणामध्ये १७ व्या शतकातील मुघल मनसबदारी, मनसबदारांचे वेतन, नियम, मनसबदारांनी बाळगावयाचे घोडे व स्वार, मुघलांचे घोडदळ, मुघल घोडदळातील हुद्दे, नियम,शस्त्रे, वेतनश्रेणी, मुघल घोडदळातील काही अधिकारी इत्यादींची माहिती दिली आहे. तसेच आदिलशाही व कुत्बशाही राज्यांमध्ये घोडदळाची काय व्यवस्था होती याचे विवेचन केले आहे.

**प्रकरण तिसरे : हुजूरपागेचे प्रशासन**

या प्रकरणात संशोधन विषयाचा मुख्य भाग आला आहे. हुजूरपागेसाठी आवश्यक असलेल्या निधीची उपलब्धता, हुजूरपागेची ठिकाणे, हुजूरपागेतील चंदी व रतीब, घोड्यांच्या खुराकाचे व्यवस्थापन, पागेतील घोड्याची सजावट व स्वारांची साधने, घोड्यांची निगा, हुजूरपागेतील अपघात व जखमींचा परामर्ष, हुजूरपागेचे निशाण, सरकारी कामासाठी घोडे वापरण्याची पद्धत, पागेतील कर्मचाऱ्यांना मिळणारी विशेष मदत, लक्षवेधी बाबी, हुजूरपागेकडे केलेली लष्करी भरती, हुजूरपागेची कोठी इत्यादी बाबींचे विश्लेषण केले आहे. हुजूरपागेतील घोडे व जनावरांची संख्या यांची माहिती या प्रकरणात आहे.

**प्रकरण चौथे : हुजूरपागेचे व्यवस्थापन**

या प्रकरणात हुजूरपागेतील प्रशासकीय कर्मचारी, बारगीर, शिलेदार, हूलस्वार, राऊत, खासदार, खासबारदार, रिकिबदार, ढाले, पोरगे, मोतद्दार, चाबुकस्वार, कोठावळे, दाणेकरी, नगारची, जिल्हेदार, आफ्तागीर, सारवान, पखालजी, दिवट्या, साळोत्री इत्यादी कर्मचारी व त्यांचे वेतन, अनुदान या गोष्टींचे स्पष्टीकरण करुन त्यासंबंधी माहिती दिली आहे.

**प्रकरण पाचवे : निष्कर्ष**

या प्रकरणात १८ व्या शतकाच्या अनुषंगाने मराठा सत्ता आर्थिक दृष्ट्या सुबत्ता असणारी होती. त्यामुळे हुजूरपागेकडे सरकारला खर्चासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देता आला. तसेच समाजातील शुभाशुभ लक्षणांचा प्रभाव, मुघल व हुजूरपागेच्या घोडदळातील फरक, हुजूरपागेच्या संघटनामुळे मराठा सत्तेचे बलस्थान कसे होते, हुजूरपागेतील कर्मचाऱ्यांबाबतचे निष्कर्ष, पागेचा खर्च, घोड्यांची निगा, सरकारी कामासाठी नेलेल्या घोड्यांची व्यवस्था, हुजूरपागेची समृद्धता यांसारख्या बाबींवर निष्कर्ष दिलेले आहेत.

**परिशिष्ट :**

परिशिष्टामध्ये अस्सल १३ पत्रांचा समावेश आहे. एक मूळ मोडीपत्र दिले आहे. इतर १२ पत्रांचे मराठी लिप्यंतर दिले आहे. या पत्रांमधून हुजूरपागेसंबंधी महत्त्वाची माहिती मिळते. पागेचा खर्च, कर्मचाऱ्यांना दिले जाणारे अनुदान, घोड्याच्या रतीब, चंदी, खुराक इत्यादींची व्यवस्था, हुजूरपागेसाठी सरकारने केलेली खर्चाची व गवताची तजवीज, खाशा घोड्यांची सजावट, कर्मचाऱ्यांचे वेतन इत्यादी बाबतची माहिती आली आहे. परिशिष्टाच्या सुरूवातीला कोणत्या पत्रात काय मजकूर आहे याचे संक्षिप्त विवेचन दिले आहे.

**पुढील संशोधनाच्या दिशा** :

मराठा लष्करातील घोडदळ विभागाचा 'हुजूरपागा' हा सरकारी घोडदळाचा उपविभाग या विभागाच्या कार्यपद्धतीवर व मराठा लष्कराने केलेल्या लढायांमधील सहभागाबद्दल संशोधन होणे आवश्यक आहे. 'हुजूरपागा' हे सरकारी घोडदळ असल्याने त्याची समृद्धी मराठी सत्तेची सुबत्ता व्यक्त करणारी आहे. या दृष्टीनेही संशोधन होणे आवश्यक आहे.

---

**संदर्भ** :


१) ''महाराष्ट्रातील उच्छृंखल आणि लुटारु वृत्तीचे हिंदू काही काळ दडपले गेले असले तरी त्यांच्या ठिकाणी गुप्तपणे जिवंत असलेली आग त्यांच्यावर राज्य करणाऱ्या विजेत्यांच्या आपसांतील भांडणांनी हडबडून सह्याद्रीच्या रानांत वाळलेले गवत ज्याप्रमाणे पेटते, त्याप्रमाणे ते (हिंदू)वाढत्या ज्वालांनिशी भडकून उठले आणि दूरचे लोक या वणव्याचे आश्चर्य करु लागले''– ग्रँट डफ.

Duff James Grant, A History of the Mahrattas, Longman, Rees, Orme, Brwon and Green, London. 1826, Chap. 1, p.68.

२) रानडे म.गो., मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष, अनु. फाटक न.र., महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्रथमावृत्ती, १९६४.

३) राजवाडे वि.का., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड–८, लेखांक २८, १९०३.

४) अमात्य रामचंद्रपंत, आज्ञापत्र, संपा. कुलकर्णी अ.रा., मानसन्मान प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती २००४.

५) Sen S.N. The Military System of the Marathas, Orient Longmans Private Ltd. Culcutta. 1958, p.64.

६) कित्ता

७) कित्ता

८) कित्ता

९) कित्ता. पृ.६८.

१०) कित्ता. पृ.६९.

११) कित्ता. पृ.७२.

१२) कित्ता

# प्रकरण – २ रे

# सतराव्या शतकातील प्रमुख राजसत्तांची घोडदळे

## २:१ : मुघल मनसबदार :

मराठ्यांच्या घोडदळाविषयी प्रस्तुत शोधप्रबंधात माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. तत्पुर्वी सतराव्या शतकात इतर राजसत्तांची लष्करी व्यवस्था–प्रामुख्याने घोडदळाविषयी ओझरती माहिती घेणे आवश्यक ठरेल. येथे मुघल, आदिलशाही व कुतुबशाही राज्यांच्या घोडदळाविषयी महत्त्वाची माहिती नमूद केलेली आहे.

मुघल साम्राज्य हे मूलतः लष्करी राज्य होते आणि त्यांच्या सैन्यात प्रामुख्याने घोडदळाचा भरणा होता. मुघल साम्राज्यातील सर्व सरकारी अधिकाऱ्यांना मनसबदार म्हणत. बहुतेक मनसबदार हे घोडदळातील अधिकारी असत. त्यांनी घोडेस्वारांचे पथक स्वतः भरती करुन बाळगावयाची असत आणि घोडेस्वारांच्या संख्येच्या प्रमाणात हत्ती, उंट, बैल इत्यादी जनावरे आणि नालबंद, लोहार, मिस्त्री इत्यादी नोकरवर्ग ठेवण्याची जबाबदारीही त्यांच्यावर असे.

मनसबदाराला रोख पैशात किंवा जहागिरीच्या रुपाने म्हणजे नेमून दिलेल्या प्रदेशातून कर घेण्याच्या हक्काच्या रुपाने मोबदला दिला जाई, या मोबदल्याच्या स्वरुपात बदल म्हणजे रोख पैशाऐवजी जहागीर किंवा जहागिरीऐवजी रोख रक्कमेचा मोबदला घेण्याचा संभव असे, मनसबदाराची मनसब सामान्यतः दोन आकड्यात दर्शविली जाई –

एक जातीचा आकडा आणि दुसरा स्वारांचा.

उदा. पाच हजारी जात/ ४००० स्वार.

एक हजारी जात / ५०० स्वार.

शंभर जात / ८० स्वार.

मनसबदाराचा सरकारी नोकरीतील नेमका दर्जा काय आहे हे मनसबीतील जातीच्या आकड्यावरुन समजत असे. दर्जा जितका मोठा तितकाच मनसबीतील जातीचा आकडाही मोठा. दहा जातपासून सात हजार जातपर्यंत जात हुद्दा दर्शविणारे अठ्ठावीस आकडे प्रचलित हाते, शाहजाद्यांना सुरवातीपासून सात हजारी जात किंवा त्यावरील मनसब दिली जाई त्यापेक्षा मोठा जात हुद्दा इतर कोणाला देत नसत.

मनसबदाराने आपल्या पथकात किती स्वार ठेवायचे ते त्याच्या हुद्यातल्या दुसऱ्या म्हणजे स्वार–हुद्दयाच्या आकड्यावरुन समजते, नमूद असलेल्या स्वारांच्या संख्येच्या एक पंचमांश स्वार पथकात ठेवावेत असा नियम होता.

कोणाही मनसबदाराच्या मनसबीतील स्वार हुद्दयाचा आकडा हा जात–हुद्द्याच्या आकड्यापेक्षा मोठा असत नसे.

मनसबदाराला रोख पैशात किंवा जहागिरीच्या रुपाने जो मोबदला मिळे त्यात जात हुद्दयापोटी मिळणारा मोबदला आणि स्वार हुद्दयापोटी मिळणारा मोबदला असे दोन भाग असत. त्यापैकी जात हुद्द्यापोटी मिळणारा मोबदला हे मनसबदाराचे व्यक्तिगत वेतन असे आणि स्वार हुद्दयापोटी मिळणारा मोबदला हा त्याच्या पथकातील स्वारांच्या खर्चाकरीता दिला जाई.

वेतनश्रेणीत एकमाही वेतनापासून बारमाही वेतनापर्यंत श्रेणी ठरलेल्या असत. मुघल सैन्यात एक घोडी, दुघोडी, तिघोडी असा घोडेस्वारांचा दर्जा असे. म्हणजे स्वाराला बसावयाचे घोडे व बाळगावयाचे घोडे असे प्रमाण दर्जावरुन ठरत असे व त्याप्रमाणे त्यांना वेतन दिले जाई. नगदी मनसबदाराला त्याच्या प्रत्येक घोड्यामागे पगाराचा दर पुढीलप्रमाणे पडत असे.

| वेतनश्रेणी | प्रत्येक घोड्यामागे दरमहा रुपये | वेतनश्रेणी | प्रत्येक घोड्यामागे दरमहा रुपये |
|---|---|---|---|
| बारमाही | ४० | सहामाही | २५ |
| अकरामाही | ३७.६ | पाचमाही | २२.५ |
| दहामाही | ३५ | चारमाही | २० |
| नऊमाही | ३२.५ | तीनमाही | १७.५ |
| आठमाही | ३० | दोन माही | १५ |
| सातमाही | २७.५ | एकमाही | १२.५ |

**काही नियम** :

आपल्या हुद्दयानुसार आपल्या पथकात बाळगावयाच्या स्वारांपेक्षा कमी स्वार बाळगणे, पथकांची तपासणी होईल तेव्हा ही लबाडी उघडकीस येऊ नये म्हणून इतर मनसबदारांकडून घोडे उसणे आणणे, कमी दर्जाचे घोडे व स्वार ठेवणे, इत्यादी गैरव्यवहार काही मनसबदार करीत असत. या गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी घोड्यांवर डाग देऊन चिन्हे करण्याची पद्धत अकबराच्या कारकिर्दीपासून मुघल सैन्यात सुरु केलेली होती.

मनसबदाराच्या पथकातील प्रत्येक घोड्यावर डाग देऊन मनसबदाराचे चिन्ह आणि घोड्याच्या दर्जा दर्शविणारे बादशाही चिन्ह अशी दोन चिन्हे केली जात. आईन–इ–अकबरीत घोड्यांचे पुढील सात प्रकार सांगितले आहेत १) अरबी २) पर्शियन ३) मुजन्नस ४) तुर्की, ५) याबू ६) ताजी ७) जंगला.

सामान्यत: मुघल मनसबदारांनी आपल्या पथकात तुर्की घोडे बाळगावयाचे असत. ताजी जातीचे घोडे डागले जात नसत मात्र पथकात बाळगले जात. पंरतु अशा घोड्यांमागे पगारातून ठराविक दराने कपात केली जात असे.

मनसबदार, त्यांना स्वत:ला बसण्याकरिता त्यांनी ठेवलेले घोडे, त्यांच्या पथकांतील स्वार आणि त्या स्वारांचे घोडे या सर्वांची वर्णनपत्रके सरकारी दफ्तरात ठेवली जात. इल्हामुल्हा नावाच्या एका मनसबदाराच्या पथकातील एक स्वार व त्याचा घोडा यांचे जानेवारी १६४९ मधील वर्णनपत्रक पुढील प्रमाणे आहे.

'शेख फरीद याचा मुलगा शेख पर्वीज–वर्ण गव्हाळ, कपाळ रुंद, भुवया विभक्त, मेंढीसारख्या डोळ्यांचा, नाक मोठे, दाढीमिशा काळ्या. चेहऱ्यावर काही डाग, पूर्ण उंची, अंदाजे ३५ वर्षांचा, घोडा–निळा, ठिपक्यांचा, आरुढ होण्याच्या बाजूवर डाग, नंतर मानेवर दोन्ही बाजूंस तीळ वेगळे दिसू लागले, तुर्की (जातीचा).

१५, मुहर्रम, सन २२ – नव्याने डागला गेला.

२५ शव्वाल, सन २३– एक माणूस व एक घोडा यांची तपासणी झाली.

शहाजहान आणि औरंगजेब यांच्या कारकिर्दीतील अशी अनेक वर्णनपत्रके उपलब्ध आहेत.

मनसबदारांच्या पथकांमधील नवीन घोड्यांवर डाग देऊन चिन्ह करणे आणि प्रत्येक पथकाची ठराविक काळाने तपासणी करणे या कामांकरिता दाघ व तस्हीहा (डाग व तपासणी) या नावाचे एक खाते होते. या खात्याचे अधिकारी प्रत्येक पथकाची ठराविक काळाने तपासणी करीत, मनसबदारांची हजेरी–पत्रके ठेवली जात. आपण आपल्या कामावर उपस्थित राहू याची हमी म्हणून जामीन देण्याची बंधनेही मनसबदारांवर असे. जामीनदार हाही मनसबदारच असावा लागे.

## २:२ मुघलांचे घोडदळ :

मुघल साम्राज्यातील मनसबदारी पद्धतीची माहिती वर दिली आहे. आपापल्या पथकांत आपल्या हुद्दयानुसार आणि वेतनश्रेणीनुसार जरुर तेवढे घोडेस्वार बाळगण्याची जबाबदारी मनसबदारांवर असे.

सामान्यत: शहाजाद्यांखेरीज इतर कोणालाही सात हजारी जात/ ७००० स्वार/ ७००० दू असा सिंह अस्पा या हुद्द्यापेक्षा वरचा हुद्दा दिला जात नसे. या हुद्दयाच्या मनसबदाराला एक तृतीयांशाचा नियम आणि बारमाही वेतनश्रेणी लागू असेल तर आपल्या पथकात ४६६७ स्वार ठेवावे लागत. कनिष्ठ हुद्दयाच्या काही मनसबदारांना स्वार हुद्दाच नसे. त्यांच्या पथकात स्वत: मनसबदार एवढा एकच स्वार असे. त्यामुळे शाहजाद्यांची पथके वगळली तर मुघल सैन्यात एकपासून ४६६७ पर्यत स्वार असलेली अनेक लहानमोठी पथके असत.

मुघल सैन्यात आठ हजार मनसबदार आहेत आणि त्या सर्वाच्या पथकामध्ये मिळून १,८५,००० स्वार आहेत असे बादशाहनाम्यात शाहजहानच्या कारकिर्दीच्या विसाव्या वर्षाच्या (इ.स.१६४६–४७) हकीगतीच्या अखेरीस मुघल साम्राज्याविषयी सर्वसाधारण स्वरुपाची माहिती देताना नमूद केलेले आहे.

मनसबदारांनी आपल्या पथकात कोणत्या जमातीचे स्वार किती प्रमाणात ठेवायचे असत याविषयीचे काही नियम औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या अखेरीस लिहिण्यात आलेल्या खुलासतुस्सियाक या ग्रंथात दिलेले आहेत.

उदा. अफगाण मनसबदारांनी आपल्या पथकात दोन तृतीयांश अफगाण स्वार आणि एक तृतीयांश इतर जमातींचे स्वार ठेवावयाचे असत. हे नियम प्रत्यक्षात कितपत पाळले जात होते ते समजण्यास काही साधन नाही. पण एकंदरीत मनसबदारांच्या पथकांमध्ये इराणी, तुर्की, अफगाण, एतद्देशीय मुसलमान, रजपूत, मराठे इत्यादी विविध जमातींचे स्वार असत.

मनसबदारांच्या पथकांमधील स्वारांजवळ धनुष्यबाण, भाला आणि ढाल तलवार ही शस्त्रे असत. त्यांचे घोडे तुर्की, ताजी किंवा याबू जातीचे असत.

ज्या नगदी मनसबदारांना बाहमाही किंवा अकरामाही वेतनश्रेणी दिली जात असेल त्यांना आपल्या पथकात वेतनश्रेणीनुसार ठराविक प्रमाणात तिघोडी, दुघोडी

आणि एक घोडी स्वार बाळगावे लागत. परंतु सामान्यत: त्या वेतनश्रेण्या कोणाला दिल्या जात नसत. नकदी मनसबदारांपैकी ज्यांना सहामाही ते दहामाही यापैकी वेतनश्रेणी असेल त्यांना आपल्या पथकात वेतन श्रेणीनुसार ठराविक प्रमाणात दुघोडी व एक घोडी स्वार ठेवावे लागत आणि ज्यांना त्यापेक्षा खालची वेतनश्रेणी असेल त्यांना आपल्या पथकात फक्त एक घोडी स्वार ठेवावे लागत.

ज्यांना जहागिरीच्या रुपाने मोबदला दिला जाई अशा मनसबदारांपैकी ज्यांना सातमाही ते बारामाही वेतनश्रेणी असेल त्यांना आपल्या पथकात वेतन श्रेणीनुसार दुघोडी व एकघोडी स्वार ठेवावे लागत आणि ज्यांना त्यापेक्षा खालची वेतनश्रेणी असेल त्यांना आपल्या पथकात फक्त एक घोडी स्वार ठेवावे लागत. आठमाही पेक्षा वरची वेतनश्रेणी सहसा दिली जात नसे.

मनसबदार आपल्या पथकाच्या व्यवस्थेसाठी दिवाण व बख्शी आणि पथकातील सैनिकांवर नियंत्रण ठेवण्याकरीता जमातदार इ.लोकांची नेमणूक करीत.

मनसबदारांच्या पथकांखेरीज बादशहाचे असे काही खास घोडेस्वार असत त्यांचा पगार बादशाही खजिन्यातून होई त्यांना अहदी असे म्हणत. अहद्यांमध्ये मुसलमान तसेच हिंदूही असत. मुघल सैन्यात मराठे अहदीही होते.

अहद्यांसंबंधीचे कामकाज पाहण्याकरिता एक मनसबदार नेमलेला असे त्याला बख्शी–इ–अहदीयान असे म्हणत.

अहदी म्हणून नेमणूक होण्याकरिता बादशहाची मंजुरी मिळावी लागे. ज्यांना अहदी म्हणून नेमण्यासंबंधी शिफारस करण्यात आलेली असे पण यासंबंधी बादशहाची मंजुरी मिळावयाची असे तेही अहदी म्हणून कामावर रुजू होत. त्यांना अहदी–इ–तजवीजी असे म्हणत त्या काळात त्यांना पगारही दिला जाई.

प्रत्येक अहद्यांजवळ तुर्की, ताजी, किंवा याबू जातीचे एकापासून चारपर्यंत घोडे असत, प्रत्येक अहद्याला चिलखताचे दोन नग बाळगावे लागत, अहद्यांजवळ

धनुष्यबाण किंवा बंदुका ही शस्त्रे असत, धनुर्धारी अहद्याला अहदी–इ–तीरंदाज असे म्हणत आणि बंदूकधारी अहद्याला अहदी–इ–बर्कंदाज असे म्हणत.

अहद्यांना प्रत्येक दरमहा सुमारी वीस रुपयांपासून शंभर रुपयांपर्यंत पगार असे. या पगारातून अय्याम–इ–हिलाली इत्यादी कलमांखाली सामान्यत: १२.१२५ टक्क्यांपर्यंत रक्कम कापली जाई. अहद्यांची हजेरीपत्रे ठेवली जात. त्यांच्यापैकी प्रत्येकाने बाळगावयाच्या घोड्यांची व शस्त्रांची ठराविक काळाने तपासणी केली जाई आणि त्यांत काही त्रुटी असल्यास त्याच्या पगारातून ठराविक दराने कपात केली जाई. मनसबदारांप्रमाणेच अहद्यांना देखील जामीन द्यावा लागे. मुघल सैन्यात सात हजार अहदी आहेत असे बादशाहनाम्यात शाहजहानच्या कारकिर्दीच्या विसाव्या वर्षाच्या हकिगतीच्या अखेरीस नमूद केलेले आहे.

या सर्व अहद्यांची नेमणूक बादशाह जिथे असेल तिथेच केली जाई असे नाही. किल्ल्यांमधील शिबंद्यांमध्ये आणि निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या हाताखाली देण्यात आलेल्या सैनिकांमध्ये काही अहदी नेमलेले असत. एखाद्या मोहिमेवर एखादी फौज पाठविली जाई तेव्हा तिच्यात मनसबदारांच्या पथकांबरोबर अहद्यांच्या एका तुकडीचा समावेश सामान्यत: केला जात असे.

## २.३ आदिलशाही व कुतुबशाही घोडदळ :

आदिलशाही आणि कुत्बशाही सल्तनतीमध्ये सरदारांनी बाळगावयाच्या पथकांकरिता त्यांना मुकासे दिले जात पण सरदारांनी आपल्या पथकात किती स्वार किंवा प्यादे बाळगावयाचे असत, स्वारांचे घोडे कोणत्या जातींचे असत पथकांच्या तपासणीची काय व्यवस्था होती. सरदारांना काय दराने पगार दिला जाई इत्यादी बाबींविषयी काहीच माहिती उपलब्ध नाही. सतराव्या शतकातील साधनांमध्ये तत्कालीन आदिलशाही सरदारांचे जे नावनिशीवार उल्लेख आलेले आहेत ते पाहिले तर आदिलशाहीत फौजबंद सरदारांची संख्या पन्नासाहून अधिक असेल असे वाटत

नाही. त्यामुळे सरासरी मानाने मुघल मनसबदारांच्या पथकांपेक्षा आदिलशाही सरदारांची पथके मोठी असावीत असे वाटते. कुत्बशाहीतही बहुधा तशीच परिस्थिती असेल. आदिलशाहीत सरदारांच्या पथकांखेरीज खासखैल नावाचे एक घोडस्वारांचे खास पथक थेट आदिलशहाच्या हुकमतीखाली असे. कुत्बशाहीतही थेट कुत्बशहाच्या हुकमतीखाली तसेच एक पथक असे आणि त्यालाही खासखैल असे म्हणत. आदिलशाही आणि कुत्बशाही स्वारांकडे भाला, ढाल, तलवार आणि धनुष्यबाण ही शस्त्रे असत.[१]

## २.४) मराठा घोडेस्वार :

मराठ्यांच्या इतिहासात शिवकाळ व पेशवाईच्या पूर्वार्धात मोठ–मोठ्या मजली मारण्यात मराठा घोडेस्वारांच्या बाबतीत अनेक उदाहरणे आहेत.

उदा.सुरत लुट, संताजी–धनाजीचे मराठ्यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील चपळाईच्या हालचाली, तसेच पहिल्या बाजीराव पेशव्याच्या अनेक लढायांमधील घोडदळाच्या मजला इ. परकीय सत्तांच्या धुरीणांनीही मराठा घोडेस्वारांची लढाई व त्यांच्या हालचाली इ.बाबतीत अनेक महत्त्वपूर्ण उल्लेख केलेले आढळतात. मराठा स्वारांची घोडी कमी उंचीची असत. त्यांना दक्षिणी तट्टू असे म्हणत. यात जातिवंत घोड्याच्या संकरातून निर्माण झालेल्या घोड्यांचा समावेश होता.

मराठा घोडेस्वारांच्या घोड्यांना प्रशिक्षण देण्यासाठी घोडदळात चाबूकस्वारांची नेमणूक केलेली असे. भरधाव घोडा फेकणे, जागेवर घोडे उभे करणे, कमी जागेत घोडे वळवून उलट हल्ला करणे इ.बाबींचे प्रशिक्षण घोड्यांना देत असत.

मराठा स्वारांचे घोडे आपल्या मालकाच्या विशिष्ट खुणा उदा.शीळ, हाळी इ.बाबीही समजत असत. स्वाराने हाळी देऊन थांबण्याची खूण केली तर घोडे जागचे हलत देखील नसे. याबाबतीत ॲबे डुबॉयने स्वत: पाहिलेली हकिगत वर्णन केली आहे. त्यात तो नमूद करतो की, एकदा मराठा स्वाराचे घोडे चोरुन नेण्याच्या

निमित्ताने बेरड त्यावर स्वार होऊन जात असता, घोड्याच्या स्वाराने हाळी देऊन घोडे जागेवर उभे केले मग काही केल्या ते घोडे जागचे हालत नाही व चोरास घोड्यावरुन उडी टाकून पळून जाण्याशिवाय गत्यंतर उरत नाही.

एलफिन्स्टन व एडवर्ड मूर यांच्या निरीक्षणाच्या नोंदी ध्यानात घेण्यासारख्या आहेत. मराठा घोडेस्वारांची घोडी कमी उंचीची असतात पण लढाईत मात्र हे घोडेस्वार अत्यंत चपळ असतात. त्यांची बरोबरी कोणी करु शकत नाहीत. त्यांच्या घोड्याच्या दुमच्या खोगीरास दोन्ही बाजूला बांधलेल्या असतात. मराठा घोडेस्वारांचे सामान व घोड्याचा जमानिमा सांभाळण्यास एखादा महार पोरगा स्वाराबरोबर बाळगला जात होता. आपल्या घोड्याची काळजी हे स्वार घेत असत. खोगीरापेक्षा चारजामा म्हणजे कापूस किंवा कापड भरुन तयार केलेली गादी वापरण्यास प्राधान्य दिले जात होते. दुमच्यांवर चांदीच्या मुदी लावीत किंवा मखमली गोंडे लावत. जेरबंद व पायबंद जवळ बाळगीत. पायबंद भरपूर लांबीचे असत, घोडा विकला तरी पायबंद कधी विकत नसत, कारण ते अशुभ मानले जाई.

मुघलाप्रमाणे घोड्यांना डाग देण्याची पद्धत मराठ्यांकडे नव्हती पण घोडे डागल्याची काही अपवादात्मक उदाहरणे आढळतात. मराठा स्वार आपल्याजवळ, ढाल–तलवार, भाला इ.शस्त्रे बाळगीत असत.[२]

---

संदर्भ :

१) मेहेंदळे ग.भा., श्रीराजा शिवछत्रपती भाग–१, डायमंड पब्लिकेशन, पुणे. पुनर्मुद्रण, २००७.

२) केळकर य.न., भूतावर भ्रमण, डायमंड पब्लिकेशन, पुणे. प्रथमावृत्ती १९४०, पुनर्मुद्रण, २००८.

# प्रकरण ३ रे

## हुजूरपागेचे प्रशासन

हुजूरपागा हे मराठी लष्कराचे स्वतंत्र उपांग होते. याची संपूर्ण व्यवस्था मध्यवर्ती सत्तेकडून केली जात होती. या प्रशासनात अनेक बाबींचा समावेश होता. एखादी संस्था व्यवस्थित चालावयाची म्हटल्यास त्यास अनेक व्यवधाने असतात एखादे सुनियोजीत प्रशासकीय कार्य करण्यास मोठ्या प्रमाणात आर्थिक पाठबळ व योग्य मनुष्यबळ यांचा स्त्रोत आवश्यक असतो.

मराठी सत्तेचा उत्कर्ष होत असताना लष्कराच्या घोडदळास महत्त्व येणे अपरिहार्य होते, पेशव्यांनी जाणीवपूर्वक व निगुतीने आली पागा समृद्ध करण्याकडे भर दिलेला दिसून येतो.

या प्रकरणात घोड्यांच्या विषयी समाजात रूढ असणारे समज, अश्वपरीक्षण, अश्वप्रकृती व औषधोपचार, हुजूरपागेच्या प्रशासनातील निधीची उपलब्धी, पागेतील चंदी–रतीब, घोड्यांचे सजावटीचे साहित्य, पेशव्यांच्या खास अश्वांची देखभाल व सजावट, स्वारांच्या नित्योपयोगी साहित्याची माहिती, पागेतील अपघात, पागेची कोठी व हुजूरपागेतील घोड्यांसह इतर प्राण्यांची निरनिराळ्या वेळेची संख्या इ.बाबतींचा उहापोह केला आहे.

लष्करी व सामाजिक दृष्टीने प्राचीन काळापासून आधुनिक काळाच्या पहिल्या टप्प्यापर्यंत (यंत्रयुगाच्या आरंभीचा काळ) वाहतुकीच्या साधनांमध्ये **'घोडा'** या उपयुक्त प्राण्यास जलदगती व बल यांमुळे समाजात अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले होते कारण त्याकाळी अतिजलद गतीने प्रवास करण्यास घोडा या प्राण्याशिवाय दुसरे अन्य साधन नव्हते, ज्या वाहनावर बसून प्रवास करावयाचा व त्याला कायम जवळ बाळगायचे तर त्याची संपूर्ण परीक्षा करणे अपरिहार्य होते.

अश्वास अनन्य साधारण महत्त्व असणाऱ्या काळात लष्करात भरती केल्या जाणाऱ्या, इतकेच नव्हे तर सामान्य व्यक्तींजवळ असणाऱ्या घोड्यांची अनेक पातळीवर परीक्षा केली जाई व मगच त्यांची किंमत व योग्यता ठरविली जात असे. अशी अश्वपरीक्षा करणारे व अश्वाच्या प्रकृतीची काळजी घेणारे अश्ववैद्य असत. त्यांना 'शालिहोत्री' या नावाने संबोधले जाई त्यांच्याकडील अश्वपरीक्षेच्या पिढीजात वारश्याचा फायदा राजसत्ता व सामान्य जनतेला होत असे. तसेच ज्यांच्याजवळ विपुल संख्येने घोडे असत त्यांनाही स्वानुभवाद्वारे थोडेबहुत अश्वपरीक्षेचे ज्ञान असे. प्रचलित दंतकथा व ऐकीव माहितीतून तत्कालीन समाजास अश्व परिक्षेबद्दल स्वल्प प्रमाणात ज्ञान प्राप्त होत होते. तसेच शुभाशुभ लक्षणांचा प्रभाव समाजात होता.

अश्वपरीक्षा करताना अश्वांच्या एकंदरीत संपूर्ण शरीराचा भाग व रंगरुप यावरुन परीक्षा केली जाई त्याचे संक्षिप्त वर्णन येथे नमूद करीत आहे.[१]

१) **मस्तक परीक्षा** :

अश्वाच्या मस्तकावर शेंडीत बारीक शिंगासारखा भाग असू नये, जर असला तर अशा शिंग असलेल्या अश्वात अनेक खोडसाळपणाचे गुण असू शकतात. कानाजवळ जर असे शिंगासारखे चिन्ह असेल तर तो अश्व अल्पायुषी असण्याचा संभव असतो असे मानले जाई.

२) **कर्ण परीक्षा** :

कानाजवळ व कानाच्या चाफ्यांवर दोन भोवरे असू नयेत. कानाच्या पाळ्यांजवळ उप अवयव निघून तीन कान असल्याचा भास होत असेल तर असा अश्व जवळ बाळगण्यास निषिध्द मानीत असत.

३) **कपाळपरीक्षा** :

कपाळावर तीन भोवरे किंवा भोवऱ्यांची उतरंड कपाळावर असू नये, तसेच दोन, चार असे सम संख्येनेही भोवरे असू नयेत, मात्र कपाळावर चांदणी असल्यास

असा अश्व शुभ समजला जात असे, तसेच घोड्याच्या तोंडावर अनेक ठिपके असल्यास त्यास अशुभ मानीत असत.

४) **नेत्रपरीक्षा**:

घोडा चकणा किंवा 'गारोळ्या' डोळ्याचा असू नये. डोळ्यातून अश्रू येणारा, डोळ्याच्या भुवईवर किंवा खाली भोवरा असणारा अश्व अशुभ समजला जात असे.

५) **नासिकापरीक्षा** :

तोंडावर तीन ठिकाणी तुटक़ पांढरा पट्टा असणारा, नाकात पांढरा डाग असणे, नाकावर भोवरा असणारा, किंवा नाकपुडीवर भोवरा असणारा अश्व निकृष्ट प्रतीचा समजत असत.

६) **मुख परीक्षा** :

काळ्या तोंडाचा, सर्पासारखे मुख असलेले, दाढेखाली भोवरा असणे, बेडूक किंवा पोपटासारखा मुखाचा आकार असणे, वानरमुखी, गर्दभ मुखाचा, ओठांची रचना वेडी वाकडी असणारा अश्व चांगल्या प्रतीचा मानीत नसत. असे अश्व सहसा जवळ बाळगण्यास अयोग्य मानत असत.

७) **दंत परीक्षा** :

चांगल्या प्रतीच्या व जातीच्या अश्वाचे दात पूर्ण वाढ झालेले असतात. पाच, सात, किंवा (कराल–विक्राल) दातांचा, दंतहीन असा अश्व मालकाच्या दृष्टीने अशुभ मानीत. शिवाय मुखात दंतरचना मध्येच असेल, दात चावून मस्तक हलवणे इ.अवगुणांनी युक्त असा अश्व मालकास फलदायी ठरत नाही. असा समज समाजात रुढ होता.

८) **कंठ परीक्षा** :

गळ्याखाली चामडे गोळा होऊन लोंबले आहे, गळ्यावर जागो–जागी भोवरे आहेत असा अश्व कुलक्षणी समजत असत.

९) **गोम परीक्षा** :

अश्वाच्या शरीरावर काही ठिकाणी गोमेसारखी आकृती उमटलेली असते. ही वलयाकृती अश्वाच्या शरीरावर कोणत्या विविक्षित भागावर आहे त्यानुसार त्याची उत्कृष्ठता निश्चित करीत असत. उदा.मस्तकावर, मुखाच्या वरच्या भागावर जर गोम असेल तर ती अशुभ समजत, परंतु मुखाच्या खालील भागावर असल्यास हे शुभचिन्ह समजले जात होते.

१०) **हृदय परीक्षा** :

हृदयावर भोवरा असल्यास अशुभ मानीत तर छातीवर पंचमुखी भोवरा असणारा अश्व शुभ समजत असत.

११) **मानपरीक्षा** :

मानेवर साखळीसारखी आकृती किंवा सरड्यासारखी आकृती ह्या खुणांनी युक्त असा अश्व अशुभ मानत असत.

१२) **आयाळ परीक्षा** :

मानेच्या दोन्ही बाजूस विपुल केसांचे झुबके असणारा अश्व निकृष्ट मानला जाई, तर खुरांवर लांबट केश असलेला अश्व चांगल्या प्रतीचा समजला जात होता.

१३) **फरा, पाठ, चौक परीक्षा** :

फऱ्यावर, पाठीवर, चौकावर भोवरा असणारा अश्व अशुभ मानत असत.

१४) **अंगपरीक्षा** :

शेपूट वर करणारा, शेपटी खाली भोवरा असणारा, अंगावर काळे, हिरवट, तांबडे, पिवळसर, ठिपके असणे, संपूर्ण अंगाचा वर्ण लाल असणे इ. लक्षणांचा अश्व अशुभ मानीत असत.

काळ्या रंगाचा परंतू छातीवर टिका असणारा, एकरंगी पण पोटाच्या एका बाजूस पिवळा रंग असणे असा अश्व सुलक्षणी समजत असत.

एक वृषण असणे, कानाजवळ भोवरा असणारा, पोटास स्तनासारखा फुगवटा असणारा, नाभीजवळ भोवरा असणारा अश्व फलदायी नसतो असा समज रुढ होता.

**१५) गुडघा परीक्षा** :

रिकिबीच्या दोन्ही बाजूस भोवरे असणारा, पुढच्या पायाच्या गुडघ्यावर भोवरा असणारा, पायांवर जखमांचे व्रण असणारा, जांघेत, कुशीवर भोवरे असणारा अश्व निकृष्ट लक्षणांचा मानला जात होता.

## अश्व, रंग–रुप, जात, प्रकृती वर्णन

प्राचीन काळापासून अश्वपरीक्षा केली जात होती. महाभारतकाळात पांडवांपैकी नकुलास अश्वपरीक्षेचे उत्तम ज्ञान होते. अश्वपरीक्षेवर आधारित 'शालिहोत्र' नावाचा संस्कृत ग्रंथ सुखकंद या विद्वान अश्वपरीक्षकाने रचला आहे. या ग्रंथात अश्वाबद्दल जन्मापासून गुणांबद्दल, जाती विषयी, रोग व उपचार यांबद्दल माहिती सांगितलेली आहे.

'शालिहोत्र' संग्रह नावाचाच हिंदी भाषेतील छंदोबद्ध ग्रंथ केशवजी सिंहजी यांनी २० व्या शतकात रचला व प्रकाशित केला या ग्रंथात अश्वोत्पती, आयुष्यप्रमाण, रंगवर्णन, शुभाशुभ लक्षणे, शरीररचना, दंतविचार, वेगवर्णन, अश्व चिकित्सा, रोग व व्याधी उपचार इत्यादी सर्व गोष्टींचा सांगोपांग विचार केला आहे व उपयुक्त माहिती छंदोबध्द वर्णन केली आहे.

या ग्रंथातील काही उपयुक्त माहिती अश्वपरिक्षकांना मार्गदर्शक तर आहेच. शिवाय अस्सल कागदपत्रांत वारंवार आढळणाऱ्या विशेषणांचे स्पष्टीकरण करण्यास या ग्रंथाचा चांगला उपयोग होतो. केशवसिंहजींच्या ग्रंथात अश्वांचे रंगवर्णन, वातविकार, अशुभ लक्षणांवर आधारित चित्रे मोठ्या प्रमाणात छापलेली आहेत हे या ग्रंथाचे महत्त्वाचे वैशिष्ठ्ये म्हणावे लागेल.

या ग्रंथात अश्वाचे रंगवर्णन, जात, प्रकृती, रोग व व्याधी उपचार यांचा विचार केला आहे.[२]

**रंगवर्णन** :

रंगावरुन अश्वाचे एकूण २६ प्रकार मानले जातात पैकी नेहमी आढळणारे रंगप्रकार येथे नमूद केले आहेत.

१) **श्यामकर्ण अश्व**:

रंगवर्णनानुसार प्रथम क्रमांकाचा अश्व, कपाळावर थोडा केशसंभार, काळसर रंगाचे कान, खूर पिवळसर असलेला अश्व रंगवर्णनात प्रथम क्रमांकाचा ठरतो असा घोडा रामाश्वमेधात सोडल्याचा दाखला आहे.

अशाच लक्षणांचा घोडा युधिष्ठीराच्या अश्वमेधात सोडला होता.

२) **नीला अश्व** :

येथे श्वेत वर्णच अपेक्षित आहे. श्वेत वर्ण म्हणजे पांढऱ्या अश्वास कधीही पांढरा घोडा म्हणत नाहीत. नीला घोडा असेच संबोधन वापरतात.

३) **कुम्मैत रंग** :

काळी शेपटी व पुढील दोन पाय काळे असलेला अश्व म्हणजे कुम्मैत रंगाचा अश्व होय.

४) **तेल्या कुमाईत** :

लाखेसारखा तांबडा रंग, पाय व शेपूट काळ्या रंगाची असणारा अश्व.

६) **चक्रवाक** :

पाय पांढरे व मुख पांढरे असणारा अश्व म्हणजे चक्रवाक अश्व होय.

७) **श्वेत चरण** :

पुढील दोन्ही पाय पांढऱ्या रंगाचे व शरीर दुसऱ्या रंगाचे असणारा अश्व असा अश्व अशुभ मानीत असत.

८) **श्याम वर्ण** :

संपूर्ण शरीर चमकदार काळ्या रंगाचे असणारा अश्व.

९) **अंबरी** :

पांढऱ्या रंगाच्या अश्वावर काळसर पुसट ठिपके असणारा अश्व.

१०) **पंचकल्याण रंग** :

चारही पाय गुडघ्यापर्यंत पांढरे शिवाय कपाळावर पांढरा चांदवा असणारा घोडा पंचकल्याण अश्व समजला जातो.

११) **अबलख** :

काळा पांढरा रंग, परंतु काळा रंग ऊर्ध्व असणारा अश्व म्हणजे अबलख अश्व होय.

## अश्वप्रकृती

मनुष्याप्रमाणेच अश्वही वात, पित्त, कफ या प्रवृत्ती असून यांनाच त्रिदोष असे म्हणतात, अश्वातही या प्रकृती आढळतात. मूळ प्रवृत्तीचे संतुलन बिघडले की शरीर स्वास्थ्यावर परिणाम होतो. त्रिदोष विकार उत्पन्न करतात. ऋतुमान बदलले की, त्रिदोष आपला प्रभाव दाखवतात. यातूनच प्राण्यांस दुखणे उद्‌भवते. त्रिदोषाचा जोर वाढला की, अश्वही आजारी पडतात. त्याचे आजारपण त्यांच्या अंगविक्षेपावरुन आवाजावरुन जाणून घेता येते. उद्‌भवणाऱ्या आजारावर उपचार वेळीच केले नाहीत तर त्याचे स्वरुप बदलते व आजार विकोपास जावून जीवघेणा ठरतो.

लष्करी दृष्ट्या अश्वाचे महत्त्व असल्याने त्याच्या प्रकृतीची हेळसांड होऊ नये यासाठी विशेष काळजी घेतली जात होती. कारण धष्टपुष्ट अश्वच मोहिमांमध्ये मजला मारुन स्वपक्षाच्या विजयावर शिक्का–मोर्तब करीत असत. यामुळे निरोगी अश्व लष्करी पथकात असणे गरजेचे होते.

**रोग  व व्याधी उपचार** :

**रोग** : त्रिदोष प्रकृतीमुळे उद्भवणारे मानव विकार अश्वांनाही होतात. त्यांची लक्षणे जाणून घेऊन योग्य ते उपचार केले जात यांत वैद्यकिय व दैवी उपायांचा समावेश होता. अश्वांना होणाऱ्या काही प्रमुख रोगांची यादी येथे समाविष्ट केली आहे.

**रोग नामावली** :

| | | |
|---|---|---|
| ज्वर | : | मंदाग्नि, बिभित्स, त्रिशिर, कपिल, भस्मप्रहार, त्रिपाद, पिंगाक्ष, लंबोदर, भैरव, इ.प्रकारचे ज्वर उद्भवत असत. |
| त्रिदोष | : | वात, पित्त, कफ रक्तदोष, सन्निपात. |
| पोटाचे विकार | : | अतिसार, अजीर्ण, वातगुल्म, पोटशूल, पोटफुगी, वायुशूल, कृमी, कुरकुरी, जलोदर |
| मूत्र रोग | : | मूत्र अवरोध, मूत्र आर्वत, कंडू, मूत्र प्रमेह. |
| रक्त रोग | : | रक्तदोष, रक्तप्रमेह, रक्त आर्वत. |
| चर्म रोग | : | चाई, खरुज, गजकर्ण, केस झडणे. |
| नेत्र विकार | : | रात आंधळेपणा, मोतीबिंदू, नेत्र कृमी, डोळ्यातून पाणी येणे, काचबिंदू, डोळ्यात फुल पडणे. |
| इतर विकार | : | दमा, कोरडा खोकला, गंडमाळा, मस्तक शूल, जखम, व्रण इत्यादी. |

**औषधोपचार** :

उपर्युक्त वर्णन केलेल्या रोगांवर शक्य ते उपचार केले जात होते यासाठी शालहोत्र चिकित्सक आपल्या ज्ञानाचा व उपलब्ध औषधी सामुग्रीचा वापर करुन व्याधी आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करीत. यात प्रामुख्याने वनस्पतीजन्य व खनिज औषधींचा समावेश होता. येथे काही औषधी घटकांची नावे नमूद केलेली आहेत.

**विशेष औषधी** : हयातवटी, अमृतवटी, ईगुर गुटीका, कामधेनू चूर्ण.

**औषधी घटक पदार्थ** :

कुटकी, नागकेशर, नागरमोथा, पिंपळी, लवंग, गंधारीफळ, सालंमिश्री, वंशलोचन, जिरे, पांढरी विलायची, गाईचे दूध, शुध्द तूप, वावडींग, पिंपरीमूळ, सैंधव, मसुर, मिरची, हिंग, लसूण, कडू तेल, कापूर, मंजिष्ठा, गज पिंपळी, गुडची, इंद्रजण, त्रिफळा चूर्ण, काकडशिंगी, खसखस, खुरासनी ओवा, तीळ तेल, देवदार, कागदी लिंबू, चंदन, लाल मिरची, तुरटी, गुळ, अजमोंदा, जायफळ, कायफळ, मायफळ, सुंठ, गोमूत्र, कलौंजी, शेंदूर, धूप, अफू, मध, साबण, भीमसेनी कापूर, जटामासी, इंद्रजवण इ.

**प्राणीज औषधी घटक** :

टिटवीची अंडी, मेंढ्याचे मांस, कोंबड्याचे मांस, अंडी, राहू मासा, बोकडाची मुंडी, बोकडाची चरबी, शेळीचे दूध इत्यादी, याशिवाय मेवा मिठाई व तीळ कुटून त्यांचा वापर औषध म्हणून केला जात होता.

**आहार** :

ऋतुमानानुसार अश्वांना बदलता आहार खुराक म्हणून दिला जात होता. यात पोषक़ व चौरस आहाराचा समावेश केला जाई. त्यामुळे अश्वांची प्रकृती उत्तम राहण्यास मदत होत असे व आजारी पडण्याचे प्रमाण कमी होत असे. ऋतुमानानुसार पुढीलप्रमाणे पदार्थांचा आहारात समावेश केला जात होता.

**वसंत ऋतु** :

यव धान्याची रोटी, धृत, त्रिफळा चुर्ण, लिंबू इ. चैत्र महिन्यात खुराकात हळद व तेल तसेच सातू यांचा समावेश करीत असत.

**ग्रीष्म ऋतु** :

घृत, गुलाबपाणी, खडीसाखर, कलौंजी यांचा वापर खुराकात केला जात असे.

**वर्षा ऋतु** :

वर्षा ऋतुत अश्वांची शक्ती क्षीण होते. अशा ऋतुत त्यांना विहिरीचे पाणी पिण्यास देणे, तेलाने मालीश करणे, एरंडेल तेल पाजणे, इत्यादी गोष्टी करीत खुराकात तांदळाची खीर, खसखस वाटून केलेली खीर, इ. समावेश करीत.

**शरद ऋतु** :

खीर, खांड्सरी साखर, दुधभात, धृत, हळद-गुळ कुटून केलेले गोळे इत्यादी पदार्थांचा खुराक दिला जाई.

**हेमंत ऋतु** :

घृत पिण्यास देणे, आठ टाक तेल एकवीस दिवस पाजणे, हरभरे खाऊ घालणे इत्यादी आहार देण्यात येत असे.

**शिशिर ऋतु** :

गव्हाच्या पीठात तांबडे तिखट मिसळून देणे, पिंपळी, मिरची, सुंठ यांचे चूर्ण देणे, डाळीच्या पिठात गूळ मिसळून देणे शिवाय लोणी, दही, बकरीचे दूध इत्यादी पौष्टीक आहार शिशिर ऋतुत देत असत.[२]

### ३.१ हुजूरपागेसाठी आवश्यक असलेल्या निधीची उपलब्धी :

एखादे संघटनात्मक कार्य वर्षानुवर्षे नियमबद्ध चालू ठेवण्यासाठी आर्थिक स्त्रोताची गरज असते. हजारोंच्या संख्येने असलेल्या पागेतील प्राण्यांची व्यवस्था व कर्मचाऱ्यांना मिळणारे वेतन, अनुदान यांसाठी लागणारा आर्थिक निधी दरवर्षी मोठ्या प्रमाणावर शासनास उपलब्ध करुन द्यावा लागत होता.

मध्यवर्ती शासन म्हणजे पेशव्यांकडून पागेच्या खर्चासाठी दरवर्षी ज्या निर–निराळ्या सरकारी खात्यांमार्फत आर्थिक निधी उपलब्ध करुन दिला जात होता त्याबाबी येथे नमूद केल्या आहेत.

पेशव्यांच्या ताब्यात असणाऱ्या प्रांतामधील काही गावांचे संपूर्ण महसुली उत्पन्न पागेच्या खर्चासाठी राखीव ठेवीत. पुणे प्रांतापुरते सांगावयाचे झाल्यास हवेली तर्फेतील फुरसुंगी, सांडस तर्फेतील पिंपळगाव, पाटस तर्फेतील पारगाव या गावांचे संपूर्ण महसुली उत्पन्न हुजूरपागेच्या खर्चासाठी दिले जात होते. त्याचे तपशीलवार वर्णन पुणे पुरालेखागारातील घडणी दफ्तर रूमाल अंक ३५६ यातील कागदपत्रांत आढळते.[३]

**पोता खर्च** :

पोता म्हणजे मध्यवर्ती शासनाचे कोषागार या सरकारी खजिन्यात अनेक मार्गांनी रक्कम जमा होत असे. विविध प्रकारचे महसुली कर, अंमलाखाली असलेल्या प्रदेशातील मांडलिक सत्तांकडून मिळणारी खंडणी, शासनाने गुन्हेगारांना केलेले दंड, इनाम जमिनीसाठी घेण्यात आलेले नजराणे, एखाद्या राजपत्रित पदासाठी घेण्यात आलेली रक्कम, यांच्या संकलनातून जमा होणारी रक्कम सरकारी कोषागारात भरणा केलेली असे.

या कोषागारात उपलब्ध असणाऱ्या निधीपैंकी काही आवश्यक रक्कम पागेच्या खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येत होती.

**परभारे खर्च**:

परभारे या सदराखाली उपलब्ध करुन दिल्या जाणाऱ्या निधीत परस्पर भागवल्या जाणाऱ्या खर्चाचा समावेश होता.

यात प्रामुख्याने कमाविसदारांकडून जमा होणाऱ्या रसदेपैकी काही भाग पागेच्या खर्चासाठी उपलब्ध करुन दिला जात होता.

काही वेळा एखाद्या व्यक्तीकडून येणे असलेली सरकारच्या हक्काची रक्कम परभारे खर्च म्हणून पागेसाठी खर्च केली जात होती.

एखाद्या मांडलीक सत्तेकडून येणारी खंडणीची रक्कम पागेच्या विविध प्रकारच्या खर्चासाठी तरतूद म्हणून वरात देवून खर्च केली जात होती. इ.स.१७५०–५१ मध्ये जामदारखाना, प्रांत वसई, सातारा येथील सरकारी कोठी, भागानगर येथील जमा झालेली रक्कम, पेशव्यांच्या वैयक्तिक खर्चातून खर्च केलेली रक्कम, दरमहा जमा होणारी सरकारी रक्कम, परस्पर पागेसाठी भागविलेला खर्च या सर्व मार्गानी मिळवून हुजरपागेचा वार्षिक खर्च ३,४१,१८४।≡।। (तीन लाख एक्केचाळीस हजार एकशे चौऱ्याऐंशी रूपये, साडेसात आणे) इतका झाला होता. (पहा. परिशिष्ट पत्र क्र.१२)

**जामदारखाना** :

जामदारखाना म्हणजे सरकारचे मध्यवर्ती कापड व मौल्यवान धातूचे कोषागार. इ.स.१७४०–४१ मध्ये जीनाच्या गाद्यांसाठी, सरोसरा तयार करण्यासाठी, बारगीरांना अनुदान स्वरूपात दिले जाणारे कापड, कर्मचाऱ्यांना मदत म्हणून दिले जाणारे कापड, पागेच्या निशाणासाठी, खाशा घोड्यांच्या सजावटीसाठी जामदारखान्यातून कापड उपलब्ध करून देण्यात आले. (पहा. परिशिष्ट पत्र क्र.४, ५, ६)

पागेच्या कर्मचाऱ्यांना मिळणारे अनुदान स्वरुपातील कापड, घोड्यांच्या सजावटीचे साहित्य व घोडेस्वारास स्वार होण्यासाठी लागणारी आवश्यक साधने यांसाठी कापड, लोखंड, सोने, रुपे यांची आवश्यकता असे यासाठी आवश्यक असणाऱ्या खर्चाची तरतुद जामदारखान्यातून केली जात होती.

**हुजूरपागेचा वार्षिक खर्च** :

इ.स.१७३९ मध्ये हुजूरपागेचा एकूण वार्षिक खर्च रुपये १,०१,४५६।। (एक लाख,एक हजार, चारशे छप्पन रुपये, नऊ आणे) इतका झाला होता.

इ.स.१७६९ मध्ये हुजूरपागेचा एकूण वार्षिक खर्च रुपये –

३,७३,६८२.[6] ≡।। (तीन लाख, त्र्याहत्तर हजार, सहाशे ब्याऐंशी रुपये, तीन आणे, दोन पैसे) इतका झाला होता.[४] इ.स.१७८० च्या दशकात हुजूरपागेच्या खर्चाची मर्यादा चार लाखांच्या पुढे गेलेली होती.

**३.२ हुजूरपागेची ठिकाणे** :

हुजूरपागा ही एकाच ठिकाणी होती असे नाही. मध्यवर्ती शासनाच्या अनेक ठिकाणी पागा होत्या. काही ठिकाणी तर्फेच्या कारभाराचे ठिकाण असणारे ठाणे येथेही सरकारी घोडदळाची म्हणजे हुजूरपागेची व्यवस्था असे.

पुणे प्रांतापुरते सांगावयाचे झाल्यास पुण्यात, हवेली तालुक्यातील कवडी, खेड तालुक्यातील चास, जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे हुजूरपागा होत्या.

**३.४ हुजूरपागेतील चंदी व रतीब** :

पागेसाठी आवश्यक असणाऱ्या चंदीच्या बेगमीसाठी सरकारतर्फे विशेष लक्ष पुरवले जात होते. सरकारकडून ठराविक कालावधीने महसुली जमाबंदीचा ठराव होत असे, त्यावेळी कोणत्या गावाने गवत व कडब्याच्या किती पेंढ्या महसुलादाखल सरकारकडे जमा करावयाच्या ते निश्चित केले जाई. या गवत/कडब्याच्या पेंढ्या जमा करण्यासाठी व राबते महार, मांग, चांभार यांच्या नेमणुका पागेकडे करण्यासंबंधी दरवर्षी प्रांतोप्रांतीच्या कमाविसदारांच्या नावे पेशव्यांकडून आज्ञापत्रे दिली जात होती. याशिवाय सरकारच्या मालकीच्या बागा, शेरी, जमिनी व कुरणे यांत उत्पन्न होणारे गवत–पागेच्या चंदीसाठी राखून ठेवीत. कुरणांच्या रखवालीसाठी सरकारकडून माणसे नेमलेली असत. त्यांना कुरणे असे म्हणत.

पुणे प्रांतात सरकारच्या वडकी, लोणी, मांजरी बुद्रुक येथील बागा, तर वडकी, लोणी, फुरसुंगी, कालवडी, मांजरी खुर्द, लोणी व फुरसुंगी इ.गावांच्या शीवेवरील काही जमिनी–अशा सहा ठिकाणच्या शेरी जमिनी व कोलवडी, थेऊर,

मांजरी बुद्रुक, आळंदी, लोणी, वडकी, कवडी, आर्वी, कसबे पारनेर व वडझिरे इत्यादी ठिकाणी मिळून अकरा सरकारी कुरणे होती. यात उत्पन्न होणारे गवत पागेसाठी राखून ठेवले जाई.

हुजूरपागेच्या बेगमीसाठी दरवर्षी सरकारला दोन लक्ष पन्नास हजार गवत किंवा कडब्याच्या पेंढ्या आणि तीनशे ते पाचशे खंडी धान्य लागत असल्याच्या नोंदी आढळतात.

इ.स.१७५०–५१ मध्ये कवडी, चाकण, उंबरे, असी इत्यादी ठिकाणी असलेल्या हुजूरपागेतील घोड्यांचे खाद्य, पागेचे गवती खण बांधण्यासाठी म्हणून विविध ठिकाणाच्या कमाविसदारांकडून सुमारे १० लाख (१०,००,०००) गवताच्या पेंढ्या जमा करण्यासाठी सरकारी आदेश देण्यात आले व त्या पेंढ्या कोणत्या ठिकाणी किती पाठवाव्यात हे सुद्धा नमूद करण्यात आले. (पहा. परिशिष्ट पत्र क्र.११)

इ.स.१८०५ च्या उपलब्ध यादीतील काही भाग येथे उद्धृत करीत आहे. त्यावरुन वरील बाबींची कल्पना येईल.

३. बागा प्रांत पुणे

१ मौजे वडकी  जमीन लागली नाही.

१ मौजे लोणी $^{6}$९।।।३। जमीन

१ मौज मांजरी बु।। जमीन $^{6}$१०।.।।२

३

६  सेऱ्या प्रांत पुणे पैकी

१ मौजे लोणी जमीन १।।१७$^{6}$।।।३

१ मौजे वडकी तल्याजवळील आंबराई तीन सेरी बागसुद्धा

चावर ।।१७।।।२$^{6}$४

१ मौजे फुरसुंगी जमीन .।१।।।४।।

१ मौजे कोलवडी जमीन १$^{6}$२।।।४।।

१ मौजे मांजरी खुर्द जमीन .।१५।।३

१ शिवेची जमीन मौजे लोणी फुरसुंगी चावर १।२१$^{6}$२$^{6}$३

६

## ११ कुरणे प्रांत पुणे पैकी

१ कोलवडी व मांजरी वागजाईचे बेटासुद्धा

१ मौजे थेऊर नदीचा थडवा

१ मौजे कोलवडी जातेसिंगाचे बेट सुद्धा नदी थडवा

१ मौजे मांजरी बुद्रुक

१ मौजे आळंदी डोंगरी रान

१ मांगदरा डोंगरी रान मौजे लोणी

१ मौजे वडकी तल्याचेखाली जवळचे डोंगरी

१ मौज कवडी चराऊ रान पूर्वेस व दक्षिणेस

१ मौजे आरवी तर्फ खेडेबारे

१ कसबे पारनेर व वडझिरे परगणे पारनेर [५]

११

## ३.५ घोड्यांच्या खुराकाचे व्यवस्थापन :

लष्करीदृष्ट्या घोड्याचे आरोग्य निरोगी व सुदृढ असणे गरजेचे होते यासाठी त्यांच्या खाण्या पिण्याची व्यवस्था काळजीपूर्वक करीत होते, असे दिसून येते.

एका घोड्यास दररोज १० गवताच्या पेंढ्या किंवा ५ कडब्याच्या पेंढ्या लागत. हरभरे, मूग, उडीद, कणीक, ज्वारी, बाजरीचे पीठ इत्यादी मिळून दररोज सव्वा पायली वजनाचे खाद्य घोड्यास लागत होते. घोडा थोराड म्हणजे मोठा

असल्यास गवत १५ पेंढ्या व खाद्य दीड ते पावणेदोन पायलीपर्यंत लागत असे. गूळ–हळद इ.जिनसांचा खुराकही देत असत.

घोड्यांना अंघाळ घालण्यासाठी दही–दुधाचा वापर करीत असत. प्रवासातील मजल दरमजलीमुळे घोड्यांची दमणूक होई, अशावेळी मजल मसाला म्हणून घोड्यांना लोणी, गूळ, हळद, भांग, अफू इत्यादी जिन्नसांचा खुराक देत असत.

इ.स.१७५५–५६ मध्ये नानासाहेब पेशव्यांच्या वारु नावाच्या घोड्यास मिठाई खाण्यास दिली जाई. तसेच त्याला पेढ्यांचा खुराकही होता. हुसेनभाई मोतद्दार या घोड्याची निगा राखण्याचे काम करीत होता. तो नानासाहेब पेशव्यांच्या फार मर्जीतला माणूस होता, असे त्याला वेळोवेळी बक्षीसा दाखल मिळालेल्या रोख रकमा व वस्त्रे यांच्या नोंदीवरुन ध्यानात येते [६]

इ.स.१८१३ मध्ये बाजीराव दुसरा पंढरपुरास गेला असता त्याच्यासोबत असणाऱ्या हुजूरपागेच्या घोड्यांसाठी औषधे, खुराक, मजल मसाला इत्यादींची व्यवस्था करण्यात आली. (पहा. परिशिष्ट पत्र क्र.१)

**पागेतील घोड्यांची सजावट व स्वाराची स्वार होण्यास लागणारी साधने**

घोड्यावर स्वार होण्यापूर्वी लागणाऱ्या साहित्याचा दर्जा उच्चप्रतीचा ठेवण्याकडे लक्ष दिलेले दिसते. यात लगाम, अनीन, जीन, जीनाच्या गाद्या, खोगीर, मांडगादी, भुरकी, दुमची, सरोसरा, गेंदजोड, गाशा, तोबरे, पट्टा, चारजमा, पायबंद इत्यादी जामाजिमा घोड्यास असे. अनीन देशी कातड्याची किंवा चिमणगिरी अशा प्रकारांची असे, त्याची किंमत एक ते दीड रुपया इतकी होती.

जीनाचे दक्षिणी, मोगली, फिरंगाणी इत्यादी प्रकार असत, नवीन जीन तयार करण्यास साधारणपणे ३ रु. मजुरी लागत होती, जीन सकलाद किंवा मखमलीने मढवीत असत. जीनाच्या गाद्या, खादी पासोड्याच्या किंवा गजनीच्या असत, त्यावर मखमलीचे वेष्टन करीत. मांडगादीही लोडासारखी असून ती स्वाराच्या मांडीखाली

घ्यावयाची असे, गादीसाठी वापरण्यात येणाऱ्या मखमलीच्या किंमतीनुसार गादीची किंमत ठरत असे, मखमल काळी हिरवी, पिवळी व लाल रंगाची असे. मखमलीचा दर तीचा रंग व पोत यांवर अवलंबून असे. साधारण प्रति गज ९ रुपयांपासून ४० रुपयांपर्यंत दर होता.

भुरक्या खादी पासोडीच्या असत, किंमत दीड रुपयांपर्यंत असे. दुमची व सरोसरा सकलादी, मखमली असत गेंद गोड साध्या कापडाचे किंवा रेशमी असत. गाशाला खादीचे अस्तर असे, मखमल किंवा छीटाचे वेष्टन त्यावर घालीत, किनखापी कापडही त्यासठी वापरले जाई. तोबरे गोणपाट किंवा चामड्याचे केलेले असत. चारजामे विशेष प्रकारचे तयार करवून घेत. भारी किंमतीचे मखमली कापड त्यासाठी वापरीत असत. चवाली म्हणजे झूली कांबळ्याच्या असत. पायबंदासाठी सुती नवार वापरली जात होती.[७]

## ३.६ खासा स्वारीच्या घोड्यांची सजावट :

खासा स्वारीच्या म्हणजे खुद्द पेशव्यांच्या घोड्यांची ज्याप्रमाणे विशेष निगा राखीत त्याप्रमाणे त्यांची सजावटही किंमती असावयाची. अनीना मखमली किंवा रेशमी असत. गाद्या गजनीच्या मखमली तयार करवून घेत, त्यावर किनखापी कलाबूत असे, जीन उच्च प्रतीच्या मखमलीने मढवीत असत. खास स्वारीसाठी घोड्यांचे पट्टे, दुमच्या, सरोसरा सोन्याच्या असून त्यावर मखमली चिबे लावीत, गेंदगोड रेशमी असत, झूली भरजरी किनखापी कलाबुतीच्या असत, चाबकास रेशमी गोंडे लावीत, प्रसंगी घोड्यास सोने, रुपे, माणिक यांचे अलंकार घालीत. खासा घोडी रंगवण्यासाठी मेहंदी व चमेली तेलाचा वापर केला जात असे.

उदा.इ.स.१७५० मधील एका नोंदीनुसार जानकीबाईच्या घोड्यास जो चाबुक वापरला जाई त्यास पाव तोळे वजनचा रेशमी गोंडा लावण्यात आला होता.[८] क्वचित घोड्यावर खासा स्वारीचा हौदा असे. इ.स.१७५६–५६ मधील एका नोंदीनुसार असा

हौदा मखमली तयार करवून घेऊन त्यावर जरीच्या कापडाचे छत्र बसविण्यात आल्याची नोंद आहे.

### ३.७ घोड्याची निगा :

घोडा हा प्राणी जितका उमदा–चपळ तितकाच नाजुकही, पागेतील घोडी आजारी पडू नयेत म्हणून त्यांची काळजी घेतली जात असे. साळोत्री नावाच्या अश्वचिकीत्सकाची पागेत नेमणूक केलेली असे, दरवर्षी मृग नक्षत्राच्या सुरवातीस घोड्यांना पावसाळा बाधू नये म्हणून औषध देत असत.

शिंगरांना शेळीचे किंवा गाईचे दूध पाजत. घोड्यास जाळी पडणे नावाचा आजार होत असे. त्यावर उपाय म्हणून नीळ, साबण, तेल इत्यादींचा वापर करीत. इ.स.१७५०–५१ मध्ये हुजूरपागेतील शिंगराना शेळीचे दुधाची व्यवस्था म्हणून करडे रांजणगावचा कमाविसदार माणकोजी बांदल याने २८ शेळ्या रवाना केल्याची नोंद उपलब्ध आहे. (पहा. परिशिष्ट पत्र क्र.८)

कुरकुरी नावाच्या रोगाने घोड्याचे पोट बिघडायचे अशावेळी त्यास बकऱ्याचे ताजे रक्त पाजले जाई. जहरबाज विषबाधा झाल्यास आंबेहळद, कुटकी, मिरे, ओवा, मोहरी, लसूण, काळे जिरे, सुंठ इत्यादी जिन्नसांपासून औषधे तयार करुन ती घोड्यास देत असत. [९] घोड्यांना ताप आल्यास त्यावर इलाज म्हणून हळद, काळेजिरे यांचा खुराक देत असत. गरमी झाल्यास दहीभात खाण्यास दिला जाई.

घोडे पाणी पित नसल्यास त्यांना मीठ खाऊ घालीत. तट्टू आजारी पडल्यास कोंबडीची अंडी व टाकणखार यांचे मिश्रण पाजीत, चाई पडून घोड्याचे केस गळू लागल्यास चमेली तेलाचा वापर करीत.

घोड्यांना नेहमी दह्या–दुधाने अंघोळ घालीत. विशेषत: आयाळी दही–दुधाने धूत असत. घोड्यांच्या आजारपणात दैवी उपायही केले जात होते.

उदा. चिंतामणी नावाच्या घोड्यास सापाने दंश केला होता. तो बरा व्हावा म्हणून पुण्यातील बहिरोबा देवास नवस केला होता. घोडा बरा झाल्यामुळे नवस फेडण्यासाठी सरकारकडून ५ रुपये खर्च करण्यात आला होता.[१०]

बिचवा नावाच्या घोड्याच्या डोळ्यात फुल पडले. त्याचे डोळे बरे व्हावेत म्हणून कुरकुंभ येथील फिरंगाई देवीस डोळे वाहण्याचा नवस केला होता, घोडा आजारातून बरा झाल्यावर हा नवस फेडण्यासाठी सरकारकडून २ रुपये खर्च करण्यात आला होता.[११]

घोड्यास बरे वाटत नसल्यास थोरेपालट देखील करीत असत. उदा.एका घोड्याच्या पोटात तिडीक निघत होती त्यास बरे वाटावे म्हणून त्याला पाषाण येथे ठेवण्यात आले.[१२]

## ३.८ हुजूरपागेतील अपघात व जखमींचा परामर्ष :

घोडा हा लहरी व खोडसाळ प्राणी आहे. एखाद्या घोड्याच्या खोडसाळ वागण्याचा फटका पागेतील कर्मचाऱ्यांना नेहमी बसत असे.

उदा.घोड्याने लाथ मारणे, टापेखाली तुडवणे, घोड्याचा धक्का लागून पडणे इ. अपघाती प्रकार नेहमी घडत असत. अशा प्रसंगी सरकारकडून आर्थिक मदतीची तरतूद करण्यात येत होती.

उदा.सोनाजी मोतद्दार यास घोड्याने लाथ मारली त्याला औषधोपचारासाठी २ रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली होती. [१३] दाऊद मोतद्दार यास घोड्याने लाथ मारली तेव्हा २ रुपयांचा खर्च सरकारकडून मंजूर करण्यात आला [१४] गोदनाक महार यास घोड्याने दंश केला त्याच्या उपचारासाठी दोन रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली. [१५] घोड्याला शिकविण्यासाठी पागेत चाबूकस्वारांची नेमणुक केलेली असे. या चाबूकस्वारांच्या बाबतीतही गंभीर स्वरुपाचे अपघात नेहमी होत होते.

उदा.भरधाव घोडा फेकीत असताना गणोजी गायकवाड चाबूकस्वार घोड्यावरुन पडला व त्यात त्याचा पाय मोडला, उपचारासाठी त्याला २५ रुपये देण्यात आले.[१६]

सवाई माधवरावांच्या स्वारीबरोबर सखाराम कदम हा चाबूकस्वार पर्वतीस गेला असता घोड्यावरुन पडून जखमी झाला. त्यास उपचारासाठी म्हणून ५ रुपये देण्यात आले.[१७] सवाई माधवराव पेशव्यांच्या मिरवणुकीत हाच सखाराम कदम चाबुकस्वार भालाफेकीचा खेळ करुन दाखविताना घोडीवरुन खाली पडला, घोडीने त्यास टापेखाली तुडविले. तोंडावर –अंगावर टापा मारल्यामुळे त्याचे दात पडले. गंभीर जखमी झाला, त्याच्या उपचाराची तरतूद म्हणून २५ रुपयांची रक्कम सरकारकडून मंजूर करण्यात आली.[१८]

गोदाजी गायकवाड चाबुकस्वार याने दोन घोड्यावर उभे राहून रपेट मारुन दाखविली, सवाई माधवराव पेशव्यांनी १५ तोळे वजनाचे २२५ रुपये किंमतीचे सोन्याचे कडे देऊन दरबारात त्याचा सत्कार केला.[१९] समदखान रिकीबदार हा खासा घोडी फिरावयास घेऊन गेला असता, घोड्याचा धक्का लागून जखमी झाला तेव्हा त्याच्या उपचारासाठी ४ रुपयांची तरतूद करण्यात आली होती.[२०]

इ.स.१७९४–९५ मध्ये नेतोजी रणनवरे बारगीर नुकताच उमेदवारीने नोकरीस लागला होता. त्याचा पगारही ठरला नव्हता. सवाई माधवरावांच्या स्वारीबरोबर तो पर्वतीस गेला असता मदमस्त हत्तीने त्यास ठार मारले तेव्हा भरपाईदाखल ३०० रुपयांची तरतुद सरकारकडून करण्यात आली होती.[२१]

लढाईमध्ये जखमी किंवा ठार झालेल्यांचा यथोचित परामर्ष सरकारकडून घेतला जाई. रोख रक्कम, कापड इत्यांदींची त्यांना मदत दिली जात होती. शिवाय बालपरवेशी, नानपरवेशी सारख्या बाबींमधून ठराविक कालावधीसाठी मदतीची तरतूद करण्यात येत असे. रणांगणावर ठार झालेल्या लोकांचा अंत्यविधी व उत्तरकार्य याचा खर्च सरकारकडून केला जात होता. उदा.इ.स. १७५५–५६ च्या एका नोंदीनुसार

हुसेन बारगीर लढाईच्या मैदानात तोफेचा गोळा लागून ठार झाला. त्याच्या कफनास व सरकारी दुखवट्याची वस्त्रे म्हणून दोन शेले देण्यात आले. त्याची किंमत ५३।। रुपये इतकी होती. याचवेळेस साकोरा बारगीरही ठार झाला होता. त्यासही जाफरखानी तिवट सरकारकडून दुखवट्यादाखल देण्यात आले.[२२]

जखमी बारगीर, शिलेदार बरे झाल्यानंतर पेशव्यांस भेटण्यासाठी येत असत. तेव्हाही त्यांचा सत्कार केला जाई. उदा.खंडोजी बारगीर लढाईत जखमी झाला होता. कालांतराने बरा झाल्यानंतर पेशव्यांना भेटण्यास आला असता, त्याला तिवट व खसखसी शेला देऊन त्याचा गौरव करण्यात आला.[२३] रणांगणातून आनंदाची वार्ता घेऊन आलेल्यांचाही बक्षीस देऊन गौरव केला जात असे.

उदा.दादासाहेब पेशव्यांच्या उत्तरेतील मोहिमेत बाजीभाई बारगीर अहमदाबादेस मराठ्यांचे निशाण चढल्याचे वर्तमान घेऊन आला होता. त्यावेळी दादासाहेबांनी त्यास स्वतःच्या अंगावरील भरजरी ५० रुपये किंमतीचा शेला बक्षीसादाखल दिला. शिवाय २० तोळे वजनाचे सोन्याचे कडेही त्यास काही दिवसानंतर बक्षीस म्हणून देण्यात आले.

मोहबतखान व शेख माना हे सांडणीस्वार, बागापूरावर मराठ्याचें निशाण चढल्याची खबर घेऊन आले असता भाऊसाहेबांनी त्यास बक्षीसादाखल दोन शेले दिले होते.[२४] पाडवा, दसरा या सणांच्या वेळी बारगीर व मोतद्दारांना तसेच इतर कर्मचाऱ्यांना सरकारकडून पोशाख व रोख रक्कम बक्षीसादाखल देण्यात येत होती, तर मुस्लीम समाजातील कर्मचाऱ्यास ईद सणाच्या वेळी रोख रक्कम बक्षीस म्हणून सरकारकडून मिळत होती.[२५]

## ३.९ हुजूरपागेचे निशाण :

पेशव्यांचे निशाण 'जरीपटका' हे निशाण हुजूरपागेकडे असे, निशाणासाठी उच्चप्रतीच्या व भारी किंमतीच्या वस्त्रांचा वापर केला जाई. बादली चिरा व शेला या

वस्त्रांचा त्यात समावेश असे. एक बादली चिरा व २ शेले हे निशाण तयार करण्यासाठी लागत. वर्ष प्रतिपदा व दसरा या सणांच्या दिवशी दरवर्षी जुने निशाण बदलून नवीन निशाण लावले जाई.

इ.स.१७७७ मध्ये या निशाणांना लागणाऱ्या वस्त्रांसाठी १०९२[6]।।। (एक हजार ब्याण्णव रुपये बारा आणे) इतका खर्च आला होता.[२६] निशाणाची पूजा स्थापनेवेळी करण्यात येई. इ.स.१७९३ व १७९४ मध्ये दसरा सणाच्या वेळी निशाणाच्या पूजेसाठी ५ रुपये इतका खर्च सरकारकडून केला गेला.[२७]

### ३.१० हुजूरपागेत घोडे दाखल होण्याची व्यवस्था :

'हुजूरपागेत' दाखल होणारी घोडी जातिवंत असत, बहुतेकवेळा खरेदीच केली जात होती. शिवाय नजर, भेट, कमाविस, सापडलेली बिनधनी घोडी (चुकार) जप्त केलेली घोडी किंवा शत्रूपक्षाकडून पाडाव आलेली घोडी हुजूरपागेत दाखल केली जात असत.

तेजी, अरबी, बोर, अबलख, कुमाईत, तेल्या, बोर अशा घोड्यांच्या जाती असत. शिवाय गुणांवरुन पंचकल्याण, निळा घोडा अशा जाती असत, जर्दा, कर्डा, गोमासी अशासुद्धा जाती होत्या. अरबी घोड्यास सारंगा घोडा असेही म्हणत.

इ.स.१७४०–४१ मध्ये ३२ घोडे हुजूरपागेत दाखल झाले. या घोड्यांची मिळून किंमत १०,६७६ रूपये होती. (पहा. परिशिष्ट पत्र क्र.८) इ.स.१७५०–५१ मध्ये हुजूरपागेसाठी उच्च प्रतीचे अरबी घोडे खरेदी करण्यात आले. ७ घोडे खरेदी करण्यासाठी ५००० रूपयांची रक्कम खर्च करण्यात आली. (पहा. परिशिष्ट पत्र क्र.७) याच वर्षी मुल्ला फकरूद्दिन या मुंबईच्या सावकाराकडून ९७०० रूपयांची रक्कम कर्जाऊ घेवून हुजूरपागेसाठी विविध जातींचे उच्च, मध्यम, कनिष्ठ प्रतींचे असे १२ घोडे खरेदी करण्यात आले. तसेच रामाजी उद्धव यास सापडलेली बिनधनी

घोडी सरकारात जमा करण्यात येवून हुजूरपागेत दाखल करण्यात आली. (पहा. परिशिष्ट पत्र क्र.८)

घोड्यांच्या किंमती जातीनुसार ठरत. साधारणत: १०० रुपयांपासून १५०० रुपयांपर्यंत किंमती होत्या. तट्टूंच्या किंमती ७५ ते १२५ रुपयांच्या दरम्यान असत, सारंगा घोडा (अरबी घोडा) व निळा घोडा यांच्या किंमती १२००–१५०० रुपयांपर्यंत होत्या.

घोड्यांना आवडीने विशिष्ट नावे दिली जात असत. पंचकल्याण, गुणसागर, जगजीवन, चिंतामणी, नाग, निलाबाज, जगरुप, चितल, अंबरी निली, फुलझडी, निली सडक, कोयल, पद्मिणी, रुपमंजिरी, राममंजिरी, नाजूक बदन, मथुरा अशी नावे घोड्यांना दिल्याचे आढळते.[२८] नानासाहेब पेशव्यांचा 'वारु' नावाचा घोडा अतिशय आवडता होता.[२९] थोरल्या माधवराव पेशव्यांच्या घोडीचे नाव 'मतवाली' असे होते.[३०] नारायणराव पेशव्यांची घोडी 'चंद्रकला' नावाची होती. [३१]

## ३.११ सरकारी व खाजगी कामासाठी घोडे वापरणे :

पेशव्यांच्या घरातील लग्न, मुंज, अनुष्ठानादी धार्मिक कार्यासाठी आमंत्रितांना आणावयास किंवा रवाना करण्यास हुजूरपागेतील घोडे पाठविले जात असत.

त्याचप्रमाणे पेशव्यांच्या स्त्रियांचे देवदर्शन, तिर्थयात्रा, माहेरी जाणे–येणे, पै–पाहुणे, आप्तेष्टांना भेटीसाठी बोलावणे इत्यादी कामाकरीता पागेतील घोडे पाठवित असत. त्यासाठी लागणारा घोड्यांच्या चंदीचा खर्च सरकारकडून केला जाई.

उदा.विश्वासरावांच्या मुंजीच्या वेळी आमंत्रितांना आणावयास टोके, सातारा, लोहगड, राजमाची, गोवित्री, चास, करंजगाव व चिखलगाव व मुंजीच्या कामासाठी लागणारे साहित्य आणावयास इत्यादीसाठी मिळून चोवीस घोडे पाठविण्यात आले होते. त्यासठी ५१.।।।.।। (एक्कावन्न रुपये बारा आणे दोन पैसे) इतकी रक्कम घोड्यांच्या रतीबासाठी सरकारकडून खर्च करण्यात आली. [३२]

मल्हार नाईक नेटके यांस कर्नाटकच्या स्वारीतून श्री व्यंकटेशास (तिरुपती) पाठविण्यात आले होते तेव्हा दाणा, वैरण, पोरगा, नालमेखा मिळून तीस रुपयांचा खर्च करकारकडून करण्यात आला. [३३]

इ.स.१७५६ मध्ये मुंबईहून डॉक्टरला पुण्यास आणण्यासाठी धोंडो गोविंद या कारकुनास पाठविण्यात आले होते. त्याच्या बरोबर पागेतील घोडे रवाना करण्यात आले, त्यास दाणा–वैरणीचा खर्च आठ रुपये, तीन आणे इतका झाला.

हा डॉक्टर पुण्यास आल्यावर त्याच्याकडील घोड्यांची चंदी हुजूरपागेतूनच देण्यात आली. त्यासाठी सतरा रुपये दोन आणे इतका खर्च झाला होता. [३४]

सवाई माधवराव पेशव्यांची पत्नी रमाबाई हिच्या चितेची रक्षा नाशिकला रामकुंडात विसर्जित करण्यासाठी पुण्याहून ५ ब्राह्मण पाठविण्यात आले होते. त्यांचे ५ घोडे व रक्षा वाहून नेण्यासाठी १ घोडा मिळून सहा घोडे हुजूरपागेतून रवाना करण्यात आले. या सहा घोड्यांच्या १३ दिवसांच्या चंदीचा खर्च ५०। रुपये सरकारकडून करण्यात आला होता.[३५]

केदारी तेलकर पोरगा याला नाजूक कामासाठी कोकणात पाठविले होते, त्यास कोकणचे पाणी बाधले, ताप येऊ लागला, म्हणून त्यास पुन्हा लष्करात पाठविण्यात आले. त्याच्याकडील तट्टूस, दाणा, वैरणीबद्दल २ रुपये खर्च आला होता. [३६]

काही आपत्तीप्रसंगी सरकारतर्फे शांती किंवा अनुष्ठान करण्यात येत होते, अशावेळी पागेतील घोडी रवाना करीत उदा.जुन्नर प्रांतातील नारायणगाव तर्फेतील रांजणी गावातील नरसिंहाच्या देवळावर वीज पडली. कळसाची हानी झाली. तेव्हा लक्ष महात्मक शांती करण्यास पुण्याहून चिंतामणी दीक्षित, कर्वे उपाध्ये, व इतर भिक्षुक मंडळी हुजूरपागेतील घोडे देवून रवाना करण्यात आली. या सर्वांच्या

घोड्यांचा मिळून खर्च १३।।। तेरा रुपये बारा आणे इतका खर्च दाणा–वैरणीसाठी सरकारकडून करण्यात आला,[३७]

पागेतील कर्मचाऱ्यांना लग्न–मुंज, धार्मिक कार्य किंवा इतर जरुरीच्या कामासाठी पागेतील घोडे बरोबर घेउन जाता असे, अर्थातच त्यासाठी सरकारची परवानगी घ्यावी लागे, जितके दिवस घोडे बरोबर बाळगले जातील तितक्या दिवसांचा दाणा, वैरणीचा खर्च सरकारतर्फे दिला जात होता. उदा. रामजी विश्वनाथ बर्वे यास मुलाच्या लग्नाला जाण्यासाठी पागेतील १३ घोडे व उंट देण्यात आले. त्यांच्या चंदीसाठी सरकारकडून ४१। (एक्केचाळीस रुपये चार आणे) रुपये खर्च करण्यात आला.[३८] मिर्जा बारगीर त्याच्याकडील लग्नानिमित्त घरी जाण्यासाठी पागेतील २ घोडे बरोबर घेउन गेला होता.[३९]

खिजमतगार नागोजी शिंदे यांच्या आईने कुरकुंभला जाताना पागेतील घोडे बरोबर नेले होते त्यासाठी दाणा–वैरणीच्या खर्चाची दहा रुपयांची रक्कम सरकारकडून मंजूर करण्यात आली.[४०] सुभाना चाबुकस्वार देवदर्शनास जाताना पागेतील २ तट्टू बरोबर घेवून गेला होता. त्यांच्या दररोजच्या रतीबाचा खर्च सरकारकडून करण्यात आला.[४१]

मोरो विश्वनाथ भावे हा शिलेदार विभागाचा कारकुन व शिवराम नारायण आठवले हे दोघे स्वत:साठी मुलींची स्थळे पाहण्यासाठी गेले होते. त्यांनी पागेतील घोडी बरोबर नेली होती. त्यांच्या दहा दिवसांच्या चंदीचा खर्च ५ घोड्यांचा मिळून ४५।। (पंचेचाळीस रुपये दहा आणे) रुपये इतका सरकारने मंजूर केला.[४२]

### ३.१२ **पागेतील कर्मचाऱ्यांना विशेष मदत** :

काही प्रसंगी हुजूरपागेच्या कर्मचाऱ्यांना आपत्ती, वैयक्तिक काम, आजारपण, रजा इत्यादींबाबतीत अनेक वेळा सरकारकडून मदत देण्यात येत होती.

उदा.बहादुरसिंग बारगीर हा जरिपटक्याच्या निशाणाजवळ इ.स.१७८० मध्ये नेमणुकीस होता. त्याचा आजारपणात मृत्यु झाला. त्याच्या उत्तरकार्याचा खर्च म्हणून सरकारकडून १५ रुपयांची रक्कम मदत म्हणून देण्यात आली.[४३.]

कित्येक प्रसंगी विशेष बाब म्हणूनही रोख रक्कमेची मदत सरकारकडून दिली जात होती, उदा.यसव राऊत बारगीर याचा भाऊ वारला, त्याची बायको सती जाण्यास निघाली. साहित्यासाठी म्हणून सरकारकडून ५० रुपये देण्यात आले.[४४]

आजारपणात कर्मचाऱ्यांना रजा मिळत असे, तसेच औषधोपचारासाठी सरकार रोख रक्कमही देत असे. उदा.सुभाना चाबुकस्वार यास बरे वाटत नव्हते म्हणून त्यास एक महिन्याची पगारी रजा मंजूर करण्यात आली व १५ रुपये रोख देण्यात आले.[४५.] हुसेनभाई मोतद्दार यास बरे वाटत नव्हते. म्हणून २५ रुपये देण्यात आले शिवाय पागेतील कोठीतून गुलाबपाणी घेण्यासाठी चिठ्ठी देण्यात आली.[४६]

**लक्षवेधी बाबी** :

दसरा सणाच्या वेळी पेशव्यांच्या स्वारीची मिरवणुक निघत असे. मिरवणुकीच्या लवाजम्यात हुजूरपागेतील घोड्यांचे पथक सामील असे.

या पथकात असणाऱ्या घोड्यांची दाढी रंगवीत असत. त्यासाठी लाख, तुरटी, लोध, टाकणखार, लिंबू इत्यादी जिन्नस रंग तयार करण्यासाठी वापरत असत.[४७]

मोहिमांच्या कालावधीत लष्करातून दफ्तरांच्या किर्दी वगैरे पुण्यास पाठवित असत. त्यासाठी हुजूरपागेतील सांडणीस्वारांची नेमणुक करीत असत.

उदा.माधवरावांच्या कर्नाटक मोहिमेच्या वेळी पुण्याहून सांडणीस्वार पाठवुन नानांनी लष्करातून किर्दी मागविल्या होत्या. त्यासाठी पाठविलेल्या सांडणीस्वारांचा खर्च ३।. (साडेतीन रुपये) इतका झाला होता.[४८]

चंद्रग्रहणानिमित्त पेशव्यांकडून अश्वदान करण्यात येत होते. सदाशिवराव भाऊंची पत्नी पार्वतीबाई व सवाई माधवरावांची पत्नी रमाबाई यांच्या उत्तरकार्याच्या वेळीही इ.स.१७९२–९३ मध्ये सालंकृत अश्वदान करण्यात आले होते.[४९]

### ३.१३ हुजूरपागेच्या लष्करी पथकाची भरती :

पेशव्यांच्याकडून वेळोवेळी आवश्यकतेनुसार कायमच्या लढाऊ लोकांची भरती केली जात होती तर मोहिमांच्या काळात तात्पुरत्या स्वरुपातही आवश्यक त्या लष्करी कामकाजासाठी मनुष्यबळाची भरती केली जात असे.

इ.स.१७४०–४१ च्या यादीनुसार एका लष्करी मोहीमेत हुजूरपागेच्या पथकात ५९ बारगीर, ६५ शिलेदार, १३ दाणेकरी, १४३ खासदार व मोतद्दार, २ अब्दागिरे, २ सारवान, १ दिवट्या, १४ पखाली, ७ नालबंद, २ नगरची, २ चांभार, २ किरकोळ काम करणारे लोक, ५ ढाले, ८ कोठावळे, २ रिकिबदार, ३ जिल्हेदार, ४ हूलस्वार, २ जिनगर इत्यादी लोकांचा समावेश होता. (पहा. परिशिष्ट पत्र क्र.२)

उदा. माधवराव पेशव्यांच्या काळात झालेल्या कर्नाटक स्वारीच्या वेळचे जे तपशील आहेत. त्यातील नोंदीनुसार शिऱ्याची व सावनूरच्या मोहिमेत तात्पुरत्या स्वरुपात भरती केलेले लोक किती होते याचा तपशील येथे नमूद करीत आहे.

**शिऱ्याची मोहिम** :

| | |
|---|---|
| २१९ | बारगीर |
| २९ | कारकुन |
| १६ | शिलेदार |
| ६५ | दाणेकरी |
| १२८ | मोतद्दार |
| ६६१ | मराठे पोरगे |
| ७४ | मुसलमान पोरगे, |

| | |
|---|---|
| ४२८ | महार पोरगे |
| ३६२ | इतर कर्मचारी इत्यादींचा समावेश होता |

**सावनूर मोहिम** :

| | |
|---|---|
| ३३७ | बारगीर |
| २१६ | शिलेदार |
| ८९ | दाणेकरी |
| १४८ | मोतद्दार |
| ८२४ | पोरगे |

इत्यादींचा समावेश होता. [५०]

**हुजूरपागेतील घोडे व इतर जनावरांची संख्या** :

हुजूरपागेत केवळ घोडेच होते असे नव्हे तर इतर काही जनावरांचाही त्यात समावेश होता. पेशव्यांच्या वेगवेगळ्या कारकिर्दीत पागेतील जनावरांची संख्या कमी–जास्त होती. यातील काही तपशील येथे नमूद केले आहेत.

इ.स.१७७५ मधील एका नोंदीनुसार हुजूरपागेत खालील संख्येत जनावरे असल्याची नोंद आढळते [५१]

| | |
|---|---|
| १५२२ | घोडे |
| ७९ | उंट |
| ७६६५ | बकरी |
| १६२७ | गुरे |
| ३ | एडके |
| ६७ | गुलाम स्त्री व पुरुष |
| २ | हरणे |
| ३ | गलबते |

इ.स.१७७७ मध्ये हुजूरपागेत दाखल असलेल्या जनावरांची नोंद याप्रमाणे आहे.[५२]

| | |
|---|---|
| ४६२ | नर |
| ६५२ | मादवाना |
| ३७७ | यार्दी |
| ३४० | शिंगरे |
| १०० | उंट |
| ४ | वासरे |
| ९ | हरणे |
| १५७१ | गुरे |
| २ | एडके |
| ५४२१ | बकरी |
| ५१ | गुलाम स्त्री पुरुष |
| ३ | नावा |

### ३.१४ हुजूरपागेची कोठी :

हुजूरपागेची कोठी अत्यंत समृद्ध असे भांडार होते. पागेच्या कोठीमध्ये अनेकविध वस्तू असावयाच्या. धान्य, औषधी जिन्नस या सर्वांनी ही कोठी परिपूर्ण असावयाची, तसेच वरील एकूण एक वस्तू, पदार्थ, साहित्य यांची मोजदाद ठेवली जात होती. अनेक प्रकारचे लष्करी साहित्य व दैनंदिन उपयोगाच्या वस्तू पागेतील कोठीत असत यात :

खुसका, तवे, पितळी कासंड्या, मेखा, तंगनवहात, नालडबे, चवाली, पोलादी टाक्या, तांब्याची तपेली, नवार, गेंद जोड, भाल्यांच्या काठ्या, बुधले, गोणपाट, तांब्याच्या पराती, अनीन, पडाम, किनसान कोंडी, खोगीरे, लाकडी समया, समयांची पितळी चाडी, तंगकडपे, सरोसराच्या कड्या, खोगीर जोड, सुताडे, कुलपे, गोण्या,

तांब्याचे गुंड, पाले, पोती, दगडी जाते, लगाम, हडोकडबे, रिकिबा, सरोसरा इत्यादींचा समावेश असे. शिवाय रथ, अंबारी, हौदासुद्धा असल्याच्या नोंदी आहेत.

विविध प्रकारची धान्ये व वाणसामानही कोठीत असे. यामध्ये हरभरे, बाजरी, मूग, उडीद, नागली, ज्वारी, मसूर, तांदूळ–सडीक व असडिक, कणीक, ज्वारी बाजरीचे पीठ, मैदा, मूगडाळ, तूरडाळ, मसूरडाळ, हरभरा डाळ, गूळ, साखर, तेल, तूप, जिरे, मोहरी, मीठ, खोबरे, बदाम, तीळ, मेथ्या, धणे, ओवा, सुंठ, हिंग, शाहजिरे, वेलदोडे, लवंगा, मिरे, खिसमिस, चिंच, करडई, अंबाडी, लसूण यांसारखे जिन्नस असत.

**औषधी जिन्नस** :

बिब्बा, गधविड, कात, डिंक, नवसागर, तवकील, भद्रमोथा, आवळकाठी, तुरटी, मुर्दाडशिंगी, बेहडे, काव, हिरडे, भांग, अफू, शिकेकाई, रिठा, पिंपळी, सेऊद, मोरचूद, शेंदलोण, काळे जिरे, मध, तंबाखू, टाकणखार, बेल, आंबेहळद, नारायण तेल, शिरसू तेल, सफेदा, पिंपळमूळ, खरासनी ओवा, इंद्रजव, अक्कलकाढा, अजमोंदा, वेखंड, जायफळ, मायफळ, मोडफळ, कायफळ, कंटुकी, किरमाणी ओवा, पाषाणभेद, असकंद, काळाकुडा, अहळीव, सांबरी मीठ, कोलिंजन, जेष्ठमध, खडीसाखर, संजीखार, कंकोळ, नागरमोथा, पीतपापडा, सालंमिश्री, जायपत्री, एरंड तेल, बाळहिरडे, करंजतेल, डिकेमाली, आणि वाघाचे मांदे अशा विविध प्रकारच्या औषधी जिन्नसांचाही समावेश कोठीत असे.

याशिवाय कथील, शिसे, पितळ, सूत, कुंकू, गुलाल, शेंदूर, सुपारी, गुग्गुळ, ऊद, कापूर, कचोरा, राळ, लाख, अभ्रक़, रेशीम, ताग इत्यांदींनी पागेची कोठी समृद्ध असे.[५३]

---------------------------------------

संदर्भ :

१. : दाभाडे बाळकृष्ण, अश्वपरिक्षा, सौ.मालती दाभाडे, ऋता प्रकाशन, नागपूर, १९६९.

२. श्री.केशवसिंहजी, शालहोत्रसंग्रह, लक्ष्मी वेंकटेश्वर छापखाना, कल्याण, मुंबई, संवत्, १९७७, शके १८४२ (इ.स.१९२०-२१).

३. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५६, पुडके १ यातील नोंद.

४. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रूमाल३५६, पुडके -२ मधील एक यादी.

५. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३८६ मधील एक यादी.

६. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके २ यातील नोंद.

७. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५४ पुडके ४ यातील नोंद.

८. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ८ यातील नोंद.

९. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ४ यातील नोंद.

१०. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ९ यातील नोंद.

११. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल अंक ३५१, पुडके १ यातील नोंद.

१२. : कित्ता

१३. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ३ यातील नोंद.

१४. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ८ यातील नोंद.

१५. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५१, पुडके १ यातील नोंद.

१६. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५४, पुडके ४ यातील नोंद.

१७. : कित्ता

१८. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल अंक ३५४, पुडके ५ यातील नोंद.

१९. : कित्ता

२०. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ८ यातील नोंद.

२१. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५४, पुडके ५ यातील नोंद.

२२. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ४ यातील नोंद.

२३. : कित्ता

२४. : कित्ता

२५. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५४, पुडके ४ यातील नोंद.

२६. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ७ यातील नोंद.

२७. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५९, पुडके ५ यातील नोंद.

२८. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ५२, ५४, ५९ यातील नोंद.

२९. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके २ यातील नोंद.

३०. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५९, पुडके १ यातील नोंद.

३१. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५६, पुडके ३ यातील नोंद.

३२. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके १ यातील नोंद.

३३. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ४ यातील नोंद.

३४. : कित्ता

३५. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५४, पुडके ४ यातील नोंद.

३६. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ९ यातील नोंद.

३७. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५९, पुडके ५ यातील नोंद.

३८. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ३ यातील नोंद.

३९. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ४ यातील नोंद.

४०. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ९ यातील नोंद.

४१. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके २ यातील नोंद.

४२. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५४, पुडके ४ यातील नोंद.

४३. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ८ यातील नोंद.

४४. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५१, पुडके २ यातील नोंद.

४५. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ३ यातील नोंद.

४६. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके २ व ४ यातील नोंद.

४७. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ८ यातील नोंद.

४८. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५५, पुडके १ यातील नोंद.

४९. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५४, पुडके ४ यातील नोंद.

५०. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ५ यातील नोंद.

५१. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ६ यातील नोंद.

५२. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ७ यातील नोंद.

५३. : पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ५ यातील नोंद.

**शब्दार्थ** :

शब्दार्थ व टीपा :

| | | |
|---|---|---|
| भोवरा | : | अश्वाच्या अंगावरील केस उलटे–सुलटे फिरल्यामुळे निर्माण होणारी वर्तुळाकृती केस रचना. |
| चांदणी | : | ताराकृती वेगळ्या रंगाचा ठिपका. |
| गारोळा | : | घाऱ्या डोळ्यांचा अश्व. |
| वानरमुखी | : | वानरासारख्या मुखाचा आकार असणारा अश्व. |
| कराल | : | वरचे दात व दाढा खालच्या दातांपेक्षा मोठे असणे. |
| विक्राळ | : | खालचे दात व दाढा वरच्या दातांपेक्षा मोठे असणे. |
| गोम | : | सरपटणारा अठरा पायांचा प्राणी, सर्रास सगळीकडे आढळतो. अशा प्राण्यांच्या आकृतीसारखे चिन्ह अश्वाच्या अंगावर असणे यांवरुन त्याची शुभाशुभता ठरवित. कदाचित यांवरुनच एखाद्या व्यक्तीस उद्देशुन 'त्याच्या अंगात गोम आहे' असा वाक्प्रचार प्रचलित झाला असावा. |
| पंचमुखी भोवरा | : | पाच तोंड असलेली भोवऱ्यासारखी वर्तुळाकृती. |
| फरा | : | मांडी व गुडघ्याच्या मधील भाग. |
| चौक | : | पुठ्ठ्यापासून माकडहाडापर्यंतचा भाग |
| रिकिब | : | घोडेस्वाराचे  पाय अडकविण्याची गोलदार कडी. |
| **नीळा अश्व** | : | म्हणजे निळा घोडा, पांढऱ्या शुभ्र घोड्यासच निळा घोडा, म्हणावयाचा प्रघात होता. ऐतिहासिक कागदपत्रांत पांढरा किंवा शुभ्र घोडा असा शब्दप्रयोग कधीही येत नाही. निळा घोडा म्हणजे निळ्या रंगाचा घोडा असा अर्थ येथे अभिप्रेत नाही. |

| | | |
|---|---|---|
| **रत्ती** | : | बकरे कापल्यानंतर त्याचे रक्त साठवून ठेवले जाते यालाच रत्ती असे म्हणतात. |
| तर्फ | : | तालुका, पेटा. |
| रसद | : | परगण्याचा इजारा घेतल्यावर मामलेदाराने सरकारात भरावयाची रक्कम. |
| वरात | : | हुंडी, चेक. |
| रतीब | : | घोड्यांसाठीचे विशेष खाद्य, खुराक. |
| शेरी | : | राजांची किंवा सरंजामदारांची खासगत शेत जमीन. |
| खंडी | : | धान्य मोजणीचे परिणाम, १ खंडी = २० मण. |
| चावर | : | जमीन मोजणीचे परिमाण, १ चावर = १२० बिघे. |
| अनीन | : | लगाम, लगामाची दोरी. |
| जीन | : | घोड्याच्या पाठीवरील आसन. (पाश्चिमात्य पद्धतीचे) |
| खोगीर | : | घोडेस्वाराचे चामडी आसन. |
| सकलाद | : | एक प्रकारचे शेंदरी अथवा निळे कापड. |
| पासोडी | : | कापडाचा एक प्रकार. |
| भुरक्या | : | घोड्याचे डोळे व शरीर आच्छादणारा कपडा. |
| सरोसरा | : | घोड्याच्या डोक्यात घालावयाचा एक अलंकार, याचे मुखपट्टा व कपाळपट्टा असे दोन भाग असतात. |
| दुमची | : | घोड्याच्या शेपटीखालून जाणारा बंद, लेंडी. |
| गाशा | : | घोड्याच्या खोगीर, जीनावर घालावयाचे पातळ गादीसारखे आच्छान, घोड्याच्या अंगावरील चिलखतावरून घालण्याचे मऊ कापड. |
| छीट | : | चीट : स्त्रियांचे वस्त्र, एक वस्त्रप्रकार, रंगीबेरंगी कापड. |

किनखाप : जरीकाम केलेले रेशमी कापड.

चारजामे : घोड्याच्या पाठीवरील गादीचा प्रकार.

चवाली : बैलाच्या किंवा घोड्याच्या पाठीवर घालण्याची कांबळ्याची झूल.

पायबंद : घोड्याचे मागचे पाय बांधण्याची दोरी.

चिबे : ?

गेंदजोड : घोड्याच्या शेपटीवरील एक भूषण, किंवा अलंकार, गेंद म्हणजे झुबका, गोंडा.

बालपरवेशी : लढाईत कामास आलेल्यांच्या मुलांसाठी केलेली संगोपणाची नेमणूक.

नानपरवेशी : लढाईत कामास आलेल्यांच्या बायको–मुलांसाठी केलेली निर्वाहाच्या उत्पन्नाची तजवीज.

जाफरखानी तिवट : पागोट्याचा प्रकार.

तेजी : मद्र (सिंध) देशातील घोडा, सैंधव घोडा, चलाख घोडा.

अरबी घोडा : अरबस्तान देशातील जातीचा घोडा.

बोर : लाल रंगाचा घोडा.

अबलख : काळ्या पांढऱ्या रंगाचा घोडा.

कुमाईत : आयाळ व शेपटी काळी असून अंग लालसर असलेला घोडा.

तेल्या : चमकदार कांती असलेला घोडा.

पंचकल्याण : गुडघ्यापर्यंत चारही पार पांढरे व कपाळावर चांदवा असलेला घोडा.

निळा घोडा : पांढऱ्या रंगाचा अश्व.

| | | |
|---|---|---|
| बादली चिरा | : | सोने, चांदीच्या जरीचे कापड. |
| नालमेखा | : | घोड्यांचे आवश्यक सामान. |
| किर्दी | : | रोजनिशी, जमा खर्चाचे कागद. |
| मादवान | : | घोडी. |
| यार्दी | : | लहानसा तट्टू. |
| खुसका | : | ? |
| तंगनवहात | : | खोगीर, जीनाच्या लांब दोऱ्या. |
| नालडबे | : | चार नालांचा संच. |
| नवार | : | सुती कापडी पट्टी. |
| पडाम | : | ? |
| किमसान कोंडी | : | पिवळसर रंगाचे खेचराचे कातडे, कातडी पिशव्या? |
| पितळी चाडी | : | समईचे टवळे. |
| तंगकपडे | : | ? |
| गुंड | : | विशिष्ट प्रकारचे स्वयंपाकाचे भांडे. |
| पाले | : | कापडी तंबू. |
| हडोकडबे | : | ? |

# प्रकरण ४ थे

## हुजूरपागेचे व्यवस्थापन

पेशव्यांच्या नियंत्रणाखाली असणारे 'घोडदळ' म्हणजेच सरकारी घोडदळाचा विभाग ज्याला लौकीक अर्थाने 'हुजूरपागा' असे संबोधन मराठेशाहीत होते.

हुजूरपागेचे संपूर्ण व्यवस्थापन व प्रशासनाचे नियंत्रण खुद्द पेशव्यांकडून केले जात होते. ऐतिहासिक कागदपत्रांत 'पागे' असा व्यक्ती निर्देश आढळतो. या निर्देशातून पागेचे प्रशासकीय कामकाज पाहणारा सरकारी नोकर असा अर्थ अभिप्रेत असतो.

पुणे पुरालेखागारात घडणी दफ्तर विभागात 'हुजूर पागा' या नावाने जे रुमाल आहेत, त्यात वरील 'पागे' नावाने अभिप्रेत असलेले अधिकाऱ्यांचे उल्लेख आढळले नाहीत.

वरील दफ्तरातील एकंदरीत साधने पाहता खुद्द पेशव्यांचे एक हाती नियंत्रण या हुजूर पागेवर होते असा निष्कर्ष काढता येतो. याच कागदपत्रांत जे लोक हुजूर पागेत प्रत्यक्ष काम करीत होते, त्यात लढाऊ व बिनलढाऊ कर्मचाऱ्यांचा सहभाग कसा होता ते येथे श्रेणीनुरुप विश्लेषण केले आहे.

### ४.१ हुजूरपागेतील प्रशासकीय कर्मचारी :

**१) कारकुन :**

हुजूर पागेच्या प्रशासनातील महत्त्वाचा सनदी अधिकारी, पागेच्या सर्व जमा–खर्चाची तरतुद पाहणारा लेखनिक, पागेच्या बांधकाम साहित्यापासून ते सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन, घोड्यांचा रतीब, चंदी, कोठी, जनावरांची मोजदाद ठेवणारा अधिकारी.

पागेच्या कर्मचाऱ्यांचे अनुदान जे रोख, कापड किंवा इतर वस्तुरुपात दिले जात असे, त्याचाही हिशोब यास ठेवावा लागत होता. दररोजच्या जमा–खर्चाच्या

नोंदी ठेवणे, रतीब, चंदी इ.हिशोब ठेवून दर महिन्यास त्याचे टिपण महिनावार करणे व या टिपणांवरुन वर्ष अखेर जमा–खर्चाचा ताळेबंद त्याने सरकारला सादर करावयाचा असे.

सरकारी खजिना, जामदारखाना, कोठी इ. विभागातील एखादी गोष्ट स्वाधीन करवून घेणे व त्याचे वितरण योग्य त्या विविक्षित कामासाठी करणे इ.कामे कारकुनास करावी लागत होती या कामासाठी सरकारी परवानगीच्या चिठ्ठ्या कारकुनाच्या नावे निर्गमित केल्या जात. अशा निर्गमित केलेल्या चिठ्ठ्यांना रसानगी यादी म्हणत असत.

कारकुनास योग्यतेनुसार वर्षांकाठी २५० रुपयांपासून ३०० रुपयांपर्यंत वेतनची तरतुद असल्याच्या नोंदी आढळतात. शिवाय वर्षाकाठी शेला, पागोटे, तिवट, उंची वस्त्रे इ. कापड अनुदानाच्या स्वरुपात मिळत होते.

अव्वल कारकुनास वैयक्तिक कामासाठी सरकारी घोडे वापरावयाची परवानगी मिळत असे, लग्नकार्यासाठी विशेष अर्थसहाय्य देखील मिळत होते. मृत्यू किंवा कुटुंबातील सदस्याचा मृत्यू झाल्यास सरकारकडून रोख रक्कम किंवा कापड दुखवटा म्हणून दिले जात असे.

सवाई माधवरावाच्या काळात हुजूर पागेकडे सुमारे पंचवीस कारकुन होते असे कागदपत्रांवरुन कळते, अव्वल किंवा उच्च पदस्थ कारकुनास सरकारी पालखी व त्याबरोबर असणारा लवाजमा म्हणजे भोई, अब्दागिऱ्या, मशालजी, इ.लोकांच्याठी विशेष तैनात असल्याच्या नोंदी उपलब्ध आहेत.

१७३०–४० दशकात हुजूरपागेचे अव्वल कारकुन म्हणून केसो बहिरव, रामचंद्र गणेश व सिदो उद्धव हे लोक पागेचे कारकुन म्हणून कामकाज पहात होते.[१]

२)   **दफ्तरदार** :

कारकुनाने तयार केलेल्या रोजकिर्दी, हिशोबाचे कागद, घडण्या, ताळेबंद, सरकारी पत्रव्यवहार अर्थात उपयुक्त कागदपत्रे फक्त हुजूरपागेच्या संबंधात असलेली व या विभागांतर्गत समावेश असलेले कागदपत्र या सर्वांचे अभिलेख विभागणी करुन जतन करणे हे दफ्तरदाराचे मुख्य काम होते.

दफ्तरदारास कारकुनापेक्षा जास्त वेतन होते, मात्र दफ्तरदाराचा प्राथमिक कामे किंवा प्रत्यक्ष पागेच्या कामकाजाशी संबंध येत नव्हता.

दफ्तरदारास वार्षिक वेतन नेमून दिलेले असे, साधारणत: या वेतनाची रक्कम ६०० रुपयांपर्यंत होती.[२]

३)   **बारगीर** :

बारगीर हा हुजूरपागेच्या लष्करी पथकातील लढाऊ नोकर, लढाईत याचा प्रत्यक्ष सहभाग असे. वेळप्रसंगी लग्नकार्य किंवा इतर वैयक्तिक कामासाठी याला रजेची सवलत देण्यात येत होती. लग्नासाठी रोख अनुदान मिळत होते, मृत्यू किंवा इतर दु:खद प्रसंगी रोख रक्कम व कापड यांची मदत सरकारकडून दिली जाई, लढाईत जखमी झाल्यास औषधोपचारासाठी सरकारकडून वेगळा खर्च मिळत असे. बक्षीस म्हणूनही काही वेळा रोख रक्कम दिली जात होती. मुसलमान बारगीरास ईदची देणगी दिली जाई.

बारगीराचा पगार कदीम–जदीद श्रेणीनुसार ठरत असे. साधारणत: दर महिना ५ रुपयांपासून १५ रुपयांपर्यंत वेतन असल्याच्या नोंदी आढळतात.

बारगीरासही सरकारी पागेतील घोडे वैयक्तिक कामासाठी वापरता येत असे. अर्थात त्यासाठी सरकारी परवानगी आवश्यक असे, अशा घोड्यांच्या रतीब, चंदीचा खर्चही सरकारकडून केला जात होता.

४) **शिलेदार** :

हुजूरपागेच्या लष्करी पथकातील लढाऊ कर्मचारी, बारगीरापेक्षा यास अनुदान स्वरुपाची मदत फार कमी वेळा देण्यात येत होती, शिलेदारांमध्ये करोल व आडाव असा भेद होता. लढाईत जखमी झाल्यास मात्र योग्य समाचार घेण्यात येत होता. बक्षीस किंवा इतर स्वरुपाची मदत मिळत होती.

शिलेदारास ५ रुपयांपासून १२ रुपयांपर्यंत दरमहा वेतनापर्यंत श्रेणी होत्या.[४]

५) **हूलस्वार** :

हूलस्वारही पागेच्या लष्करी पथकातील लढाऊ कर्मचारी, शत्रू पक्षाची टेहेळणी करणे व लढाईच्या वेळी शत्रू पक्षास हुलकावणी देणे, स्वतःचा पाठलाग करावयास लावून शत्रूच्या सैन्याचे संतुलन बिघडवणे हे हूलस्वाराचे महत्त्वाचे व जोखमीचे काम होते.

हूलस्वार नेहमी महार समाजातील असत, हूलस्वारांना दरमहा २ ते ४ रुपयांपर्यंत वेतन होते.[५]

६) **राऊत** :

राऊत हा हुजूरपागेच्या लष्करी पथकातील लढाऊ कर्मचारी. मांग समाजाचे असत, काही वेळा यांचा समावेश बारगीरांमध्ये असल्याचेही उल्लेख आढळतात.

यांनाही सरकारी मदत व रोख अनुदान मिळत असे. राऊतास दरमहा ३ ते ४ रुपयांपर्यंत वेतन होते.

७) **खासदार** :

घोडदळाच्या पथकातील विशेष कामाचा नोकर, सरकारी अधिकाऱ्यांसमवेत असणारा कर्मचारी, खासदारास दरमहा ५ रुपयांपर्यंत वेतन देण्यात येत होते. एक प्रकारचा अंगरक्षक असा याचा हुद्दा होता.

शिवाय रोख रक्कम, कोठीतून काही वस्तू, रुपे व सोन्याचे दागिने सरकारकडून खासदारास देण्यात येत असत. पेशव्यांच्या स्वारीच्या मिरवणुकीत खासदार अग्रभागी असत, खासदारास दरमहा ५ रुपयांपर्यंत वेतन होते.[७]

८) **खास बारदार** :

पेशव्यांची राजचिन्हे बाळगणारा सरकारी नोकर, पेशव्यांची स्वारी निघते वेळी –दरबारात किंवा लढाईच्या मैदानात खास बारदार राजचिन्हे घेऊन पेशव्यांच्या मागे पुढे चालत असत. खास बारदारास दरमहा ८ ते १० रुपयांपर्यंत वेतन देण्यात येई.

९) **रिकीबदार** :

घोडेस्वारांच्या रिकिबींची देखभाल करणे, स्वारास घोड्यावर बसण्यास मदत करणे, तुटलेल्या रिकिबी दुरुस्त करणे इ.कामे रिकिबदारास करावी लागत होती.

रिकिबदारास ४ रुपयांपर्यंत दरमहा वेतन दिली जाई.

१०) **ढाले** :

सैन्याच्या तळ जेथे असेल तेथे राजसत्तेचे निशाण उभे करणे, व त्याच्या भोवती भाल्यांचे जाळे विशिष्ट प्रकाराने गोलाकार कडे करुन निशाण उभारणे हे ढाल्यांचे प्रमुख काम होते.

यांना दरमहा चार रुपयांपर्यंत पगार होता.

११) **पोरगे** :

हुजूरपागेच्या लष्करी पथकातील बारगीर, शिलेदारांसारख्या सैनिकांचे घोडे संभाळणे, स्वाराचा व घोड्याचा शिधा मोजून घेणे, स्वाराचे सामान सुमान सांभाळणे, प्रसंगी स्वाराचा स्वयंपाक करणे, किंवा स्वयंपाकाची तयारी करुन देणे, घोड्याचे जीन, खोगीर, गाद्या इ.सारखे साहित्य व्यवस्थित ठेवणे यांसारखी कामे यांना करावी लागत असत.

हुजूरपागेच्या पथकातील पोरगे हे मराठा किंवा महार समाजातील असत. यांना २ ते ३ रुपयांपर्यंत दरमहा वेतन होते.[८]

१२) **मोतद्दार** :

मोतद्दार हे बहुधा मुस्लीम असत. घोड्याचे आरोग्य सांभाळणे हे यांचे मुख्य काम, मोतद्दारास पागेतील कर्मचाऱ्यांमध्ये महत्त्वाचे स्थान होते.

मोतद्दारास लग्नप्रसंगी सरकारकडून विशेष अनुदान देण्यात येत होते. रोख रक्कम व कापड यांचा या अनुदानात समावेश होता.

मृत्यू किंवा दु:खद प्रसंगी सरकारकडून रोख व कापड यांस्वरुपात दुखवटा म्हणून मदत देण्यात येत असे, घरी जाण्यास किंवा वैयक्तिक कामासाठी सरकारकडून पागेतील घोडे सोबत नेण्यास परवानगी देण्यात येत होती.

हुसेनभाई मोतद्दार हा नानासाहेब पेशव्यांच्या विशेष मर्जीतला मोतद्दार असल्याचे कागदपत्रांतील नोंदतून कळून येते.

मुस्लिम मोतद्दारास ईदची देणगी बक्षीसादाखल सरकारकडून देण्यात येई. मोतद्दारांस १० ते १५ रुपयांपर्यंत वेतन देण्यात येत असे.[९]

१३) **चाबुकस्वार** :

चाबुकस्वार म्हणजे घोड्यांना विशिष्ट प्रशिक्षण देणारा अश्वशिक्षक या प्रशिक्षणात वेगाने दौडत जाणारे घोडे जागेवर उभे करणे, स्वाराची शीळ ऐकून घोडे माघारी बोलावणे, घोडे संथ लयीत चालवणे, पेशव्यांच्या स्वारीत अश्वांच्या कसरती करुन दाखवणे, उदा. दोन घोड्यांवर उभे राहून रपेट मारणे इ.यांसारखी प्रशिक्षण व मनोरंजनाची कामे चाबुकस्वार करीत असत.

चाबुकस्वारांना सरकारी मदत व अनुदान रोख किंवा कापड स्वरुपात दिले जात होते तसेच दरमहा १५ रुपयांपासून २५ रुपयांपर्यंत वेतनाची तरतूद होती.[१०]

**१४) कोठावळे** :

हुजूरपागेची कोठी स्वतंत्र असे, पागेच्या या सरकारी कोठीचे सर्व कामकाज कोठावळे यास पहावे लागे. हुजूरपागेची कोठी अनेक जिन्नसा व साहित्यांनी परिपूर्ण असणारे आगर होते. या सर्व साहित्याची जपणूक व वितरण कोठावळे या कर्मचाऱ्याच्या हातात असे, अर्थात कोठावळा हा पागेचा एक जबाबदार कर्मचारी होता.

यास १० ते १५ रुपयांपर्यंत दरमहा वेतन देण्यात येई.[११]

**१५) दाणेकरी** :

पागेतील घोड्यांना खाद्य म्हणून मिळणारे धान्य कोठीतून घेणे व ठराविक प्रमाणात घोड्यांना खाऊ घालणे हे महत्त्वाचे काम दाणेकरीस करावे लागत होते.

दाणेकऱ्यास दरमहा तीन रुपयांपर्यंत वेतन देण्यात होते. [१२]

**१६) जिनगर** :

घोड्याच्या पाठीवरील जीन तयार करणे, तसेच त्याच्यावर मखमल मढवणे, गोंडे लावणे, कलाबुत करणे इ.कामकाज जिनगरास करावे लागे, जिनगरास दरमहा ३ रुपयांपर्यंत वेतन असे.[१३]

**१७) नालबंद** :

घोड्यांच्या खुरांवर नाला ठोकणे, तुटलेल्या नाला काढून नवीन नाल बसवणे, नालांचा हिशोब कारकुनास सादर करणे, इ.कामे नालबंदास करावी लागत होती.

नालबंदास ७ ते ८ रुपयांपर्यंत दरमहा वेतन देण्यात येत होते.[१४]

**१८) चांभार** :

हुजूरपागेतील घोड्यांचे कातडी साहित्य उदा.जीनाच्या वाद्या, दुमची, अनीन, पट्टे, इ.साहित्याची निर्मिती व देखभाल करणे, दुरुस्ती करणे इ.कामे चांभारास करावी लागत होती.

चांभारास ३ रुपयांपर्यंत वेतन देण्यात येई.[१५]

१९) **चोपदार**:

चोप म्हणजे राजदंड, हे राजदंड बाळगणारा कर्मचारी म्हणजे चोपदार, पेशव्यांच्या सानिध्यात असणारा सरकारी नोकर, काही रसानगी चिठ्ठ्या देखील चोपदारांच्या नावे निघत.

सैन्याच्या तळावर विशिष्ट दिशेने व ठराविक लयीत, चोप फिरवून सर्व सैन्यास सांकेतिक खुणेने सूचना देणे हे चोपदारांचे प्रमुख काम, शिवाय पेशव्यांचे आगमन, निर्गमनाच्या वेळी, स्वारी मिरवणुकीत राजचिन्हांपैकी राजदंड सांभाळण्याची सर्वस्वी जबाबदारी चोपरादाची असे. यांना १२ रुपयांपर्यंत दरमहा वेतन देण्यात येत असे.[१६]

२०) **नगारची** :

घोडदळाच्या कुचाचे नगारे वाजवणे, प्रत्यक्ष लढाईत नगारा वाजवणे व स्वपक्षाला लढाईत स्फुरण आणणे, पेशव्यांच्या आगमनाची वर्दी नगारा वाजवून देणे, सैन्य तळावर परतण्यास विशेष सांकेतिक लयीत नगारा वाजवणे इत्यादी कामे नगारचीस करावी लागत.

नगारचीस ३ रुपयांपासून ४ रुपयांपर्यंत दरमहा पगार होता. [१७]

**जिल्हेदार** :

पेशव्यांच्या स्वारीतील खास आघाडीवर चालणारे घोडेस्वार, काही वेळा राजचिन्हे सांभाळण्याची जबाबदारी यांना पार पाडावी लागे.

जिल्हेदारास ७ रुपयांपर्यंत दरमहा वेतन होते.

२२) **आफ्तागीर** :

पेशव्याच्या राजचिन्हांपैकी अब्दागिरी बाळगणारे लोक म्हणजे आब्दागीरे, पेशव्यांच्या स्वारीत आगमन निर्गमनाच्या वेळी, दरबारात, सैन्याच्या तळावर पेशव्यांच्या मागे-पुढे अब्दागीर घेऊन चालणे हे यांचे काम होते.

आफ्तागीरास ३ रुपयांपर्यंत दरमहा पगार देण्यात येत होता. [१८]

२३) **सारवान** :

सांडणीस्वार म्हणजे सारवान, सैन्याच्या तळापासून पुण्यापर्यंत किंवा विविक्षित ठिकाणी टपाल, पोहोचवणे, सरकारी दफ्तरांची व निरोपाची ने-आण करणे, इ. काम सारवानास करावे लागत होते,

सारवान नेहमी जोडीने जात-येत असत व बहुधा मुस्लीम समाजातील असत. यांना ३।। रुपयांपर्यंत दरमहा वेतन होते. [१९]

२४) **पखालजी** :

हुजूरपागेत तसेच सैन्य मोहिमेवर असताना सैन्याच्या तळावर पखालीतून पाण्याचा पुरवठा करणे हे पखालजीचे मुख्य काम होते.

मोहिमेच्या काळात सुमारे १५-१६ पखालजी हुजूरपागेच्या पथकात असत. पखालजीस ३ रुपयांपासून ४ रुपयांपर्यंत दरमहा वेतन देण्यात येत होते.[२०]

२५) **दिवट्या** :

रात्रीच्या वेळी हुजूरपागेच्या लष्करी तळावर किंवा पागेत उजेडासाठी दिवट्यांची व्यवस्था करणे व रात्री त्या अंधार पडल्यापासून पहाटेपर्यंत तेवत्या ठवणे हे दिवट्याचे काम असे.

दिवटीसाठी लागणारे तेल व कापड इ. साहित्य हुजूरपागेच्या कोठीतून देण्यात येत होते, त्यांना दरमहा ३ रुपयांपर्यंत पगार होता. [२१]

## २६) **साळोत्री** :

साळोत्री म्हणजे अश्व चिकित्सक, घोड्यांच्या प्रकृतीची चिकित्सा करणे व त्यांच्यावर योग्य तो औषोधोपचार करणे हे साळोत्रीचे मुख्य काम. साळोत्री म्हणजेच शालिहोत्री यांना १५ ते २० रुपयांपर्यंत दरमहा वेतन असे शिवाय काही वेळा सरकारी मदतही मिळत. [२२]

**संदर्भ व टीपा** :

१) पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर–रुमाल अंक ३५०, पुडके १ यातील एक पत्रातील नोंद.

सिदो उधव दिम्मत मजकुर याची मातुश्री निर्वतली

सबब दुखवटीयास वस्त्रे खसखसी–१ किंमत २८ रु.

पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर–रुमाल अंक ३५४, पुडके –४ यातील एका पत्रातली नोंद :

मोरो विश्वनाथ भावे, शिलेदार विभागाचा कारकुन व शिवराम नारायण आठवले हे दोघे स्वत:साठी मुलींची स्थळे पाहण्यासाठी हुजूर पागेतील घोडे बरोबर घेऊन गेले. त्यांच्या १० दिवसांच्या चंदीचा खर्च ५ घोड्यांचा मिळून सुमारे ४६ रुपये इतका आला होता तो सरकारने अदा केला.

२) पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर, रुमाल अंक ३५०, पुडके ५ यातील झडती इ.स.१७७३ –१७७४

३) पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर, रुमाल अंक ३५०, पुडके १ व पुडके ४ यातील पत्रांतील नोंदी :

मुदनखान बारगीर यास मुलाच्या लग्नासाठी १०० रुपये बक्षीस म्हणून देण्यात आले.

महादजी जगदाळे बारगीरास त्याच्या मृत्युनंतर कुटुंबियास म्हणजे आई व त्याचाभाऊ यांना दुखवट्याची वस्त्रे म्हणून साडी व पागोटे देण्यात आले त्याचा खर्च सुमारे १६।। रुपये इतका झाला होता.

घडणी दफ्तर रुमाल ३५०, पुडके ८ मधील नोंदीनुसार इ.स.१७८० मध्ये जरिपटक्याच्या निशाणाजवळ बहादुरसिंग बारगीर नेमणुकीस असताना आजारपणात त्याचा मृत्यू झाला त्याच्या उत्तरकार्याचा खर्चासाठी १५ रुपयांची तरतुद करण्यात आली.

४) पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर, रुमाल अंक ३५०, पुडके मधील पत्रातील नोंदीनुसार जखमी शिलेदार पेशव्यांना भेटावयास आले असता वस्त्रे–प्रावर्ण देउन त्यांचा समाचार घेण्यात आला होता.

५) पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर, रुमाल अंक–३५०, पुडके–१ यातील इ.स.१७४०–४१ ची एक यादी यात हुलस्वाराचा पगार रुपये ४ रुपये इतका नमूद आहे.

६) पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर, रुमाल अंक –३५०, पुडके –१ यातील पत्रातील नोंदीनुसार सुभाना मांग बारगीर मृत्यू पावला त्यास कफनासाठी एक शेला ४।। रुपये किंमतीचा देण्यात आला.

याच पुडक्यातील दुसऱ्या नोंदीनुसार गोद राऊत बारगीराचा अंत्यविधी व उत्तरकार्य सरकारकडून करण्यात आले.

७) पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर, रुमाल अंक :३५०, पुडके –१, यातील इ.स.१७४०–४१ मधील यादी यात खासदार म्हणून काम करणाऱ्या लोकांची संख्या १२९ इतकी नमूद आहे.

८) पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर, रुमाल अंक ३५४ मधील इ.स.१७९२–९३ मधील नोंदीनुसार १५ लोक पोरगे म्हणून काम करीत असल्याचे आढळते.

९) पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर, रुमाल अंक – ३५०, पुडके –१ व २ मधील नोंदीनुसार हुसेन मोतद्दार व माणिक मोतद्दार यांच्या भावाच्या मृत्युनंतर कफनाच्या कापडाची सरकारी तरतुद करण्यात आली.

घडणी दफ्तर, रुमाल अंक ३५१, पुडके –३, मधील इ.स.१७६५–६६ मधील एका नोंदीनुसार हुसेन मोतद्दाराचा उत्तरकार्याचा १०० रुपयांचा खर्च सरकारकडून करण्यात आला.

१०) पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर, रुमाल अंक ३५०, पुडके –२ मधील एका पत्रातील नोंदीनुसार सुभाना चाबुकस्वाराने पागेतील घोडे बरोबर नेले त्यांच्या दाणा वैरणीचा खर्च सरकारकडून केला गेला,

घडणी दफ्तर, रुमाल अंक ३५४, पुडके ५ मधील नोंदीनुसार गोदाजी गायकवाड चाबुकस्वार याने दोन घोड्यावर उभे राहून रपेट मारुन दाखविली तेव्हा सवाई माधवराव पेशव्यांनी १५ तोळे वजनाचे २२५ रुपये किंमतीचे सोन्याचे कडे त्यास दरबारात बक्षीस देवून त्याचा सत्कार केला.

११) पहा– पुणे पुरालेखागार, घडणी दफ्तर, रुमाल अंक ३५०, पुडके –१ मधील इ.स.१७४०–४१ ची एक यादी, यात एकूण ८ कोठावळे हुजूरपागेच्या पथकात असल्याची नोंद आहे.

१२) पहा –उपर्युक्त यादी

१३) कित्ता

१४) कित्ता

१५) कित्ता

१६) कित्ता

१७) कित्ता

१८) कित्ता

१९) कित्ता

२०) कित्ता

२१) कित्ता

२२) मोनुद्दीन साळोत्री याला वडीलांच्या मृत्यूसमयी सरकारकडून २० रुपयांची मदत देण्यात आली. संदर्भ पुणे परालेखागार : घडणी दफ्तर, रुमाल अंक ३५०, पुडके १, यातील नोंद.

**शब्दार्थ :**

रतीब :– प्रकरण ३ मध्ये पहा (शब्दार्थ).

चंदी :– प्रकरण ३ मध्ये पहा (शब्दार्थ).

कोठी :– धान्य व इतर जिन्नस ठेवण्याचे भांडार.

जामदारखाना :– वस्त्रागार व रत्नागार, भांडार.

शेला :– वस्त्राचा प्रकार.

पागोटे :– शिरोवस्त्र.

तिवट :– शिरोवस्त्राचा प्रकार.

घडणी :– हिशोबी कागद.

करोल :– बंदूक घेऊन लढणारा स्वार.

अडाव :– वाटेल ते हत्यार घेऊन लढणारा आडहत्यारी.

जीन :– प्रकरण ३ मध्ये पहा (शब्दार्थ).

खोगीर :– प्रकरण ३ मध्ये पहा (शब्दार्थ).

कलाबुत :– जरीकाम केलेले कापड.

दुमची :– प्रकरण ३ मध्ये पहा (शब्दार्थ).

अनीन :– प्रकरण ३ मध्ये पहा (शब्दार्थ).

अब्दागिरी :– राजा किंवा राजप्रतीनिधी यांच्या डोक्यावरील छत्र, गोलाकार पंख्यासारखे राजचिन्ह.

पखाल :– रेड्याच्या पाठीवरून वाहिली जाणारी पाण्याची कातडी मोठी पिशवी.

दिवटी :– कापडाची वळकटी करून उजेडासाठी पेटवलेली बत्ती.

# प्रकरण ५ वे

## निष्कर्ष

१८ व्या शतकात सफविद्, तुर्की, मुघल व मांचू साम्राज्ये लयास गेली हे शतक भारताच्या दृष्टीनेही स्थित्यंतराचे शतक ठरले. मुघल साम्राज्याच्या ऱ्हासाने निर्माण झालेली पोकळी प्रादेशिक राज्यांच्या उदयाने भरुन निघाली. या राज्यांना 'वारस राज्ये' असे संबोधले जाते. मुघल साम्राज्याचे विघटन व 'ब्रिटीश ईस्ट इंडिया' कंपनीचा राजकीय सत्ता म्हणून झालेला उदय या दोन घटनांनी भारतभर सामाजिक व आर्थिक पुनर्मांडणीला प्रारंभ झाला. जेम्स मील, जदुनाथ सरकार, इरफान हबीब, प्रा.अथर अली यांसारख्या इतिहासकारांनी १८ व्या शतकाच्या संदर्भात भारतातील राजकीय, सामाजिक व आर्थिक स्थित्यंतराचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. विसाव्या शतकातील सातव्या–आठव्या दशकात आठराव्या शतकाच्या संदर्भात वादंगाला सुरुवात झाली. एरिक स्टोकस्, सी.ए.बेली, डेव्हीड वॉशब्रुक यांसारख्या इतिहासकारांनी मिल व सरकार आदि विचारवंताच्या मांडणीला छेद देणारे लिखाण केले. या नूतन मांडणीमधून अठरावे शतक म्हणजे 'स्थितिशीलता' व 'काळा कालखंड' ही विचारधारा मागे पडून 'आर्थिक सुबत्ता' ही मांडणी पुढे आली. मराठ्यांच्या इतिहासासंदर्भात आंद्रे विक, स्टुअर्ट गॉर्डन, सुमित गुहा यांसारख्या विद्वानांनी लेखन केले आहे. [१]

मराठ्यांचे स्वराज्य हे मूलतः मुघल साम्राज्याच्या अवशेषावर उभे होते. बाळाजी विश्वनाथाने १७१९ मध्ये दिल्लीहून स्वराज्य व चौथाईच्या सनदा आणल्या नंतर मराठा सत्तेचे अर्थकारण व लष्करी व्यवस्था किंचीत बदलल्याचे अनेक कागदपत्रांवरुन सिद्ध होते. इ.स.१७२० पासूनच पेशवा बाजीरावाने आक्रमक लष्करी धोरण अवलंबिले त्यामुळे मराठ्यांच्या लष्करी हालचाली पूर्वीपेक्षा वेगाने होवू

लागल्या. सरदेशमुखी व चौथाईच्या वसुलीवरुन मराठ्यांच्या अनेक प्रादेशिक सत्तांबरोबर झालेल्या संघर्षाचे प्रसंग थोडे नाहीत.

इ.स.१७२० नंतर मराठा सत्तेला स्थिरता लाभली. यानंतरच्या काळात पेशव्यांनी शेती व महसूल वाढीकडे लक्ष दिले. व्यापार उद्योगांना अनेक सवलती देण्याकडे पेशव्यांचा कल होता. यातून अर्थकारणाची घडी बसविण्याचा पेशव्यांचा मानस स्पष्ट होतो.

नानासाहेब पेशवा व त्यांच्या नंतर झालेले पेशवे यांच्या काळात अर्थकारणाच्या दृष्टीने हुजूर पागेकडे खर्च करण्यात आलेल्या रक्कमांची आकडेवारी पाहता १८ व्या शतकात आर्थिक सुबत्तेची जी मांडणी केली गेली आहे; तिला पुष्टी देता येते. या खर्च रक्कमांचे महत्त्व लक्षात घेण्यासारखे आहे. १७४० मध्ये हुजूर पागेचा वार्षिक खर्च साधारण २ लाख रुपये होता. १७८०–९० च्या काळात हुजूरपागेच्या खर्चाची मर्यादा ४ ते ५ लाख रुपयांपर्यंत गेली व हुजूर पागेच्या साधनांतही समृद्धी झाली होती.

पाश्चात्य राष्ट्रांकडील तंत्रज्ञान हुजूर पागेच्या आधुनिकतेसाठी स्विकारले होते किंवा नाही याचे तपशीलवार प्रत्यंतर देणारी साधने उपलब्ध नाहीत. परंतू लष्करी साधनांच्या यादीत फिरंगाणी जीन, फिरंगाणी अनीन यांचे उल्लेख आढळतात. पेशव्यांच्या काळात अरब, सिद्दी, अफगाणी, गारदी यांसारख्या परदेशी भाडोत्री सैन्याची भरती लष्करात केली होती. बंदुका व तोफा यांच्या तंत्रज्ञानासाठी तर केवळ परकीयांवर अवलंबून राहण्याची पाळी मराठ्यांवर आली होती. हे तंत्र आत्मसात करण्याची व प्रशिक्षणाची तजवीज करण्याकडे मराठा राज्यकर्त्यांचा कल नव्हता.

१८ व्या शतकाच्या चौथ्या दशकात मराठ्यांच्या हिशोब पद्धतीतही स्थित्यंतर घडून आले. यादवांच्या काळापासून महाराष्ट्रीय हिशोब पद्धतीचा विशिष्ट नमुना

प्रचलित होता. या नमुन्यानुसार गावाचा, प्रांताचा, राज्याचा हिशोब ठेवण्याची व्यवस्था होती. विशिष्ट नमुन्याची हिशोब लेखनाची पुस्तके म्हणजे मेस्तके हेमाडपंताच्या काळापासून वापरली जात. लेखनिक या पुस्तकाचा आधार घेवून हिशोब लिहित असत. राजवाड्यांसारख्या इतिहासकारांनी या मेस्तकांवर लेख प्रसिद्ध केले आहेत. [२]

राज्याचा खर्च अनेक वेळा परस्पर भागविण्याची तरतूद राज्यकर्ते करीत. अशावेळी परस्पर भागविल्या जाणाऱ्या खर्चाच्या सदरात रक्कम मोठी व जमेच्या सदरात या रक्कमेचा फरक येवून हिशोबात तफावत येत असे. तेव्हा पाश्चात्यांची 'डबल एन्ट्री' ही हिशोब पद्धत[३] मराठ्यांनी १७४० च्या आसपास स्विकारल्याचे दिसते. यामुळे जमा–खर्चाचा मेळ बसून हिशोबात तफावत येण्याचे प्रमाण पुष्कळच कमी होवून हिशोबात पारदर्शीपणा आला. या डबल एन्ट्रीच्या हिशोब पद्धतीस 'दुबेर्जी' असे संबोधन देण्यात आले. (पहा परिशिष्ट पत्र क्र.१३)

एकंदरच १८ व्या शतकाचा 'हुजूरपागे' च्या संदर्भात विचार करता चौथाई सरदेशमुखीच्या वसुलीसाठी पेशव्यांना आपले घोडदळ वाढवणे भाग पडले. त्यांनी वेळोवेळी पागेच्या समृद्धीसाठी प्रयत्न केले. थोडेबहुत आधुनिक तंत्रज्ञानही स्विकारले. मुघल साम्राज्याचे अवशेष जतन करण्यासाठी मराठे आपल्या लष्करी सामर्थ्याचा उपयोग करित होते. या सामर्थ्याचे मर्मस्थान मराठ्यांचे घोडदळ होते. मुघलांच्या केंद्रीय सत्तास्थानाचे जतन करीतच मराठ्यांनी आपले साम्राज्य निर्माण करुन १८ व्या शतकात झालेल्या स्थित्यंतरात आपली महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

मराठा कालखंडात लष्करात दाखल होणारे घोडे सर्रास शुभाशुभ लक्षणे पाहून घेत. शुभाशुभ लक्षणांबाबत समाजात काही समजुती रुढ होत्या. अश्वचिकित्सक आपल्या ज्ञानाचा व उपलब्ध औषधींचा उपयोग करुन घोड्यावर औषधोपचार करीत होते. ऋतुमानानुसार घोड्यांना योग्य तो आहार दिला जात होता.

मुघलांच्या घोडदळाची संपूर्ण व्यवस्था मनसबदारी पद्धतीने चालविली जात होती. त्यामुळे मुघल लष्करात पथकांची व घोडेस्वारांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. मनसबदारीचा सर्व कारभार मध्यवर्ती शासनाच्या हातात होता, मराठा घोडदळाच्या व्यवस्थेत हुजूरपागा व सरंजामी सरदारांची घोडदळाची पथके असा भेद प्रामुख्याने दिसतो. हुजूरपागेचे संपूर्ण व्यवस्थापन मध्यवर्ती शासनाकडे होते, तर सरंजामदार आप–आपल्या पथकांची स्वतंत्र व्यवस्था ठेवीत व त्या पथकाचे व्यवस्थापनही तेच पाहात होते. मुघलांप्रमाणे मराठा लष्करात घोड्यावर डाग देवून ओळखण करण्याची पद्धत वापरात नव्हती असे दिसते.

हुजूरपागेच्या पथकात अनेक लढाऊ लोकांबरोबर बिन लढाऊ लोकांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर होता. या सर्वांचे मिळून एक संघटन होते. हे संघटन म्हणजे मराठ्यांच्या सत्तेचे एक बलस्थान होते. या संघटनात्मक कारभारामुळेच मराठ्यांच्या सत्तेचे दृढीकरण होताना घोडदळ हे मराठ्यांच्या सत्तेचे मर्मस्थान होते, हे सहज लक्षात येते.

हुजूरपागेच्या कर्मचाऱ्यांमध्ये सर्वांनाच वेतनश्रेणी एकसारखी दिसत नाही. पात्रता, योग्य तो अनुभव, पदाचे महत्त्व यांवर वेतनाची निश्चिती होत होती असे दिसते. अनुदानाच्या बाबतीतही कारकुन, बारगीर, मोतद्दार, साळोत्री यांनाच अनुदानाची मदत मिळत होती पण अपघात किंवा लढाईत मरण पावलेल्यांचाही परामर्ष योग्य त्या रितीने घेतला जात होता. यात पदाचा किंवा जातीधर्माचा भेदा–भेद केला जात नव्हता असे दिसते.

हुजूरपागेच्या चंदी–रतीबाबाबत मध्यवर्ती शासन विशेष जागृत होते. लाखो गवताच्या पेंढ्या व खंडोगणती धान्य हुजूरपागेच्या व्यवस्थेकडे निर्गमित करण्यासाठी जारी केलेल्या सनदा, पत्रे, रसानगी याद्या यांवरुन हे लक्षात येते.

हुजूरपागेच्या चंदी–रतीबाच्या खर्चासाठी काही गावांचे संपूर्ण महसुली उत्पन्नही राखीव ठेवीत. सरकारच्या उत्पन्नांच्या अनेक साधनांपैकी कित्येक बाबींतून मिळणारे उत्पन्न हुजूरपागेच्या खर्चाकडे देत असत. त्यातून कोणतीही चणचण भासणार नाही याची दक्षता घेतलेली दिसून येते.

घोड्यांच्या खुराकाबाबत कोणतिही हेळसांड करीत नसल्याचे दिसते. घोड्यांना दिल्या जाणाऱ्या रतीब–खुराकातून लोणी, तूप, शेळीचे दूध, गूळ, मिठाई इ. पदार्थाचे आलेले उल्लेख घोड्यांची देखमाल निगुतीने करीत असल्याचे समजते.

घोड्यांना दह्या–दुधाने अंघोळ घालणे, सजावटीसाठी घोडयांना रंग देणे यांवरुन कलात्मकता दिसून येते. शिवाय घोड्यांच्या सजावटीत रेशमी गोंडे, मखमलीच्या गाद्या, जीन, दुमच्या इ.वस्तू समृद्धता दर्शवितात. खाशा घोड्यांच्या सजावटीत तर कोणतिही उणीव ठेवीत नसत. उच्च –प्रतीच्या मखमल कापड यांच्या वापरावरुन ह्या गोष्टी ध्यानात येतात.

स्वारांच्या उपयोगी साधनांमध्येही अनेक वस्तू जमानिमाच्या बाबींमध्ये असत, जीन, खोगीर, जेरबंद, सरोसरा, भुरक्या, मांडगादी, चवाली, इ. साधनांमध्ये अनेक प्रकार वापरात होते. यांवरुन मराठा घोडेस्वार अनेक साधनांनी लिप्त असत असे दिसते.

घोड्यांची निगा राखण्याच्या बाबतीतही दक्षता घेतली जात होती. आजारपणात योग्य तो औषधोपचार व दैवी उपायांचा आधार घेतला जात होता यांवरुन घोड्यांना किती आपुलकीने सांभाळत असत हे समजते.

पागेच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अपघाताची घटना घडल्यास संबंधितांस योग्य ती नुकसान भरपाई देत. यात पदश्रेणी किंवा जात–पात यांची बंधने नव्हती हे स्पष्ट होत आहे. लढाईच्या मैदानावर ठार झालेल्यांचा विशेष परामर्ष घेत होते हे उपलब्ध नोंदीवरुन स्पष्ट कळून येते.

पागेतील घोडी जातिवंत व किंमती असत त्यांना मनमोहक नाव देण्याची प्रथा प्रचलित होती. असे घोड्यांना दिलेल्या विशिष्ट नावावरुन दिसून येते.

सरकारी व खाजगी कामासाठी वापरण्यात येणारे घोडे पागा सोडून बाहेरगावी गेल्यास त्याच्या चंदी–रतीबाची आबाळ होऊ नये म्हणून सरकार खर्चाची रक्कम उपलब्ध करुन देत असे यावरुन घोड्याची आबाळ होऊ नये हा हेतू कळून येतो.

उपलब्ध नोंदीवरुन मोहिमेच्या काळात हुजूरपागेकडे कर्मचाऱ्यांची भरती तात्पुरत्या स्वरुपात केली जात होती व आवश्यकतेनुसार मनुष्यबळ उपलब्ध केले जाई हे लक्षात येते. इ.स.१७७५ व १७७७ मधील नोंदीवरुन हुजूरपागेत हजारोंच्या संख्येने घोडे व इतर जनावरे होती. या सर्व जनावरांची देखभाल, रबीब, चंदी, निगा इ.बाबतीत मध्यवर्ती प्रशासन काळजीपूर्वक आवश्यक त्या गोष्टी उपलब्ध करुन देत होते हे समजते.

हुजूरपागेत असणाऱ्या कोठीच्या साहित्यात, हळद, कुंकू, मीठापासून लष्करी साहित्यापर्यंत ज्या गोष्टी होत्या त्यावरुन मराठी सत्तेची समृद्धता समजून येते. लष्कराच्या दृष्टीने ही बाब घोडदळाचे महत्त्व वाढवणारी होती हे कळते.

एकंदरच हुजूरपागा हे मराठ्यांच्या मध्यवर्ती शासनाचे समृद्धता, वैभव, संघटन, कार्यक्षम प्रशासन, सुनियोजित व्यवस्थापन यांचे प्रतिबिंब असल्याचे या अभ्यासाच्या निष्कर्षातून स्पष्ट होत आहे.

-------------------------------------

संदर्भ :


१. अठराव्या शतकातील भारतीय इतिहासाचे नवे आकलन. लेखक, प्रा.सुमित्रा कुलकर्णी, नवभारत – जुलै २०१०.

२. 'मेस्तकपुस्तक', लेखक, वि.का.राजवाडे, भारत इतिहास संशोधक मंडळ अहवाल, शके १८३४.

३. सोल जेकब, द रेकनिंग : फायनान्शिअल अकाउंटेबिलिटी ॲण्ड द राइझ ॲण्ड फॉल ऑफ नेशन्स, बेसिक बुक्स्, २०१४.

## परिशिष्ट

परिशिष्टात एकूण १३ अस्सल पत्र समाविष्ट केली आहेत. पहिल्या पत्रात मोडी लिपीतील अस्सल साधनाची छायाप्रत देवून त्याचे लिप्यंतर त्या सोबतच दिलेले आहे.

परिशिष्टातील अस्सल पत्रांपैकी पहिले पत्र भारत इतिहास संशोधक मंडळाच्या दफ्तरखान्यातील पुरंदरे दफ्तरातील आहे. उर्वरित बारा पत्रांची मूळ छायाप्रत दिलेली नाही. फक्त बाळबोध लिप्यंतर तितके दिले आहे.

या १३ पत्रांमधून कोणकोणती माहिती मिळते याचे विवेचन येथे देत आहे. म्हणजे पत्रातील मजकुराचे महत्त्व लक्षात येईल व त्यातील माहितीची उपयुक्तता समजेल.

**पत्र क्रमांक १ :**

या पत्रात घोड्याचा रतीब, खुराक, आजारपण इत्यादी माहितीचा समावेश आहे. औषधोपचार तसेच सजावट साहित्याची माहिती यापत्रातून मिळते.

**पत्रक्रमांक २ :**

बारगीर, राऊत, मोतद्दार, शिलेदार, सारवान, खासदार, दाणेकरी, आफ्तागीर, दिवट्या, पखाली, नालबंद, नगारची, चांभार, किरकोळ काम करणारा, कोठावळे, रिकिबदार, जिल्हेदार, हूलस्वार, जिनगर इ. लोकांच्या मासिक वेतनाची माहिती मिळते, तसेच त्यांनी लष्करातील संख्या समजते.

**पत्र क्रमांक ३ :**

यापत्रात घोड्यांच्या किंमती किती होत्या, जातीनुसार काय किंमत होती, घोड्यांच्या जाती, याबाबतच्या माहितीचा उल्लेख या पत्रात आलेला आहे.

**पत्र क्रमांक ४ :**

जीनाच्या गादीस कोणत्या प्रकारचे कापड वापरत, कापडाचे प्रकार व किंमत, बारगीराच्या मृत्यूसमयी मिळणारे अनुदान स्वरुपातील कापड, चिमणगिरी अनीन, गेंद जोड, सरोसरा, इत्यादी विषयीची माहिती या पत्रात आली आहे.

**पत्र क्रमांक ५ :**

पागेच्या कर्मचाऱ्यांना मिळणारी सरकारी कापडाची मदत, कर्मचाऱ्यांच्या मृत्युनंतर बायकोस मिळणारी सरकारी कापड स्वरुपाची मदत, घोड्याच्या साहित्यासाठी वापरले जाणारे कापडाचे प्रकार, निशाणासाठी वापरल्या जाणाऱ्या जरीच्या कापडाची किंमत, मखमलीचा दर, खाशा स्वारींच्या घोड्याचे सजावट साहित्य, इत्यादी माहिती यापत्रात आली आहे.

**पत्र क्रमांक ६ :**

खाशा घोड्याची सजावट, रेशमी तोडे, बारगीरांस सन्मानार्थ दिली जाणारी वस्त्रे, बारगीरांची नालबंदी व वेतनाची रक्कम इ.माहिती मिळते.

**पत्र क्रमांक ७ :**

एका मोहिमेचा खर्च, उंबरे येथील पागेच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा खर्च, घोड्यांची खरेदी, सरकारकडून केला जाणरा पागेचा खर्च विविध बाबींमधून परस्पर भागविला जात होता याच्या नोंदी, कर्ज घेवून पागेसाठी घोडे खरेदी केल्याचे उल्लेख, उच्च प्रतीच्या जातींच्या घोड्यांच्या किंमती, बारगीरांची नालबंदी, इ.माहिती या पत्रात आहे.

**पत्र क्रमांक ८ :**

घोड्यांच्या किंमती, रंग, ओळखीच्या खुणांचे उल्लेख, सदाशिवराव भाऊंस दिलेला मोहिम खर्च, पागेला मिळणारे महसुली उत्पन्न, सापडलेले बिनधनी घोडे, सरकार जमा केल्याची नोंद, चांगल्या प्रतिच्या घोड्यांची खरेदी, शिंगरांना शेळीचे

दूध मिळावे म्हणून पागेकडे केलेली शेळ्यांची व्यवस्था, कुणबीण, पागेसाठी विविध ठिकाणांहून केलेली गवताची व्यवस्था, इत्यादींच्या नोंदी यापत्रात आहेत.

**पत्र क्रमांक ९ :**

घोड्यांच्या रतीब, चंदी इत्यादिंची व्यवस्था, धान्य खरेदी करण्यासाठी खर्च केलेली रक्कम, घोड्यांची चोरी, घोड्यांचा दररोजचा खुराक, मजल मसाला, चाबुकस्वारास व मोतद्दारास बक्षीस दिलेले सोन्याचे कडे, चोख सोने, ही उपयुक्त माहिती यापत्रात आली आहे.

**पत्र क्रमांक १० :**

पागेचा जमा खर्च लिहिण्यास लागणाऱ्या कागदांची व्यवस्था, खाशा घोड्यांचे सजावटीचे किंमती साहित्य, घोड्यास रंग देण्याची पद्धत, घोड्यांचे आजार व औषधोपचार, इत्यादी नोंदी यापत्रात आहेत.

**पत्र क्रमांक ११ :**

पागेसाठी लाखो गवतांच्या पेढ्यांची केलेली व्यवस्था, विनामूल्य सेवा करण्यासाठी नेमलेले मांग, महार, चांभार इ.लोक, सरकारी घोडे खाजगी कामासाठी पाठविले असता त्यांचा सरकारने केलेला खर्च या विषयासंदर्भातील नोंदी यापत्रात आढळतात.

**पत्र क्रमांक १२ :**


कर्ज घेवून पागेच्या कर्मचाऱ्यांची वेतन तजवीज, इ.स.१७५०–५१ चा पागेचा वार्षिक खर्च, इ.नोंदी यापत्रात आहेत.

**पत्र क्रमांक १३ :**

एक बेरजी व दुबेरजी हिशोबांची पद्धत, १७७४–७५ मधील पागेसाठी खर्च करण्यात आलेली रोख रक्कम, कापडाची किंमत, विविध ठिकाणांहून पागेसाठी परस्पर खर्च भागविल्याच्या रक्कमा इत्यादी माहिती यापत्रात सापडत आढळते.


## पत्र क्रमांक १ अस्सल मोडी पत्र


पुरंदरे दप्तर, भारत इतिहास संशोधक मंडळ,  पुणे यांच्या सौजन्याने



[illegible]

६। ठोम्लयरघोशया।
ऽेंप्योगठीजुमगा४
उघघपडि३ठीगी४
पमोरपघो४छट
पाष्
६५ छटचोवऽीणोऽ।
पोऽायोऽपागठी
जुम्गा४ठघघवा।
वांठेधम्गापमोर
यपाधिम्लाछऽोज
६। धंजमत्यागघेका।
घाऽेपोगठीजुम
गा४ठघघशाधिमा।
पदाधिम्गापपवा।
छक्कनाव
६ो। म्गनिमन्नदिपा।
ठीन्जपजाघयम
ठघघगी४पवोव
छ७२नाघ
६५ धंक्रुठीन्योटि।
ठयागघ्वाोऽप
ठधेम्गापवोव।





६= छेञ्चोवेदाघरे

६ा। छेञ्चोवेदाघरे

॰)॰ [illegible] वने

१।।

६ा। चेकाचाठमडुनिबंधडिपा

डा अल्डेडनोवरनिगमे

[illegible]निगाताउ

१।।३।

॰)।॰ डोभुमाडागेमिनामडुअंदडिपा

डायाडेडनोवरस्ले[illegible]

दाम्हेडडु दम्भिननागमनाप्यावर[illegible]

डोपनामडेवडोमरस्ले[illegible]पा

प

घा। घेवि

॰।।।= छकुगेमिपांज्ञापो


इयाडजपम्भडुसाडम

छान मसलपेलडछा[illegible]

पाक्षे

॰)। पांपडुमडु ४ ००.

६= मोहरपका ००.



## पत्र क्रमांक १ मराठी लिप्यंतर

श्री इ.स.१८१२–१३

यादी पागेकडे स्वारी पंढरपूर श्रीमंता समागमे खासगत राजश्री निलकंठराव माहादेव सुहूरसन सलास आशेरीन मयातेन व आलफ गुजारत गणेश सखाराम सरनाईक माहे रजब उर्फ आशाढ मास बाबत तालेबंद स्वारीचा इस्तकबील छ.२ तागाईत छ.२९ रोज.

८१३।।–।। खरेदी

| | |
|---|---|
| ४७५।।.।।. | हरभरे कैली ८$^6$= ।१.।।।. दर सरासरी $^6$।७$^6$– ।।. प्रमाणे रूपये |
| १६। = | बाजरी कैली .।.। = ।। दर सरासरी ८। = ।।।१।. |
| २२१$^6$ ≡ | पुले सुमारी कडबा २०३४० दर सरासरी |
| १०० | घोडा निला येक चश्मी रास १, गुजारत तुलाजी पाटील जाधव छ.२३ रोज |
| .।।. | सूत लोहकरीचे काले तोले सुमारी ४ येकूण |
| ८१३।।–।।. | |

१२।।।≡। घोड्याकडे

६ अैन चरिंदा

१ राजोऱ्या तटू नारायणभट
शालिग्राम याचे
कुटुंब पंढरपूरास आले

6 ÷ हुका बोर घोड्याचे पोट दुखू लागले. सबब वेखंड, गुगुळ, मीरे व बेल छ.५ रोज.

6 –। छ.८ रोज चितोडा घोडा याचे पोट दुखू लागले सबब वोवा, सेंदलोण, व मीरे व पादेलाण छ.८ रोज.

6 ÷ पंचकल्याण घोड्याचे पोट दुखू लागले सबब शेंदेलोण व पादेलोण व वोवा छ.११ रोज.

6 –। पंढरपुरी घोडीस पीठ बाजरीचे व सेंदेलोण व वोवा.

6 =।। कर्डी जमिदारी घोडीस वाखा जाहला सबब गुल व वोवा छ.१२ रोज.

6 ÷ भालदाऱ्या जर्दा याचे पोट दुखू लागले सबब छ.२४ रोज

6 ÷ पाहाड घोडा याचे पोट दुखू लागले सबब छ.२५ रोज

.।।।–।।।.

४।।।–। मजल मसाला चरावयास

येकूण रूपये

६ ≡ ।। मार्तंड घोड्यास

गुल व हलद

6४।  6४6९

व भांग व पीठ बाजरीचे

6४।.

कैली 6४।.  येकूण

४।।–।।. छ.७ रोज पंढरपूरास स्वारी

गेली तेथे मसाला

रास येकूण रूपये

१।। ≡ गुल 6।.दर

66६

छ.१२ रोज

6।।। माणक्या घोडा डागला त्यास उपल्या छ.१२ रोज

6÷ पनाशा जर्दा याचे चवाले दुनविले सबब सूत तोले लोहोकरीचे छ.१३ रोज

.।÷ कोयली कुमाईत घोडीस रिकिबी सुमारी येकूण छ.१५ रोज

6≡। दही घोडी धुवावयास छ.१८ रोज वजन 66३

6।।। कटमाल घोडीस दही धुवावयास छ.२३

१।.।

१२।।।≡।

१6≡। उष्टरखान्याकडे

१ खेरीज चरिंदा

6 ≡ छ. २१ रोज

6 = छ.२४ रोज तोबरे

6 .।।।. छ.२५ रोज तोबरे

.।. छ.२८ रोज

१।। –

6 –।। जिनगर याजकडून मार्तंड घोडा याची सरोसरा नीट केली त्यास जिनगरास

१।।=।।

.।।. सिलकी डागिन्याकडे मार्तंड घोडा याची सरोसरा रुप्याची होती ती मोडली तिजला नीट करावयास गुजारत सिवरामसेट सोनार रूपे छ.१७ रोज,

५।।– बाजेखर्च

.।।।≡ बापू गोखले यांच्या घोड्यास सरदी जाली त्यास मसाला करून दिल्हा छ.१२ रोज

.।।. पिंपलमूल 66।.

6≡ मीरे वजन 66।.

6 =।। सिंगरूप 666१

6 – । पीठ हरभऱ्याचे वजन 6४।।.

6।. लवंगा तोळा 666१

.।।।≡

## पत्र क्रमांक २

घडणी दफ्तर अंक – ३५०, पुडके – १

राजमंडळ (इ.स.१७४०–४१)

स्वारी राजश्री पंतप्रधान

खर्च ब।। मु।। पागा हुजूर

पोता पैकी माहे जिल्हेज रूपये

१२३९ छ.१६ रोजमुरा येकमाही ब।।
गु।। रूपये १७०४।। पैकी वजा
मोतादार रूपये ५ बाकी
१६९९ अैन बाकी
३९।। जाजती

११ बारगीर
१० मीरखान
१ तुकोजी कदम
११

२।। गण राऊत मांग सिलेदार
३ फतेभाई मोतादार पुण्याहून आला
२० आपाजी थोरात सिलेदार
३ इनायत सारवान जदीद छ. १५ जिलकाद

३९।।

१७३९

तपसील

छ.१६ रोजमुरा

४९५ बारगीर ५९

७१३।। सिलेदार असामी ६५

| | | |
|---|---|---|
| | ३९ | दाणेकरी अ।। १३ |
| | ३०३ | खासदार अ।। १४३ |
| | | ४४ मोताददार अ।। १४ |
| | | २५९ खासदार अ।। १२९ |
| | | ३०३ १४३ |
| | १८८ ।। | बाजे लोक असामी ५४ |
| | | ६ अफ्तगीर अ ।। २ |
| | | ७ सारवान अ ।। २ |
| | | ३ दिवट्या १ |
| | | ४२ पखाली अ ।। १४ |
| | | ४७ नालबंद अ ।। ७ |
| मागील बाजू :- | | ९ नगारची अ ।। २ |
| | | ४ चांभार अ ।। २ |
| | | ९ अफराद २ |
| | | १० ढाले असामी ५ |
| | | १८।। कोठवले अ।। ८ |
| | | ६ रिकीबदार अ।। २ |
| | | ९ जिल्हेदार अ।। ३ |
| | | ८ हुलस्वार २ |
| | | १० जिनगर २ |
| | | १८८ ।। |
| | १७३९ | |

पैकी वजा पेसजी छ. १२ जिल्हेजी
अदा रूपये ५०० बाकी

## पत्र क्रमांक – ३

घडणी दफ्तर अंक – ३५०, पुडके – १

राजमंडळ (इ.स.१७४०–४१)

खर्च पागाहुजूर परभारा आदा

घोडी रास येकूण किंमत रूपये

१२ छ. २२ रमजान ख।। गु।। हरि पोरगा
तटू कुमेत १

७०० छ. २९ सवाल ब।। भेट नसरतदौला
सुभा बराणपूर घोडा जर्दा १

५०० छ.२१ रौवल ब।। नजर नजर सैद लस्करखान
घोडा बोर रास १

३७ छ.११ जिलकाद ख।। तटे
१४ कर्दा गु।। महिमाजी वीर १
२० कुमेत गु।। गोरी खान $\frac{1}{2}$

३४

४०० छ. १३ जिलकाद कर्ज गु।। तुलासी चव्हाण
नि।। सिदोजी राऊत घोडा सांरगा १

५०० छ. १६ जिलकाद कर्ज गु।। म्हसाजी
चव्हाण नि।। सिदोजी राऊत घोडी बोर १

११५ छ. १६ जिलकाद ब।। भेट नबाब
निजामनमुलुक
१०० कर्दा १

१५ कुमेत तट्टू $\frac{1}{2}$

---

११५

३०० छ. २० जिलकाद ब।। भेट जगतराज बुंदेले

घोडा बोर दुपटा १

६०० छ.२४ जिलकाद ब।। भेट यार महमद

रोहिला भूपालकर घोडा कुमेत रास १

३५० छ.२६ जिलकाद ब।। भेट बागडे

२०० घोडा बोर रास १

१५० घोडा कुमेत $\frac{1}{2}$

---

३५०

४५० छ.५ जिल्हेज कर्ज गु।। बालाजी

आपाजी दि।। गोजाजी ढमढेरे

घोडा निला रास १

४०० छ.२० मोहरम ब।। भेट सवाई जैसिंग गु।।

अंताजी कृष्ण दि।। महादेवभट हिंगणे

घोडा अंबरी निला १

१०० छ. २२ मोहरम ब।। भेट विश्वासराऊ कृष्ण

घोडा अबलख रास १

२५० छ.२३ मोहरम ब।। दुर्जनसिंग अहिर गु।।

गोविंद बलाल ब।। वोलाबाकी पैकी

घोडा कुमेत तुरकी १

१२५ छ.२६ सफर क।। सुकलारी? गु।। संताजी मोरे

खंडणी पैकी जर्दी घोडी ब।। जोरावर सिंग १

५०० छ.२५ रमजान ब।। स्वारी राणोजी सिंदे गु ।।

रामचंद्र बावा घोडी निली रास १

४० छ.५ रौवल मौजे खि (पी) डावली येथील

खंडणी पैकी तटाणी वुमेत १

१००० छ.८ रौवल ब।। भेट सवाई जैसिंग

| | |
|---|---|
| घोडा निला तुरकी | सामान |
| नर रास १ येकूण क।। | चोईट्या |
| १००० | तांब्याच्या |

| | | |
|---|---|---|
| १२ | १० | ७ |
| ६ | ० | ० |
| ३५ | | |
| ५ | जेरबंद | |
| ५ | अनीन | |
| ५ | गादी फुराखी | |

६०० छ.२६ रौवल खरीदी गु।।

सुभानजी कोऱ्हाले घोडा निला रास १

४५० छ.२७ रौवल प।। खुदावट नि ।।

म्हलाजी मोरेश्वर साल गु ।।

सन इहिदेचे येवजी तालुका केसरसिंग

सिसोदा भदोरकर घोडा कर्डा १

७०० किता छ.२९ रौवल प्रांत जाधवहटी गु।।

राणोजी भोसले घोडा निला खसी

रास १ ये।। रू।।

४०० छ.२९ रौवल ब।।बाकी सन ** गु।।

पूर्णमल अहिर घोडा कुमेत रास १

येकूण

२५० छ.४ जमादिलावल पेशजी आली परंतु

जमाखर्च जाला नवता

२०० ब।। भेट बनुसरीदास

सिरोजकर छ.२८ रौवली

आला. घोडा बोर रास १

५० कुमेत तटु ब।। कमाविस

चुकारीचा आला होता तो $\frac{1}{2}$

२५०

३०० छ.मजकूर ब।। कमाविस चिंतो अनंत कमाविसदार प।। असेर साल गु।। मुकुंदजी नाईक जासूद यासी सुभेदार समागमे स्वारीस रवाना केले ते समई घोडी बसावयास नवती याजकरीता मा।।रनिलेची घोडी श्रीमंत राजश्री राऊ यांनी घेऊन मुकुंदजीस बसावयास दिली तिचा जमाखर्च जाला नवता सबब छ.मा।।री केला घोडी कुमेत १

१३५० छ.१६ सफर संस्थान वोडसे पैकी खंडणीचे येवजी घोडी

६०० निला घोडा ब।। मोहकुबसिंग रास १

६५० घोडा कुमेत ब।।

भवानसिंग रास १

१०० निला ब।। वाजपे ये १

३

१३५०

२५० छ.११ सफर देणे थानसिंग सिलेदार पागा म।।र साल गुदस्त पडल्या घोड्याचा मुबदला ब।। पागा म।।र पैकी ब।। पुजासें पै।। दिल्हा घोडा बोर पंचकल्याण १ येकूण

३२

१०६७६

## पत्र क्रमांक – ४

घडणी दफ्तर अंक – ३५०, पुडके – १

राजमंडळ (इ.स.१७४०–४१)

स्वारी राजश्री पंतप्रधान

खर्च ब।। मु।। पागाहुजूर

जामदार खाना पैकी

छ.२६ रमजान चिमणगीर
गोसावी याचे जिनाचे गादीस
ताफत्या।। दर्याई सनंग.।=
येकूण रूपये ६।।

छ.२९ रमजान देणे जिनाच्या
गादीस अस्तरास खादी पासोडी
.।।. येकूण रू ।।
.।।।.

छ.११ सवाल देणे मल्हारराऊ
देका सिलेदार गजनी सनंग
.।।. आक १०।। प्रमाणे
३१।। रूपये

छ.२५ रौवल देणे गादी
सिवावयासी विजार १ येकूण
१० रूपये

छ.२८ रमजान त।। त्रिंबक
शंकर
३० विजारा गजनीच्या
गाद्यास २ दर १५
३ मखमल पटास
गज .।।.
$८^6$ = सकलाद गज २
दर गजी रू.$४^6$–
$४१^6$ =
२।। . २

छ.२४ सवाल त।। अंबरी
सिदा जिनाचे गादीस वगैरे

१४।। जिनाचे गादीस विजारा
गजनीच्या २
७ ७।।
१४।।
२

छ.२९ सवाल देणे सुभाना मांग बारगीर मयेत जाला त्यास सेला साधा १ येकूण रू ।। ४।।.

० गेद जोड रेशमी खाशा घोड्यास

२ सुमार गेंद

० लगाम सुमारी १

१४।। सुमारी

छ.१३ सवाल चिमणगीरी आनीन सुमार १ रू.।।

३ २

छ. ३ जिलकाद सरोसरास

३ मखमल गज .।।.

४० सकलाद गज ४ दर १०

४।।

४३

रू.।।

## पत्र क्रमांक – ५

घडणी दफ्तर अंक ३५०, पुडके – १

राजमंडळ (इ.स.१७४९–५०)

स्वारी राजश्री पंतप्रधान

खर्च ब।। मु।। पागाहुजूर

जामदारखाना पैकी

छ.१० जमादिलाखर घोड्याचे जिनास

रसानगी चिठी जीन सुमार ४

त।। रामचंद्र गणेश

| | | |
|---|---|---|
| ८२.।. | सकलाद गज ११।।। | |
| २१।। | मखमलगज ३ | |
| ६।। | पासोड्या खादया २।। | दर २।। |
| ११० | २।। | १४।। |

छ.२२ जमादिलाखर रवानगी कापड

रसानगी ब।। याद आख

६६०

त।। केसो बहिरव व रामचंद्र गणेश कारकून दि।। पागा मजकूर आख रवानगी कापड

| | |
|---|---|
| ४०६।। = | तिवटे ३८ |
| ११३। | लुगडी ११ |
| ५२ | गजन्या १।। |
| ५५।।। ≡ | सेले साधे ७ |

३०　　　सकलाद गज ४ दर ७।।

सनगे　　　गज

६५७।। ÷　५७।। ४

छ.२२ जमादिलाखर खुदखान बारगीर दि।। पागा मजकूर यास लेकाच्या लग्नाबदल अर्जबाब कापड

आख
२५

त।। गंगाराम शंकर कारकुन दि.।।

पागा मजकूर सनगे येकूण रूये

१८　साडी १

७।.　लुगडे $\frac{1}{2}$

२५

छ.२७ जमादिलाखर इसमाल खान बारगीर दिमत पागा मजकूर मृत्यू पावला त्याचे बायकोस येकसाल साल मजकूरी मात्र बकसीस र।। चिठी लुगडे सनगे १

येकूण

आख १० यासी आदा त।। सनगे रूये

९।　लुगडे १

.।।।　खापा १ येकूण लुगडे

सनग $^{6}$ =

१०　　१५ =

रू.

छ. २७ रजबु देणे सिदो उधव दिमत मजकूर याची मातुश्री निर्वतली सबब दुखवटीयाचे वस्त्रे त।। भावसिंग चोपदार खसखसी १ येकूण

रूपये

२८।.

छ.२९ रजब देणे बारगीर राजे शावली यास बक्षीस त।। सिदो उधव छिटी बराणपुरी येकूण रूये

| | | |
|---|---|---|
| ३६ | तिवट | १ |
| ४५ | खाजगी राजश्री भाऊपैकी | १ |
| ८१ | | २ |

छ.६ सवाल रोज गु।। गासे घेऊन दिल्हे होते त्यास अस्तरास जुफूरआली बेतणीस चुकला स।। जाजती गु।। बालू पलांडा पोरगा छीट उंच हात ६ येकूण

सनग .।।

रूपये
१ ।।

छ.६ सवाल घोड्यास चोईटया घेऊन दिल्या गु।। बालू पलांडा पोरगा ताफ्ते येकूण रूपये

१२।. लालबंद ६४ गज ४।।४

सनग .। ≡

८। हिरवे बंद ३२ गज ४।=

सनग .। ≡

८। पिवले बंद ३२ गज ४।=

सनग .। ≡

२८।।।　　१।÷

रू.

छ.७ सवाल निशाणा बदल त।। सदाशिव बाबाजी चिरे बादली २ येकूण　　रूये

९७।।.

छ.९ सवाल त।। परशराम जिनगर फिरंगाणी सरोसरा ५ करविल्या त्यास गज येकूण　　रूये

२८।।÷　मखमल गज

२२।। कालीच्या सरोसरा ४

दर सरोसरास .१३ प्र।।

गज १।।। दर १५

६$^{6}$÷　लाल सरोसरा १

५ प्र।। गज – ।१

दर १७

१$^{6}$÷ प्र।। $^{6}$२ दर १२।।

.१३

६$^{6}$÷

छ.१२ सवाल झुली भुक्र्या बदल त।। बालकृष्ण महादेव खादया पासोड्या सनगे ३९ येकूण दर २।। प्रमाणे रूये

९७।।

छ.१८ मोहरम देणे खाशा जीनाचे गादीबदल खासगी राजश्री नानापैकी विजारा किनखापी जरी त।। बालू पलांडा पोरगा सुमार

रू.१

छ.२७ मोहरम बहिरजी पवार निमा छीटी सुलतानी खासगी र।। भाऊपैकी बक्षीस दिल्हा सनग १ त।। खुद येकूण किंमत ३० रूये

छ.२८ मोहरम देणे पटा व दुमची भरावयास रसानगी केसो बहिरव गज ये।। त।। गंगाराम शंकर रूये

६ सखलाद सुलतानी गज .।।.

६।. मखमल गज काली १ येकूण

१२।. १।।

छ.२९ मोहरम सरोसरा १ करविली आहे त्यास सकलाद हिरवी बारीक त।। परशराम जिनगर गज .।१ दर १२ प्रमाणे किंमत रूये ३।।.

छ.२९ रौवल देणे वर्षप्रतिपदेस निशाणाबदल, त।। सदासिव बाबा कारकुन सनगे शेले साधे ये।। रूये

२५ शेलो साधे २

११५।।। चिरा बादली पटक्या बदल २

४

रू.१४०।।।

## पत्र क्रमांक – ६

घडणी दफ्तर अंक – ३५०, पुडके २

राजमंडळ (इ.स.१७५०–५१)

स्वारी राजश्री पंतप्रधान

खर्च ब।। मु।। पागाहुजूर

जामदार खाना पैकी

छ. ४ सवाल राजश्री स्वामीस घोडा घ्यावयासी करार केला आहे त्यास जिनाच्या गादीस त।। नरसिंगराव उधव किमखाप सनग .।।. येकूण

किंमत रूपये
३०

छ.५ सवाल जरी जीनास बादल त।।

परशराम जिनगर रूपये

२१ साकलाद सुलतानी गज १।।

दर १४ प्राो रूये

२३।।= मखमल गज काली १ येकूण

१। खादी पासोडी सनग .।।.

येकूण रूये

४५।।। = सनगे गज

रू. .।।. २।।.

छ.सवाल राजश्री स्वामीस घोडा घ्यवयासी करार केले आहेत त्यास चोईटया बद्दल ब।। खासगी राजश्री जनार्दनपंत पैकी त।। नागोजी सिंदा निमे धुवट सुमार–२

छ.११ सफर देणे पागा मजकूर राजश्री भाऊच्या जुन्या गाशास अस्तरास खारवा त।। परशराम जिनगर सनग .।।। ≡ येकूण ३१. रूये.

छ.७ जिलकाद त।। हुसेन मोतादार किनारी वजन तोले
३१ दर ४।। रो. तोडा मढावयास रूये
१५।≡

छ.८ जिलकाद निजामभाई मोतदार दि.।। म।।र यास तोडा मढावयासी किनारी वजन तोले १।। दर तोला रूपये
४।।। येकूण रूये
७।।

छ.८ जिलकाद देणे चाबुकस्वार दि ।। पागा मजकूर सदरेस दिल्हे वि ।। खासा त।। आंबराजी सिंदा पोरगा तिवट छिटी बऱ्हाणपुरी सनग ये।।। रूये

| | |
|---|---|
| १४ | सुभाना चाबुकस्वार १ |
| १२ | इमामभाई चाबुकस्वार $\frac{1}{2}$ |
| रू. २६ | |

छ.५ जिल्हेज अमृतराव सोमवंसी जदीद बारगीर यासी वस्त्रे सदरेस त।।। सिवराम विश्वनाथ सनगे ये।। रूये

| | |
|---|---|
| १५ | तिवट १ |
| ३९ | जाफरखानी |
| २१। | छीट फर्द १ |
| १२ | गजनी .।।. |
| ८७। | ३।।. |

छ. ५ जिल्हेज देणे नागोजी सुर्यवंशी जदीद बारगीर

दिमत मजकूर नालबंदी साल मजकूर कापड

आख

१००

त।। दुपटा आपाजी नारायण कारकून

दि.।। मजकूर

| | |
|---|---|
| १६।। | तिवट १ |
| १६।। | छिट बंदरी फर्द १ |
| ३२।। | पासोडी ताडपत्री १ |
| २४ | गजनी १ |
| ६। | सेला साधा $\frac{1}{5}$ |
| ९५।।। | |

रू.

छ.१२ जिल्हेज मु।। पुणे दि।। पागार हुजूर देणे बारगीर नालबंदी साल मजकूर २।। चिठी

| | |
|---|---|
| संताजी सिंदे करोल | अमृतराव सोमवंशी जदीद |
| जदीद नालंबदी साल | यास नालबंदी साल |
| मजकूर कापड आख | मजकूर कापड आख |
| १०० | १०० |
| त।। दुपटा भगवंत | त।। दुपटा नारायणराव |
| अनंदराव कारकून दि।। | आनंदराव कारकून दि।। |
| पागा मजकूर | पागा मजकूर |
| ५६।।. तिवट १ | २१।।. तिवट |
| २७ गजनी १ | ३० गजनी १ |

१५।. जोट १ २३।। लुगडे १

.।।।. खादी पासोडी .।. २१ सखलाद गज ३।।

१$^{6}$ = छीट उणाख सनग दर ६ प्र।।

.।।. येकूण

रू.१००।।= ३।।। रू.९९।।। सनग गज

४ ३।।.

छ.२२ जिल्हेज मु।। पुणे बारगीर जदीद

नालबंदी साल मजकूर र।। चिठ्या

| कि।। | आसाम्या | आख | कि।। | अ।। | आख |
|---|---|---|---|---|---|
| ३५ | यादवराव जाधव | | ५० | राणोजी बागुल | |
| ३५ | बहिरजी जाधव | | ४० | राणोजी खेडकर | |
| २५ | गंगाराम रजपूत | ५० | भगवंतदास | | |
| २५ | सटवोजी जाधव | | ४० | सैद घुडणे | |
| २५ | गंगाजी जाधव | ४० | मंहमसरीफ जुनेरी | | |
| २५ | मुनसीराम | | ३० | नारायणजी चव्हाण | |
| २५ | गोविंदराव सिंदे | २५० | | | |
| २५ | मानेखान | | नि।। गोविंदराव मांजरे | | |
| ३५ | अंबरसिंग | | ---------- आख | | |
| २५ | देवकर्ण | २५ मीरअली झुरक | | | |
| ३५ | नंदराम | | २५ मानसिंग | | |
| ३५ | लक्ष्मणजी नलवडे | | ३५ अलिखान | | |
| २५ | मुकरखान | | २५ हयातखान | | |
| ४० | परशराम | | ११० | | |

२५ कृष्णदास

२५ अनुपराय

३५ केवलराम तेलंग

२५ आबाजी तेलंग

२५ महिमाजी तेलंग

२५ लक्षुमण

६०० (३५ चा फरक)

कापड ९६० आख

यासी आदा त।। भगवंत आनंदभाऊ व आपाजी नारायण कारकून दि।। पागा मजकूर

| | |
|---|---|
| ५३२।।÷ | पासोड्या ताडपत्री २२ |
| २९९।।÷ | तिवट ३२ |
| १०५।= | सेले साधे १५ |
| ८।।। | खसखसी १ |
| १२।।। | गजनी .।।. येकूण |
| २। | छिट उणाख १ |
| ९६।।. ७१।।. | |

रू.

छ.१ मोहरम देणे बकसीस कापड देणे फते महमद मोतादारास आख

३५

त।। खुद

८।। तिवट १

२६।         पासोडी ताडपत्री     $\frac{1}{2}$

३४।।

छ.२५ मोहरम खाशा घोडयास भुरक्यास रसानगी त।। राणोजी सिंदा पोर्गा खादया प।। ५ दर २।।।=

आख

रू.१४/=

छ.७ सफर माणीक मोतादादार मयत जाला सा।। कफनास त।। हसन मोतदार र।। पंचम चोतदार सेला साधा १ येकूण    रूये

६।।।=

छ.१४ सफर खाशा घोड्यास सरोसरा केल्या त्यास त।। यमाजी जिनगर किंमत रूये

६।।।. सकलाद सुलतानी गज .।।.

२।≡ मखमल गज .।।।. दर ३।. प्राो

९$^{6}$≡ रू.            १।.

## पत्र क्रमांक – ७

घडणी दफ्त अंक– ३५०,     पुडके – २

राजमंडळ     (इ.स.१७५०–५१)

खर्च ब।। मु।। पागाहुजूर

छ. १ रजबू रोजमरा दीड माही पैकी मोघम

र।। चिठी          २४२४ रूये

छ. २५ साबान ब।। देणे पागा मजकूर

ब।। यादी          रूये

१२७०          रोजमरा दीडमाही छ. १६ साबानचा

ब।। यादी ३९८० रूपये पैकी

पेसजी पावले.

१७०० छ.४ साबान प।। औरसे पै।।

३१० छ.६ साबान राघो गोविंद

७०० छ.८ साबान पिलाजी जाधवराव

यांजकडून

२७१०

बाकी रूपये

१२००          जाजती रवानगीस यैवज

ब।। याद,

२४७०

________रूपये

१५७५ प।। शाहाबाज नि।। राजे न्याहालसिंग यांजकडे स्वारी होलकर सिंदे याणी नजर रूपये १२००० करार केली त्याचा हवाला–विसाजी गंगाधर दि।। बाबूराव रघुनाथ यांणी हवाला घेतला आषाढ व।। १३ सन खमसेनात उजेनीस घ्यावे या प्राो करार त्यापैकी शंकराजी नाईक भिडे यांजकडून बाबुराव रघुनाथ याणी येवज देविला रूये ९००० त्यापैकी देविले.

८९५ प।। बोरसे नि।। इंद्रोजी कदम याजकडे साल मजकरची रसद येणे त्यापैकी बाजी हरि यांजकडून देविले.

२४७०

छ.२ सवाल रोजमरा दिड माही रसायनगी याद.

मु।। असी उंबरी येथील पागेचा रोजमरा रूये

| | |
|---|---|
| ५९ | बारगीर आसामी ११ |
| ४० | बाजेलोक आसामी १२ |
| २१० | पोरगे ७० |
| ४ | मोतदार १ |
| ३१३ | ९४ |

राघो गोविंद याजकडून देविले प।। खुलदाबाद साल गु।। पैकी

मु।। उंबरे येथे पागा आहे तेथील लोकांस रोजमरा रूपये

| | |
|---|---|
| ७८ | बारगीर अ।। १२ |
| ६१ | बाजेलोक अ।। १७ |
| २१ | दाणेकरी अ।। ७ |
| ३३६ | पोरगे अ।। ११२ |
| ५४ | मराठे मुसलमान १८ |
| १४ | मोतदार ४ |
| ५६४ | १७० |

राणोजी गरूड बारगीर
याजब।। घोडा १ येक
आहे त्यास दाणा दररोज
चंदी कैली येकूण इ।।
छ.२८ रमजान त।। छ.
२९ सवाल एकूण रोज
३२ येकूण आकार
गला रसानगी चिठी

ब।। यैवज प।। करकंब
पैकी बहिरोराम कमविसदार
यांजकडून देविले

$^{6}$२।।२ हरभरे दररोज $^{66}$१
$^{6}$१।१ बाजरी दररोज $^{66}$।।

---

$^{6}$४ रू.

माणको बलाल सुभेदार प।।
कर्डे रांजणगाव याजकडून देविले.

छ. १७ सवाल खरेदी घोडा कुमाईत रास १ ये।। किंमत ५५० रूपये

कर्ज गु।। माहादजी यादव याजपासून घेऊन पागेस दिल्हा रसायनगी आंबरोजी सिंदा पोरगा.

छ. ३ जिलकाद देणे सुरसिंग निकम दि।। पागा मजकूर ब।। राजश्री भाऊ नालबंदी ५०० रूपये

सरदेशमुखी प्रांत खानदेव नि।। महिपतराव कवडे साल मजकुरची रसद येणे त्यापैकी सदाशिव दीक्षित यांजकडून देविले.

छ.३ जिलकाद दि।। पागा मजकूर रसानगी चिठी

| | | | |
|---|---|---|---|
| रूपये | | | |
| ४०० | खरेदी जिनसा बद्दल | | |
| ४० | खरेदी तटू कुमाईत गु।। | | |
| | फाजलभाई मोतद्दार | | |
| १६ | सिलेदार र।। लस्करी खर्चास | | |
| | ५ | शाह मालिक चांद | |
| | ४ | रमजान खान | |
| | ३ | आबदुल रहिमान | |
| | १६ | | |
| ४५६ | | | |

सरदेसी प्रांत खानदेश नि।। महिपतराव कवडे

सालमजकूरचे रसदेपैकी सदाशिवराव दीक्षित यांजकडून देविले.

छ.७ जिलकाद ब।। देणे पागा मजकूर दसरीयास बकरीयाबद्दल रसानगी चिठी

साल गु।। प्रा। १५ रूये त।। वरून आदा

प्रांत पुणे नि।। श्रीपतराव बापूजी यांजकडून देविले.

छ.११ जिलकाद ब।। देणे नालबंदीस समजविस पैकी ब।। राजश्री चिरंजीव राजश्री भाऊ २५००० रूपये

सर देशमुखी प्रांत खानदेश नि।। महिपतराव कवडे यांजकडे साल मजकुराची रसद येणे त्यापैकी सदाशिव दीक्षित यांजकडून देविले.

छ.२१ जिलकाद पागा मजकूर घोडी कुमेत रास १ र।। चिठी किमत १३०० रूपये. कर्ज गु।। सोनेखान फुरसुंगीकर म।। केसो बहिरव कारकून दि ।। मजकूर

छ.२२ जिलकाद जमा ख।। घोडी कर्डी रास १ येकूण किंमत ५००
रूपये, कर्ज गुजारत रामाजी बलाल व मीरखान.

छ.२६ जिलकाद पागा मजकूरी खरेदी घोडे

आरबी ब।। यादी घोडे रास येकूण रूपये

| | |
|---|---|
| ७०० | निला गुलदार रास १ |
| ८०० | धाकटा कर्डा १ |
| ६०० | कुमाईत १ |
| ५०० | कछी जिला १ |
| ७०० | किता कडी १ |
| ६०० | कर्डा वाकडे पायांचा १ |
| ११०० | थोर निला १ |
| ५००० रू. | ७ |

कर्ज गु।। मुला फकरूदीन साहूकार
याजपासोन घेतले असेत छ.२७ जिलकाद

छ.१ जिल्हेज खरेदी घोडा सारंगा रास १
येकूण किंमत ३०० रूपये

छ.२ जिल्हेज देणे जदीद बारगीर नालबंदी
साल मजकूर व रोजमरा दिडमाही रूपये

| | अजरूये | नालबंदी | रोजमरा दिडमाहे |
|---|---|---|---|
| यादवराव जाधव | ८३ | ७५ | ८ |
| बहिरजी जाधव | ८३ | ७५ | ७ |
| गंगाराम रजपूत | ६७ | ६० | ६ |

| | | | |
|---|---|---|---|
| सटवोजी जाधव | ६६ | ६० | ६ |
| गंगाजी जाधव | ६६ | ६० | ६ |
| तुलसीराम राजपूत | ६६ | ६० | ६ |
| गोविंदराव सिंदे | ६६ | ६० | ६ |
| मानेखान | ६६ | ६० | ६ |
| अमरसिंग | ८३ | ७५ | ८ |
| हरिसिंग | ८३ | ७५ | ८ |
| देवकर्ण | ६६ | ६० | ६ |
| नंदराम | ६६ | ६० | ६ |
| लक्ष्मण राजपूत | ६६ | ६० | ६ |
| उमरखान | ६६ | ६० | ६ |
| लक्ष्मण नलवडे | ८३ | ७५ | ८ |
| परशराम रंगहौसी | ११० | १०० | १० |
| कृष्णदास | ७८ | ७० | ८ |
| अनुपराय | ७८ | ७० | ८ |
| केवलराम तेलंग | ८३ | ७५ | ८ |
| आबाजी तेलंग | ६६ | ६० | ६ |
| महिमाजी तेलंग | ६६ | ६० | ६ |
| नागोजी सुर्यवंसी | २३९ | ६० | ६ |

२२४ नालबंदी

२०० नख्त

२४ मोहर बाटावर

दर १४ कदीम

दर १२।।

२२४

१५ रोजमरा

२३९

त।।.

२१५ नख्त

२४ बाटा

२३९

१७९६ १६३७ १६२

त।।

१७७२ नख्त

१६१० नालबंदी १६३४ पै।।

१६२ रोजमरा

१७७२

२४ बाटा नालबंदी १६३४ पै।।

१७९६

येकूण रूपये

रू. २४कमविस बाटा

१७७२ सदाशिव भट पटवर्धन याजकडे

सरकारचा येवज येणे त्याजपैकी देविले

२९०।।त।। देवपूर व बालापूर

नि।। बाबुराव हरि साल

मजकूरचे रसदेपैकी देविले

| | | |
|---|---|---|
| | ९८६ | स।। माहूर नि।। महिपतराव कवडे साल मजकुरचे रसदेपैकी देविले |
| | ४९५।। | प।। भेलसे नि।। अंताजी विठल साल मजकुरचे रसदेपैकी |
| | १७७२ | |
| १७९६ | | |

## पत्र क्रमांक – ८

घडणी दफ्तर अंक – ३५०, पुडके – २

राजमंडळ (इ.स.१७५०–५१)

स्वारी राजश्री पंतप्रधान

खर्च ब।। मु।। पागा मजकूर

परभारे पैकी

छ.४ जिल्हेद पागा मजकूर घोडा १

ये।। किंमत खे।। घोडा कपाली टिका

६०० रूपये

कर्ज गु।। मालजी कोलेकर

छ. २६ जिल्हेज नि।। पागार मजकुरी

खरेदी घोडी ब।। चिठी येकूण किंमत

| रूपये | |
|---|---|
| २०० | सिंगी कर्डा दुपटा १ |
| १२५ | सारंगा कर्डा १ |
| २५० | कुमाईत चार पाय पांढरे कपाली टिका १ |
| ७० | सारंगा चौसुदा १ |
| १०० | निला गांगा |
| १२५ | अंबरी निला |
| ११० | जर्दा अखड |
| ९८० | ७ |

कर्ज गु।। मुकुंद निलकंठ याजपासून घोडी विकत घेतली ते जमा

छ.२९ जिल्हेज जमा पगा मजकुर भालेकाठ्या रू.३० सुमार

जानोजीराव निंबालकरपैकी पेशजी ४०० चारसे काठ्या पैकी बाकी राहिल्या त्या जमा.

छ.३ मोहरम जमा घोडा तुरकी
जीन सामान सुधा रास १ येकूण
किंमत २५० रूपये
कर्ज गु।। जान महमद

छ. मोहरम रूपये
८५३५ समजाविस नालबंदी ब।। वरात
चिरंजीव र।। भाऊ रूपये
२६१७।।÷ खरेदी निसाबदल वगैरे
दाणा वगैरे किरकोल ब।।
याद

रू.११९५२।।÷

महाल नि।। राघो गोविंद यांजकडे साल मजकुरची रसद येणे त्यापैकी पौष शुध प्रतिपदेस देविले.

छ. ११मोहरम १५ रूपये

कमविस ब।। संभू साली वस्ती मौजे पिंपरी त।। सांडस याचा बाजारच्या दुकानदाराचा कजिया होता. त्याचा इनसाफ करून इ।। मजकूरापासून घेवून पागेकडे देविले म।। माणकोजी कडू बासगीर दिंमत पागा रसानगी जानोजी जोसी ✻✻✻ खिजमतदार

छ. २० मोहरम जमा पागा मजकूर

घोडी बोर रास
१

कमाविस पैदास्त मौजे पेठ तर्फ खेड येथे चुकारू घोडी धोंडो विश्वनाथ जोगळेकर यास सापडली ते त्यांनी सरकारात आणून दिली जाब मारनिलेचे नावे लेहून दिल्हा.

छ.२१ मोहरम जमा   खरेदी घोडी   रास

गु।। मुला फकरूदीन घोडी रास १२

येकूण किंमत रसानगी चिठी रूये

९७०० अैन किंमत रूये

| | |
|---|---|
| १००० | धाकटा कुमईत नर रास मागील डावा पाय पांढरा. |
| १२०० | कुमेत थोर कपाली टिका आरबी १ |
| १५०० | कुमैत राईकी दुसरा वण काही नाही १ |
| ८०० | सावला कुमैत मध्यम रास १ |
| १२०० | कर्डा तांबडा १ |
| ७०० | सारंगा कर्डा धाकटा १ |
| ७०० | कर्डा कुसीवर डाग दिल्हा आहे १ |
| ८०० | अंबरी निला लांडोरा १ |
| ४०० | निला गोमासी कनिष्ठ रास १ |
| ६०० | सिंगा निला १ |
| ४०० | निली घोडी १ |
| ४०० | कुमईत च्यार पाय नेवरे रास १ |
| ९७०० | १२ |

१८००   या खेरीज खर्च पोटाचा वगैरे मिलोन

रू.११५००

१२

कर्ज गु।। मुला फकरूदीन साहूकार मुंबईकर याजकडून घोडी आणदिली ती जमा.

छ.६ सफर जमा घोडी गोमासी निली रास १ कमाविस पैदास्त म।। रामाजी उधव याजला सापडली होती. ते गंगाधर गणेश याणी सरकारात आणून जमा करविली ते हाली त।। गंगाधर गणेश सरदेशमुख घोडी निली गोमासी

रास
१

छ.७ सफर जमा पागा मजकुरी प।। कर्डे रांजणगाऊ नि।। माणकोजी बांदल यांणी पाठविल्या शेल्या २८ सुमार

अठावीस शेल्या पावल्या हुजत सुद.

छ.७ सफर जमा पागा मजकूर घोडी निली रास

ब।। चिठी रास २
१

भिकाजी चितलकर याजकडे नजरेची घोडी करार केली होती जे जमा हुजतसुद कतबा सापडला तर तो रद्द असे म्हणून हुजत लिहून दिली असे.

छ.१२ सफर जमा पागा मजकूर बटीक र।। रामचंद्र गणेश दिमत म।।र बटीक कस १ ब।। बहिरजी पवार दि।। पाागा मजकूर याची कुणबीण सरकारात घेऊन हुजूरपागेस दिल्ही.

छ.१२ सफर बहिरजी पवार हवालदार दि।। पागा मजकूर याची कुणबी सरकारत घेतली त्याचे येवेजी दुसरी कुणबिण र।। रामचंद्र गणेश कस १

कोठी नि।। जिवाजी गणेश याजकडून कुणबिण उत्तम देविली.

छ. १३ सफर जमा खरेदी घोडा कुमाईत गु।। माहादजी सोनवणी म।। जानराव ढमढेरे सामानसुद्धा घोडा रास १

येकूण यैन नकद रूपये ४२५

जागीर किले माहुली नि।। बालाजी गोविंद याजकडून फाल्गुन हफ्ता येणे त्यापैकी देविले.

छ.२० सफर ५ रूपये

कमाविस मसाला गावगना प्र।। जुंनर याजकडे हुजूर पागेचे गवत कापून घ्यावयाची नेमणूक आहे ते गवत दिल्हे नाही स।। ताकीद पत्रे घेऊन मसाला रूये

१ मौजे बतीसी त।। माहालुंगे

१ मौजे निंबगाव त।। माहालुंगे

१ मौजे ब्राह्मणवेडे त।। बेल्हे

१ मौजे सिरोली त।। हवेली

१ मौजे पारोंडे त।। हवेली

छ. २३ सफर जमा पागा मजकूर ब।।

चिठी गला कैली खंडी

.।।।.। हरभरे

$१^{6}२$ बाजरी

१।।।२।. आदे सुद यैन नख्त

७४।।

कसबे नारायणगाव प्रांत जुनरपैकी हुजत सुद

छ.४ रौवल स्वार पागा मजकूर यासी मसाला रसानगी नरसिंगराव उधव रूये ३०

कमाविस मसाला मल्हारजी डुकरा शिंपी मौजे वाकोरी याणे गोविंद जैन याचे बाईकोस आकर्म केले स।। हुजूर आणविले त्याजकडून देविले.

२५ मल्हारी डुकरा याजकडून देविले.

५ लक्ष्मी सिंपीण मौजे वाकोरी इने साहित्य केले तिजकडून देविले.

३०

छ.४ रौवल खरेदी घोडी रास येक

किंमत रूपये

६६० निळा रास १

४७५ बोर रास १

५२५ कुमईत १

४६० किता निळा रास $\frac{१}{४}$

२१२०

कर्ज गु।। ईश्वरसिंग दि।। दुर्जनसिंग याचे म।। खरेदी जमा केले ते छ.२ जमादिलावल मुकाम असिउंबरी येथील बेगमीस

रोजमरा दिड माही छ.१६ आंबाडी पायबंदास

जमादिलाचा १२१ रूये वजन ।. पके

आदेसुद नख्त असे

३।।– ।। रू.

राघो गोविंद याजकडून देविले.

## पत्र क्रमांक – ९

घडणी दफ्तर अंक – ३५० , पुडके २

राजमंडळ (इ.स.१७४०–४१)

स्वारी राजश्री पंतप्रधान

खर्च ब।। मु।। दि।। पागा

हुजूर परभारे पैकी

छ.२४ जमालिलाखर मु।। पिंपलवंडी येथील बेगमीस नवी घोडी गाईकवाडाकडील आली त्यांची बेगमीस ब।। यादी

छा। पारनेर जि।। नारो बाबाजी यांजकडून गला कैली बारूले मापे देविले

प्रांत जुंनर नि।। चिरंजीव राजश्री सदासिव चिमणाजी यांजकडून

खंडी

२० हरभरे

३० बाजारी

५०

गला पेशजी अडीचसे खंडी देविला पारनेर पैकी

राबते माहार आसामी २५ आदे सुद

मेखला कडी आहे तो १००० सुमार दूर करून हलीगला कैली देविला बाजरी कैली बारूले मापे ४५।।। खंडी

खंडी

११ हरभरे कैली

३३ बाजरी कैली

रू. ५०

आदेसुद बाजरी

२५।।।.

| | | |
|---|---|---|
| छ.५ | रजब | रूये |
| | ८००० | रवानगी ब।। सनद रूये १०००० |
| | | पैकी पेसजी दिल्हे रूपये २००० |
| | २००० | गल्याचे खरिदीबदल |
| रु. | १०००० | |

मोगलाई जफ्ती निसबत मानाजी निकम याजकडे प।। जैनाबाद वगैरे माहालचा यैवज येणे त्यापैकी रामाजी नाईक दातार याणी पंधरा हजार रू।। चा ज्येष्ठ सुध दशमीचे मितीने हवाला घेतला आहे. त्यापैकी देविले. जेष्ठ शुध दशमीस देविले.

छ.६ रजब स्वारी भाऊ घोडी छ. १२ मोहरम

आ
१
रूपये

कमाविस माहादाजी बेले दि।। राजश्री शंभूसिंग जाधवराव याची घोडी लस्करातून चोरून नेली. त्यास दुसरी घोडी येक चोर घेऊन जात होता ती मोहोलच्या ठाणेदाराने अटकाविली ती घोडी आपली म्हणोन मशारनिल्हेची माणसे तेथे गेली त्यास घोडी हुजूर आणविली पाहाता ते घोडी मारनिलेची नव्हे दुसरीयाची घोडी यैसे जाणोन हर दू घोडी सरकारात तुम्हाकडे घोडीचे झट नाही म्हणोन मल्हार बलाल खिजमतगार यासी सनद.

छ.९ रजब स्वारी राजश्री भाऊ स्वारी बराबरी घोडी गेली होती त्यास चरिंदा ब।। जमा खर्च पागा मजकूर रूये

३८।।। हरभरे .।४।।।.।।। दर $^{6}$२।।।

१२।।–बाजरी $^{6}$४।।। दर $^{6}$।१।। प्राो.

६।। रतीब घोड्यास वजन पके

३6 = गुल 6।५ दर 66४।।।

।।। = हलद 66४।। दर 66५

१। आफू 66। दर रूये ५

। ≡ भांग 66२

६।।

५७।।।=

प।। करकंब जि।। बहिरोराम यांजकडून देविले.

छ.६ रजब स्वारी मातुश्रीबाई यात्रा श्री भीमाशंकर गु।। गोविंद कृष्ण गोखले शा छ.१४ सफर त।। छ.८ रौवल ब।।

कैली गला चौसेरी मापे कडबा पुले सुमारी २१० सुमार

.। 6२। बाजरी

6।।।२ उडीद कसबे खेड ता मजकूर प्रांत

6१।.।। हरभरे जुंनर नि।। नारो आपाजी

.।२।१।।।. यांजकडून आला तो

प्र।। वाई पै।।

.।.।।।१।।। नि।। जयराम

त्र्यंबक सिवणे येथील

दस्तान पैकी

.।२6। बाजरी

6।।२।।। हरभरे

.।.।।।१।।।

6१।। नि।। नारोआपाजी

क।। खेड पै।।

$^{6}$।।१ हरभरे

$^{6}$।।२ उडीद

$^{6}$१।।

.।२।१।।।

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान

खर्च ब।। मु।। पागा हुजूर

रत्नशालेपैकी

छ.१० सवाल आदा छ.२२ रमजान बक्षीस देणे सुभाना चाबुकस्वार दि।। पागा मजकूर याचे तसलमातीस कडे सोन्याचे दिल्हे होते छ.मजकूरी रसानगी कृष्णाजी गोविंद गोरे सोने वजन तोले २।।.

दागिना दागिना

१

छ.१६ सवाल देणे हुसेन मोतातदार रसानगी अंबरोजी सिंदा पोरगा सोने खाो मोकल्यापैकी दर तोला रूपये १५ प्राो रूपये ३३० त।। खुदकडे

१ येकूण सोने मोकले २२ तोळे

कडे दागिना सुमार १ येकूण मोकळे सोने

सोने वजन तोले २२

२२।।

# पत्र क्रमांक – १०

घडणी दफ्तर अंक – ३५०, पुडके –२

राजमंडळ (इ.स.१७४०–४१)

स्वारी राजश्री पंतप्रधान

खर्च ब।। मु।। पागाहुजूर

जिनसखाना पैकी

छ.१३ रजब. लिहीण्यास कागद गढया दर

आंख ४। ≡ । प्राो आंख ८।।।=।। येकूण गढ्या

सुमार

१ कवडीचे पागेस

२ मु।। पुणे येथील पागेकडे

छ.२ साबान देणे हुसेन मोतादार याचा पायदुखावला सबब रसानगी नागोजी सिंदा खिजमतदार त।। खुद गुलाबपाणी वजन पके 66 .।.

छ.२४ साबान देणे खाशा घोड्याच्या जिनास लावावयास र।। व त।। नागोजी सिंदा खिजमतदार गेंद किरमिजी

वजन पके 66१।४।।.

गेंद जोड १ सुमार

छ.१८ रमजान वारू घोड्याचे गलात सयेली करून बांधावयाची रसानगी व त।। अंबरोजी सिंदा पोरगा कलाबु सोनेरी वजन १।।।. तोले.

छ.४ सवाल खासा घोडा रंगवावयासी रसानगी घासीराम चोपदार त।। हुसेन मोतादार तेल चमेली 66।. वजन पके.

छ.९ जिलकाद नाग घोड्याचे जीनास लावावयासी रसानगी व त।। राणोजी सिंदा पोरगा मुसनफ किरमिजी कल रेसमी गुंडाले १ नुसार

छ.६ जिलकाद त।। देणे

खाशा जीनास लावावयास

वि।। खाशा र।। व त।।

राणोजी सिंदा पोरगा सुमारे

१० मुसनफ रेसमी

गुंडाली सुमार

१ पिवली

५ किरमिजी कल

४ लाखी बाबर्दी

---

१०

७ गेंदजोड

३ किर्मिजी कल

१ पिवला

३ लाखी बाबदरी

---

७

---

१७

छ.१३ जिल्हेज खाशा घोड्यास गरमी जाहली त्याचे वोशधास त।। कृष्णा पलांडा पोरगा लवंगा वजन २।। तोले.

छ.१४ मोहरम कर्दा जगरूप घोडीस सरोसरी जरी त।। कृष्णा पलंडा पोरगा १ सुमार.

छ.१६ मोहमर खाशाच्या घोड्यास सरोसरा जरी कलाबुदार त।। खंडू तरडा खिजमतगार गु।। परशराम जिनगर सरोसरा १ सुमार

छ.२४ मोहरम देणे नागोजी राऊत बारगीर याच्या निमच्या मेणास खंजीराचे मेणास व पडदले यासी सिवावयासी त।। परशराम जिनार वजन

तोले

$^{6}$२ कलाबू

.।।. रेसीम

———

.।।२

छ.११ सफर देणे घोड्याचे जीनास त।। गोदजी सिंदा पोरगा कोरडे सुमार

१ चिंतामणी घोड्यास

१ नाग सांरगा

१ बोर घोडा १

१ पद्मिण घोडीचा सिंगरू कुमाईत

———

४

छ.१३ सफर खाशा घोड्यास सरोसरास दाल सोनेरी त।। यमाजी जिनगर गज सुमार

येकूण वजन तोले

४।।। कि।। सरोसरास दाल रूंदाल
गज १।।।.। येकूण वजन तोले

४।।।१।। किता सरोसरास दाल निरंद
गज ३।।१ येकूण वजन
तोले

———

९।।१।। गज ५।२

छ.६ रजब देणे नागीण घोडीस चोईट्या बांधावयास र।। त।। राघो धोंडदेव दि।। मजकूर वजन तोले

५ रेसीम कचे

$^{6}$२ कलाबू सोनेरी

———

५$^{6}$२

## पत्र क्रमांक – ११

घडणी दफ्तर अंक – ३५०, पुडके –२

राजमंडळ (इ.स.१७५०–५१)

स्वारी राजश्री पंतप्रधान

खर्च ब।। मु।। पागाहुजूर

दफाते पत्र

छ.१२ रजब खिलार खंडाले यास चारणीस पाठविले आहेत. त्यास माणको बलाल सुभेदार प।। कर्डे रांजणगाव याजकडून खंडाले येथील गंजपैकी देविले गवत पुले सुमार

५०,०००

पंनास हजार देविले रसानगी केसो बहिरव

छ.८ साबान पागा मजकुरपैकी जीनाचे सामान गावगनाकडे दिल्हे असे. त्यास गावगनाच्या लोहारास ताकीद करून खिले पट्या घडवून घेणे आणि जीन दसरिया आलीकडे तयार करवून पाठऊन देणे म्हणोन सनदा लेहून दिल्हया.

छ.९ रमजान पागा मजकूर साल गु।। प्रमाणे राबते माहर वगैरे देविले र।। सदासिव बाबाजी कारकून दि।। पागा मजकूर

| | |
|---|---|
| प्रांत जुंनर नि।। चिरंजीव सदासिव चिमणाजी पैकी | प्रांत पुणे नि।। श्रीपतराव बापूजी यांजकडून राबते माहार |
| ९२ राबते महार | ६० |
| १० मांग चराटे वलावयास | |
| १० चांभार फरसावयास | |
| ११२ | |

प्रांत गंगथडी नि।। अंताजी प।। पानरेर नि।। नारो बाबाजी मल्हार यांजकडून आसि उंबरीस यांजकडून राबते माहार माहार

राबते माहार आसामी २५

५० मु।। उंबरे यास राबते

माहार आसामी

२५ प्र।। करकंब नि।। बहिरोराम

२५ प।।। भोसे नि।। निंबजी नरसी

५०

छ.१ माहे जिलकाद चांभार व मांग असामी प्रांत पुणे नि।। श्रीपतराव बापूजी यांजकडून देविले रा।। चिठी आसामी

१० चांभार फरसावयास

१० मांग चराटे करावयास

२०

छ.२८ जिलकाद देणे पागा मजकूर बेगमीस साल गु।। प्राो गवत कापून गंज घालून देणे म्हणून सनदा

| गवत पुले | सुमार |
|---|---|
| १,५०,००० | प्रांत पुणे नि।। श्रीपतराव बापूजी यांजकडून कवडीचे पागेस |
| ३,५०,००० | प्रांत जुंनर नि।। चिरंजीव राजश्री सदासिव चिमणाजी यांजकडून चाकणचे पागेस वगैरे |
| १,००,००० | पा।। भोसे नि।। निंबाजी नरसी यांजकडून उंबरेयाचे बेगमीस |

| | |
|---|---|
| १,००,००० | त।। देपूर बेलापुर नि।। बाजीराव हरि यांजकडून असीचे पागेस |
| ७५,००० | प्रांत गंगथडी नि।। अंताजी मल्हार यांजकडून असीचे पागेस. |
| १,२५,००० | राघो गोविंद यांजकडून असीचे पागेस |
| ५०,००० | प।। करकंब नि।।। बहिरोराम यांजकडून उमरे याचे पागेस. |
| ५०००० | मौजे लोणी त।। हवेली प्रांत पुणेपैकी कवडीचे पागेस |
| | २०,००० खण साकबंद बांधावे त्याचे |
| | ३०,००० कात्रजेस गवत कापून घ्यावे ते |
| | ५०००० |
| १०,००,००० | |

छ.१९ मोहरम, र।। कृष्णाजीपंत दशपुत्रे यांजबरोबर पागेचे घोडे दोन २ जेजुरीस जात आहे. त्यास सासवडी राहतील तर यांस दर रोज दाणा कैली [66]२ दोन पायलीप्रमाणे दू रोजा च्यार पाईली व या खेरीज खर्च खेरीज वैरण सीरस्तेप्रमाणे देणे म्हणून सनद.

रसानगी हरि विश्वनाथ भावे

## पत्र क्रमांक – १२

घडणी दफ्तर अंक – ३५०, पुडके – २

राजमंडळ (इ.स.१७५०–५१)

स्वारी राजश्री पंतप्रधान

खर्च ब।। मु।। दि।। पागाहुजूर

परभारेपैकी

छ.८ माहे सवाल दि।। पागा मजकूर यास मागील रोजमरे याचा अैवज देणे आहे त्यापैकी रसानगी यादी रूपये

१५०००

पंधरा हजार रूपये कर्ज गुजारत गणपतराव विष्णु गद्रे, याजकडे कर्जाचा अैवज करार केला आहे त्यापैकी देविले रूपे (या पुडक्यात बारगीर कारकून आब्दागिरी, पालखी वगैरेंचा हिशोब आहे)

---

तेरीज खर्च ब।। मु।। पथके पागा हजूर सु।। इहिदे खमसेन १/५१

(इ.स.१७५०–५१)

| | अज रूपये |
|---|---|
| पोता पैकी | ६५३४७।।। ÷ |
| जामदारखाना पैकी | ४०३३६। |
| स्वारी बापू | ४४३।–।। |
| झ।। वसई | ५७।≡।। |
| झ।। कोठी सातारा | ३१।।। |
| स्वारी भागानगर | ७९३८२।≡ |
| झ।। दरमहे | ३०५६१।।≡ |

| | |
|---|---|
| झ।। खासगी | २७०२।।।≡।। |
| झ।। ता पैकी | १००३०[6]। |
| परभारे पैकी | ११२२९०।।।≡।। |
| | ३,४१,१८४।≡।। |

(एकूण रूपये तीन लाख एक्केचाळीस हजार एकशे चऱ्याऐंशी हजार रूपये सात आणे दोन पैसे)

## पत्र क्रमांक – १३

घडणी दफ्तर – रूमाल – ३५०, पुडके ६

राजमंडळ इ.स.१७७४–७५
खमस सबैन

स्वारी राजश्री पंतप्रधान
पागा हुजूर जमा येक बेर्जी
जमा साल मजकूर बेरीज

अज रूपये

१२०८७।–।।

अैन नख्त रूपये

११०२४६।।

किंमत कापड आख

६३। ÷

तपशील

$४१^{6}$ ≡ गजवार गज १।।।.।।

$३८^{6}$÷ सकलाद १।।।.

$३^{6}$ = मखमल $^{6}$।।.

$४१^{6}$ ≡ १।।।.।।.

पागा दिमत हरि बाबाजी पैकी घोडी व सामान जमा धरीले आहे त्यास माारनिलेचे पागेचा हिसेब आला नाही साा इजाफत जमा धरीले बेरीज

घोडी रास

१२ नर ४३ हरजिनसी

| | | |
|---|---|---|
| १ | बोर दुपटा | १९ जीन |
| १ | बोर सिंगा | २४ खोगीर जोड |
| १ | कर्डा सिंगा | ४३ |

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान सु।। खमस

पागा हुजूर

जमा दुबेर्जी बेरीज

अज रूपये

२,४८,५३६।-।।

अैन नख्त १,९३,९३०$^{6}$≡।।

किंमत कापड ५४,६०६$^{6}$ = आख

श्री

तालेबंद जमा येक बेर्जी पागाहुजूर

स्वारी राजश्री पंतप्रधान

सु।। खमस सबैन

अज रूपये

१,३३,३७२$^{6}$ =

अैन नख्त १,१९,३७३$^{6}$- ।।

किंमत कापड १३,९९९$^{6}$।।

तेरीज पागा हुजूर जमा दुबेर्जी परभारे
पैकी सु।। खमस सबैन मया व अलफ
औन नख्त रूपये

| | |
|---|---|
| पाा भोसे नि।। गोविंदराव | ४४२०$^{6}$÷ |
| पाा कर्डे रांजणगाव | ७६५।। |
| काा बाबत | ५०,००० |
| खासगी हुजरातचे माहाल | २३८७।। |
| ताा कर्यात मावल | ११६ |
| मौजे कादवे ताा कर्यात | ९९।. |
| पाा डबई प्रांत गुजराथ | ७६११।। |
| ताा हवेली संगमनेर | $^{6}$ = |
| ताा आकोले | ३०० |
| काा वोतूर | १७५ |
| पाा नासिराबाद | ६२५० |
| पाा सुपे प्रांत गुजराथ | ९००० |
| प्रांत वाई | ८१।।। = ।।। |
| जकात प्रांत पुणे | १३०० |
| प्रांत जुंनर | १९४७।=।। |
| मौजे पेठ ताा खेड | ३१६।।।. |
| पाा गाडापूर | ६२।. |
| पाा नेवासे | १६०।।।. |
| पाा पारनेर | ७६८।. |
| कोतवाली शहर पुणे | ७९८।= |

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान सुा खमस

पागा हुजूर जमा दुबेर्जी

किलेहाय

किले अमदानगर नि।। माहादाजी नारायण

पैकी नख्त रूपये

६९।।। ≡ ।

किले त्रिंबक नि।। नारो माहादेव याजकडे पागा मजकुराची घोडी रास ५ होती त्यास खर्च जाला होता तो रूजूवादतीमुले जमा धरून खर्च लिहीले ते २१७।।.।। रूपये

# संदर्भग्रंथसूची

❖ **प्राथमिक साधने** :

**अ) अप्रकाशित साधने**

पुणे पुरालेखागार : घडणी दफ्तर

रुमाल क्रमांक : ३५०, ३५१, ३५२, ३५३, ३५४, ३५५, ३५६, ३५७, ३५८ व ३८६

भारत इतिहास संशोधक मंडळ, दफ्तरखान्यातील पुरंदरे दफ्तराचे रुमाल

**ब) प्रकाशित साधने** :


अमात्य रामचंद्रपंत, आज्ञापत्र, संपा.कुलकर्णी अ.रा., मानसन्मान प्रकाशन, पुणे.प्रथमावृत्ती २००४.

ओतुरकर राजाराम विनायक, पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार (इ.स.१७७२ ते १८५४), त्रैमासिक वर्ष–३०, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे. १९५०.

कुलकर्णी अनुराधा गो, शिवछत्रपतींची पत्रे खंड–१, परममित्र पब्लिकेशन्स, ठाणे. २०११.

खोबरेकर वि.गो, मराठेकालीन व्यक्तींची हस्ताक्षरयुक्त पत्रे, संपा.दीक्षित मोरेश्वर ग., पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई. १९६९.

जोशी शंकर नारायण, सेनापती दाभाडे दफ्तरः भाग–१, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे. १९५१.

दाभाडे बाळकृष्ण, अश्वपरीक्षा, सौ.मालती दाभाडे, ऋता प्रकाशन, नागपूर, शक १८९१, इ.स.१९६९.

पवार आप्पासाहेब, ताराबाईकालीन कागदपत्रे : खंड १, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. १९६९.

पुरंदरे कृष्णाजी वासुदेव, पुरंदरे दफ्तर भाग –१, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे १९२९.

पुरंदरे कृष्णाजी वासुदेव, पुरंदरे दफ्तर भाग –३, कृष्णाजी वासुदेव पुरंदरे, पुणे १९३४.

भारत इतिहास संशोधक मंडळ, अहवाल किंवा इतिवृत्त, शके १८३४ (चैत्र–भाद्रपद), पुणे. १९१३.

राजवाडे विश्वनाथ काशिनाथ, मराठ्यांच्या इतिहासाची साधने (राजवाडे खंड) खंड ८, १९०३.

वाड चिमणाजी गणेश, पेशवा रोजनिशी, खंड १, ३, ५, ६, ७, ८ संपा.पारसनीस द.ब., डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे १९०९

सरदेसाई गोविंद सखाराम, पेशवे दफ्तरातून निवडलले कागद, खंड ११, १८, २२, ३२, ४१, ४५ गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९३०.

❖ **दुय्यम साधने** :

काळे दिनकर विनायक, छत्रपति शिवाजी महाराज, पुणे विद्यापीठ, पुणे. तृतीयावृत्ती, १९७१.

कुलकर्णी सुमित्रा, अठराव्या शतकाच्या भारतीय इतिहासाचे नवे आकलन, नवभारत–जुलै २०१०, प्रज्ञा पाठशाळा, वाई.

केळकर य.न., भूतावर भ्रमण : ऐतिहासिक लेख संग्रह, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती १९४०, पुनर्मुद्रण मे २००८.

केळकर य.न., ऐतिहासिक शब्दकोश, भाग १ व २, ठोकळ प्रकाशन, पुणे. १९६२

खरे गणेश हरि, निवडक लेख, खंड –१, पुणे. १९७२.

गुरुजी हरि रामचंद्र व दिघे विश्वनाथ गोविंद, एलिनेशन ऑफिस पुणे येथील पेशवे दफ्तराची मार्गदर्शिका, मुंबई सरकार, मुंबई १९३४.

मेहेंदळे गजानन भास्कर, श्री राजा शिवछत्रपती, भाग –१ व २, डायमंड पब्लिकेशन, पुणे, पुनर्मुद्रण मार्च २००७.

मोडक बाळाजी प्रभाकर, शक व सन यांची तिथी व तारीखवार जंत्री, १९८९.

मोल्सवर्थ जे.टी., मराठी इंग्रजी शब्दकोश, सुधारित पुनर्मुद्रण, शुभदा सारस्वत, पुणे १९७५, (प्रथमावृत्ती १८३१, द्वितीयावृत्ती १८५७)

रानडे महादेव गोविंद, मराठी सत्तेचा उत्कर्ष, अनुवाद फाटक न.र., महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्रथमावृत्ती १९६४.

श्री केशवसिंहजी, शालहोत्र संग्रह (शालिहोत्र संग्रह), लक्ष्मी वेंकटेश्वर छापखाना, कल्याण, मुंबई, संवत, १९७७ शके १८४२ (इ.स.१९२०–२१)

सेन सुरेंद्रनाथ, अनुवाद, शिवदे सदाशिव, मराठ्याची लष्करी व्यवस्था, डायमंड पब्लिकेशन, पुणे. २०११.

**इंग्रजी :**

1) Duff James Grant, A History of the Mahrattas, Longman, Rees, Orme, Brwon and Green, London. 1826.
2) Kincaid C.A. and Parasnis D.B., A History of the Maratha People, Vol.I, Oxford University Press, Bombay 1918.
3) Sen S.N. The Military System of the Marathas, Orient Longmans Private Ltd. Culcutta. 1958. Reprint, K.P. Bagchi and Company, Calcutta, 1979.